**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

पृ. शी. : राज्यात सापडलेले स्फोटकांचे साठे,विविध भागात झालेल्या दंगली तसेच मुंबईत झालेले बॉम्बस्फोट.

मु. शी. : राज्यात सापडलेले स्फोटकांचे साठे, विविध भागात झालेल्या दंगली तसेच मुंबईत झालेले बॉम्बस्फोट या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री अनिल परब, श्रीकांत जोशी, विलास अवचट व डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोध पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील औरंगाबाद, मनमाड, नाशिक व मालेगांव या ठिकाणी गेल्या 2-3 महिन्यात स्फोटकांचे साठे सापडणे, ही स्फोटके आणणारे व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाणारे आरोपी पकडले न जाणे, यातील 1-2 आरोपी आमदार निवासात मुक्कामास येणे, तथापि अद्यापपावेतो खरे आरोपी न सापडणे, अफरोज नावाचा आरोपी 90 दिवसात आरोपपत्र दाखल न झ ाल्यामुळे निर्दोष सुटणे, परिणामत: बॉम्बस्फोट करण्यासाठी इतरांना प्रोत्साहन मिळणे, अतिरेक्यांच्या पाठींब्यामुळे राज्याच्या विविध भागात दंगली होणे, भिवंडीत झालेली दंगल हाताळतांना पोलीस अधिकाऱ्यांनाच मार खावा लागणे, दंगल आटोक्यात आणण्यात पोलिसांना अपयश येणे, लोकसंख्येच्या तुलनेत पोलीस स्टेशनची व कर्मचाऱ्यांची संख्या कमी असणे, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होणे, भिवंडीत पोलीस स्टेशनची इमारत उभारण्यास गृह खात्यास अपयश येणे, भिवंडी दंगलीनंतर दिनांक 11 जुलै, 2006 रोजी मुंबईच्या पश्चिम रेल्वे मार्गावर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

लागोपाठ 7 बॉम्बस्फोट होणे, त्यात 200 च्या आसपास व्यक्तींचा नाहक बळी जाणे व 700 हून अधिक जण जखमी होणे, त्यातील काही दुर्दैवी कायमचे अपंग होणे, या बॉम्बस्फोटामागील सूत्रधारही अद्यापपावेतो न सापडणे, मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांत आपापसात मतभेद असणे, अकार्यक्षम पोलीस अधिकाऱ्यांना बढती व कार्यक्षम अधिकाऱ्यांना दुय्यम दर्जाचे स्थान यामुळे प्रामाणिक पोलीस अधिकाऱ्यांवर अन्याय होणे, केंद्रीय गृहखाते व महाराष्ट्रातील गृह खाते यांचा परस्परांशी संबंध नसणे, कायदा व सुव्यवस्था आणि बॉम्बस्फोटासंबंधी गृह खात्यातील उच्चपदस्थ पोलीस अधिकारी, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री व काही मंत्र्यांमध्ये एकवाक्यता नसणे, अतिरेक्यांनी मुंबईवर कब्जा केल्याची भावना निर्माण होणे, बॉम्बस्फोटात मृत झालेल्या तसेच जखमी झालेल्या व्यक्तींना शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य वेळेवर न मिळणे, बॉम्बस्फोटातील मृतांच्या आप्तांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणतेही ठोस धोरण नसणे, यामुळे राज्यातील आम जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, खरे म्हणजे या अधिवेशनामध्ये आमच्यावर दोनवेळा कायदा व सुव्यवस्था या विषयावर बोलण्याची पाळी आलेली आहे. 11 जुलै, 2006 रोजी मुंबईत बॉम्बस्फोट झाल्यानंतर या सभागृहामध्ये या राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी चर्चा झाली होती. 11 तारखेला बॉम्बस्फोट झाल्यानंतर गेल्या दहा दिवसात बॉम्बस्फोटाचा कोणत्याही प्रकारचा तपास लागलेला नाही किंवा आरोपी पकडले गेलेले नाहीत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 10:05

(श्री. पांडुरंग फुंडगर...)

राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेबाबत अस्थिर परिस्थिती आहे आणि राज्यामध्ये दहशतवाद निर्माण झालेला आहे. राज्यामध्ये बॉम्बस्फोट एकदमच झाले नाहीत. गेल्या दोन-तीन महिन्यामध्ये या महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया ठिकाणी स्फोटकांचे साठे सापडलेले आहेत. दिनांक 9 मे 2006 रोजी मुंबईच्या दहशतवादविरोधी पथकाने आणि औरंगाबादच्या पोलिसांनी संयुक्तपणे शोध मोहीम घेऊन तीन अतिरेक्यांना पकडले. त्यांच्याकडून 30 किलो आरडीएक्स, 10 अेके-47 रायफल्स, 40 मॅगझीन्स 2 हजार जीवंत काडतुसे जप्त केली. मोहमद अमीर अकील, सय्यद झुबेर सय्यद अन्वर आणि मोहमद तन्वीर अशी या तीन आरोपींची नावे आहेत. हे तीन आरोपी औरंगाबादचे राहाणारे आहेत. हे अतिरेकी औरंगाबादमध्ये राहात आहेत, त्या ठिकाणी ते स्फोटके आणत आहेत याबाबतचा सुगावा पोलिसांना बरेच दिवस लागला नाही. परंतु मुंबईच्या दहशतवादविरोधी पथकाने आणि औरंगाबाद पोलिसांनी ज्या वेळी शोध मोहीम सुरु केली त्यावेळी हे आरोपी पकडले गेले. 9 मे रोजी ही घटना झाली. त्यानंतर लगेच 13 मे रोजी मनमाड येथील अनकाई डोंगराच्या पायथ्याशी 50 बॉम्ब, अेके-47 रायफल्स आणि जिवंत काडतुसे यांचा साठा सापडला. ही स्फोटके आणि शस्त्रास्त्रे औरंगाबाद आणि मनमानडमध्ये मिळाली होती. 9 मे, 13 मे आणि 15 मे अशा एकाच आठवड्यामध्ये ही स्फोटके आणि शस्त्रास्त्रे सापडली. मालेगावला 12 किलो आरडीएक्स, 5 अेके-47 रायफल्स आणि एक हजार काडतुसे पोलिसांनी जप्त केली. एकाच महिन्यामध्ये राज्याच्या विविध भागातून एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्फोटके आणि शस्त्रास्त्रांचा साठा सापडला. या महाराष्ट्रामध्ये 1993मध्ये बॉम्बस्फोट झाले. त्यानंतर 2003मध्ये बॉम्बस्फोट झाले. 2003मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटातील काही आरोपी पकडले गेले आणि काही आरोपी फरार आहेत. अशा परिस्थितीमध्ये मुंबई आणि महाराष्ट्र हे स्फोटांचे आगर बनलेले आहे. आमच्या ग्रामीण भागात सांगायचे झाले तर मुंबई आणि महाराष्ट्र राज्य हे आज गवताच्या गंजीवर उभे आहे. एक ठिणगी पडण्याचा अवकाश, एवढी स्फोटक परिस्थिती निर्माण झालेले आहे की त्याचा केव्हाही भडका होईल अशी परिस्थिती आहे. ज्यावेळी औरंगाबादला स्फोटकांचा साठा सापडला त्यावेळी राज्याचे माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना आपल्या पोलिसांनी फार चांगली कामगिरी केली याबद्दल फार चांगले वाटले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, राज्याला टारगेट करण्याचा अतिरेक्यांचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

मनसुबा आम्ही कधीच यशस्वी होऊ देणार नाही. या शक्तींच्या मुळापर्यन्त आम्ही पोहोचू. औरंगाबादला स्फोटकांचा साठा पकडल्यानंतर दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख श्री. के.पी.रघुवंशी आणि मुंबईचे पोलीस आयुक्त श्री. अनामी रॉय यांची बैठक झाली त्यावेळी पोलिसांना 5 लाख रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले. गुजराथच्या मुख्यमंत्र्यांनी 10 लाखाचे बक्षिस जाहीर केले. ही बक्षिसाची घोषणा केल्यानंतर एका पत्रकाराने माननीय गृहमंत्र्यांना विचारले की, "आबासाहेब मालेगावला 10 वर्षापूर्वी अशाप्रकारे स्फोटकांचा साठा सापडला त्यावेळीही तेथील पोलीस अधिका-यांना बक्षिस जाहीर केले होते. पण 10 वर्षे झाली तरी ते बक्षिस त्यांना मिळालेले नाही." त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की त्याबाबतीत चौकशी करु आणि संबंधित अधिका-याला तात्काळ बक्षिस देण्याचा प्रयत्न करु. औरंगाबाद, मनमाड, मालेगाव याठिकाणी स्फोटके आणि शस्त्रास्त्रांचे साठे सापडले. यावरुन माननीय गृहमंत्र्यांना असे वाटले असेल की, या महाराष्ट्रातील अतिरेकी आता संपलेले आहेत, त्यांच्या जवळची स्फोटके आणि शस्त्रास्त्रे संपलेली आहेत, आपल्या पोलिसांनी फार चांगली कामगिरी केलेली आहे, महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत.

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनोद तावडे**)

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

सभापती महोदय, हा साठा सापडत राहिला परंतु अतिरेकी पकडले गेले नाहीत आणि मग याचा परिणाम 11 जुलै रोजी झाला. 11 जुलै रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाची चर्चा सभागृहात झालेली असल्यामुळे मी त्या मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. 11 जुलै हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासात काळया अक्षरामध्ये लिहिण्यासारखा दिवस ठरेल. या मुंबई शहरातून ज्या रेल्वेच्या लोकल गाड्यांच्या माध्यमातून हजारो सरकारी व खाजगी कार्यालयातील कर्मचारी प्रवास करतात, त्या रेल्वे गाड्यांमध्ये सायंकाळी 6.00 वाजता 11 मिनिटात 8 बॉम्बस्फोट घडविण्यात आले. मुंबई शहराची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रेल्वे गाडयांना अतिरेक्यांनी टार्गेट केले. त्यांना याची कल्पना होती की, सायंकाळच्या वेळी अधिक प्रवासी या रेल्वे गाडयांमधून प्रवास करतात. म्हणूनच लोकल्सना टार्गेटकरुन बॉम्बस्फोट घडविण्यात आले. या घटनांमध्ये जवळपास 200 माणसे ठार झाली व 700 पेक्षाही अधिक माणसे गंभीररित्या जखमी झाली. या स्फोटांचे सूत्रधार अद्याप सापडलेले नाहीत. या स्फोटासाठी कोणते साहित्य वापरले, आरडीएक्स वापरले होते का याचाही अद्याप पोलिसांना सुगावा लागलेला नाही. स्फोटांची तीव्रता इतकी भीषण होती की, स्फोट होताच रेल्वे लोकल्सच्या डब्यांच्या ठिकऱ्या उडाल्या. 1993 साली या मुंबई शहरामध्ये 12 ठिकाणी भीषण बॉम्बस्फोट झाले होते. या स्फोटांच्या ठिकाणी भेट देण्याची पाळी आमच्यावर आली होती. त्या स्फोटाची तीव्रता विचारात घेतली तर 11 जुलैला झालेल्या बॉम्बस्फोटांची भयानकता अधिक असल्याचे दिसून आले. सभापती महोदय, गृहमंत्र्यांनी जाहीर केले की, मुंबई आणि राज्याला टार्गेट करण्याचा अतिरेक्यांचा मनसुबा आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. त्यांच्या मुळापर्यंत पोहोचू हा निर्धार गृहमंत्र्यांनी औरंगाबाद येथे व्यक्त केला. परंतु तो पूर्णत: फोल ठरला. खरे म्हणजे या मुंबईमध्ये बॉम्बस्फोटांच्या घटनेला सुरुवात 1990 सालापासून झाली. 1990 पासून आतापर्यंत जवळपास 100 च्या वर राज्यात बॉम्बस्फोटाच्या घटना घडल्या. 1993 साली झालेल्या बॉम्बस्फोटाचा खटला अद्यापही अनिर्णित आहे. 13 वर्षे होऊनही खटल्याचा निकाल लागलेला नाही. त्यामुळे अतिरेक्यांची अशी भावना झाली आहे की, या राज्यामध्ये काहीही केले आणि प्रकरण कोर्टात गेले तर कोर्टाचा निकाल लवकर लागत नाही. त्यामुळे एक प्रकारे अतिरेक्यांची हिंमत वाढली आहे. 1993 सालच्या खटल्याचा निकाल 13 वर्षे होऊनही लागणार नसेल तर अतिरेक्यांची मनोवृत्ती अधिक बॉम्बस्फोट करण्याकडे वळणार आहे. 11 जुलैच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

घटनेच्या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे दोन दिवसांच्या भेटीकरीता मुंबईत आगमन झाले. राज्यात गेल्या दोन महिन्यात शस्त्रास्त्रे आणि आरडीएक्सचा साठा सापडल्यानंतर अगतिक घडू शकते असा इशारा केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारला दिला होता असे पंतप्रधानानी सांगून राज्य सरकारच्या मर्मावर बोट ठेवले. त्यांनी सांगितले की, एक महिन्यापूर्वीच गुप्तचर यंत्रणेने आम्हाला माहिती दिली होती, आम्ही महाराष्ट्र राज्याला तसे कळविले होते. स्फोटकांचे साठे सापडतात, यामुळे अगतिक घडण्याची शक्यता आहे, देशद्रोही शक्तींवर लक्ष ठेवण्यासाठी मुंबई पोलिसांची गुप्तचर यंत्रणा अधिक सक्षम करण्यात यावी असे मत त्यांनी व्यक्त केले. पंतप्रधानांनी असे मत व्यक्त करण्यापूर्वी दोन दिवस अगोदर गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या दुर्घटनेची जबाबदारी केंद्र सरकारवर ढकलण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी सांगितले होते की, रेल्वे गाड्या राज्य सरकारच्या अखत्यारित येत नाहीत. परदेशातून अतिरेकी येणे, स्फोट झालेली ठिकाणे रेल्वे मार्गावर असणे, त्यामुळे या दुर्घटनेला प्रामुख्याने रेल्वे प्रशासन जबाबदार आहे. परंतु पंतप्रधानांचे वक्तव्य आणि गृहमंत्र्यांचे वक्तव्य यामध्ये प्रचंड तफावत दिसून आली. सभापती महोदय, फक्त गृहमंत्र्यांनीच विधान केले नाही तर, पोलीस अधिका-यांनी सुध्दा अशा प्रकारची विधाने केली.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, 13 जुलै, 2006 रोजी दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख श्री. रघुवंशी यांनी सांगितले होते की, मुंबई बॉम्बस्फोटाचा दुवा हाती लागल्याची माहिती आहे तर त्यांनी लगेच दोन दिवसात असे सांगितले की, मुंबई बॉम्बस्फोटाच्या तपासात अजून आम्ही कोणत्याही निष्कर्षापर्यंत गेलेलो नाही. दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख एक दिवस वेगळी बातमी देतात आणि लगेच दुस-या दिवशी दुसरी बातमी देतात. सभापती महोदय, मुंबई बॉम्बस्फोट होऊन आता 10 दिवस उलटून गेलेले आहे परंतु अजून सुध्दा मुंबई बॉम्बस्फोटात कोणती स्फोटके वापरण्यात आले होते त्याची माहिती पोलिसांना मिळू शकलेली नाही. मुंबई बॉम्बस्फोटाच्या संदर्भात केंद्रशासनाने आपल्या राज्याला आगाऊ कल्पना दिली होती परंतु यासंदर्भात केंद्रसरकारने आपल्या राज्याला कोणत्याही प्रकारची आगाऊ कल्पना दिलेली नाही असे खुद्द माननीय गृहमंत्र्यांनी सांगितलेले आहे. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्रशासनाने बॉम्बस्फोटाच्या संदर्भात आगाऊ कल्पना दिली होती असे सांगितलेले आहे, माननीय पंतप्रधान बाम्बस्फोटाच्या संदर्भात वेगळेच सांगतात. मुंबई बॉम्बस्फोटाच्या संदर्भात उलटसुलट विधाने सरकारकडूनच येत असल्यामुळे तसेच ही विधाने ज्या पध्दतीने येत असल्यामुळे जनतेमध्ये संभ्रमतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. बॉम्बस्फोट होऊन 10 दिवस होऊन गेले तरी बॉम्बस्फोटात कोणाचा हात होता, कोणते स्फोटके वापरण्यात आले होते, कोणत्या अतिरेक्यांना पकडण्यात आलेले आहे, यासंदर्भात अजून काहीही खुलासा होऊ शकलेला नाही. मुंबई बॉम्बस्फोट झाल्यानंतर हा तपास कोणी करावयाचा यासंदर्भातच चर्चा चालू होती. हा तपास रेल्वे पोलिसांनी करावयाचा ? हा तपास मुंबई पोलिसांनी करावयाचा ? दहशतवाद विरोधी पथकाने करावयाचा ? क्राईम बँचने करावयाचा असेच चालले होते. हा तपास पोलीस महासंचालक श्री. पसरिचा यांच्या नेतृत्वाखाली करावयाचा? की पोलीस आयुक्त श्री. अनामी रॉय यांच्या नेतृत्वाखाली करावयाचा की, दहशतवाद विरोधी पथकाकडून करावयाचा असे चालले होते. सभापती महोदय, आज मुंबईचे क्राईम डिपार्टमेंट काय करीत आहे? मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात गोंधळाचे वातावरण निर्माण झालेले आहे. एकेकाळी मुंबई पोलिसांची तुलना लंडनच्या पोलिसांबरोबर होत होती परंतु आज मुंबई पोलिसांची तुलना कोणाशी करावयाची असा प्रश्न पडलेला आहे. क्राईम ब्रँचने तर मध्यंतरीच्या काळात आपली

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

विश्वासार्हता गमावलेली आहे. ख्वाजा युनूस प्रकरणात ख्वाजा युनूस मारला गेला की, पळून गेला यांसदर्भात काही पोलीस अधिकारी जेलमध्ये गेलेले आहेत, तेलगी घोटाळयात सुध्दा मोठमोठे पोलीस अधिकारी जेलमध्ये गेलेले आहेत, बनावट एनकाऊंटरमध्ये काही पोलीस अधिकारी जेलमध्ये गेलेले आहेत. काही पोलीस अधिकारी दाऊद प्रकरणात जेलमध्ये गेलेले आहेत. मुंबई पोलिसांची तुलना एकेकाळी स्कॉटलँडच्या पोलिसांबरोबर होत होती. परंतु आता एकापाठोपाठ एक क्राईम ब्रँचचे अधिकारी अडकत गेलेले आहेत, संपत गेलेले आहेत. अनेक अधिकारी वेगवेगळया गुन्हयात जेलमध्ये गेलेले आहेत अशी आज क्राईम ब्रँचची परिस्थिती आहे. त्यामुळेच बॉम्बस्फोटाच्या संदर्भात वेगवेगळी वक्तव्ये केली जात आहे. महाराष्ट्राचे सरकार हे श्रीदत्तासारखे आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. कारण श्रीदत्तगुरुंना तीन तोंडे होती त्या प्रमाणे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॉम्बस्फोटाच्या संदर्भात तीन प्रकारची वक्तव्ये करीत आहेत. अशा वक्तव्यामुळेच महाराष्ट्रातील जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. एकंदर गृहखात्याची अवस्था खिळखिळी झालेली आहे. बॉम्बस्फोट होऊन 10 दिवस झालेले असतांना सुध्दा या दहा दिवसात एकही बॉम्बस्फोटातील आरोपीला अटक झालेली नाही, बॉम्बस्फोटाचा काहीही सुगावा लागलेला नाही. मुंबई बॉम्बस्फोटात 200 व्यक्ती मृत्यू पावल्या आहेत. तरी सुध्दा याबाबत काहीही सुगावा लागलेला नाही. या बॉम्बस्फोटात कोणती संघटना सक्रीय होती त्याची देखील माहिती अद्याप मिळालेली नाही. आज पोलीस खात्याचे मनोबल दिवसेंदिवस खालावत चालले आहे. खरे म्हणजे आता रक्षकच भक्षक बनत चालले आहेत. मुंबई बॉम्बस्फोट हा गृहखात्याला काळीमा फासणारी गोष्ट ठरली आहे. खरे पाहिले तर आर.आर.पाटील हे गृहमंत्री झाल्यानंतर या राज्याचे गृहखाते सक्षम होईल, स्वाभिमानी होईल असे आम्हाला वाटले होते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी )**

श्री.पांडुरंग फुंडकर........

पण दुर्दैवाने तसे घडले नाही. श्री.आर.आर.पाटीलसाहेब गृहमंत्री झाले आणि पोलीस विभागात काळिमा फासणाऱ्या घटना घडण्यास सुरुवात झाली. कुंपणानेच शेत खाल्यासारखा हा प्रकार आहे. ज्यांच्यावर संरक्षणाची जबाबदारी आहे त्यांच्याकडूनच जनतेला धोका निर्माण होत आहे. पोलिसांनी महिलांचे संरक्षण करण्याऐवजी पोलिसांकडून महिलांवर बलात्कार होण्याच्या घटना महाराष्ट्रात घडत आहेत. सहारा विमानतळाजवळ एका कचरा गोळा करणाऱ्या अल्पवयीन मुलीवर तेथील एका पवार नावाच्या पोलिसाने बलात्कार केला आणि तक्रार नोंदवू नये म्हणून त्याने 15 हजार रुपयांची लाच देखील देण्याचा प्रयत्न केला होता. मंत्रालयापासून हाकेच्या अंतरावरील म्हणजे मरीन ड्राईव्ह येथील पोलीस चौकीत श्री.सुनील मोरे नावाच्या पोलिसाने एका कॉलेज युवतीवर बलात्कार केला. त्याला न्यायालयाने 12 वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. अशाप्रकारच्या अनेक घटना आहेत पण त्या सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात अशाप्रकारच्या घटना घडत आहेत ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. रायगड पायथ्याची रांजा गाव आहे. त्याठिकाणच्या पाटलाने एका मुलीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांना ही घटना समजली. त्यांनी त्या पाटलाला गडावर बोलावून घेतले आणि त्याला विचारले की, तुला हा अपराध मान्य आहे काय ? पाटलाने अपराध मान्य केला. महाराजांनी लगेच आदेश दिले की, पाटलाचे हातपाय तोडून त्याला गडावरुन खाली ढकलून द्यावे. ही घटना आपणा सर्वांना माहीत असेलच. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महिला सुरक्षित होत्या.

आपण कोणतेही वर्तमानपत्र पाहिले आणि त्यामध्ये कोणत्याही वयाच्या मुलीवर वा महिलेवर बलात्कार झाल्याची बातमी छापून आली नाही आज असा एकही दिवस जात नाही. आज राज्यात महिला सुरक्षित नाहीत. मी कालच नियम 93 अन्वये एक सूचना दिली होती. हिऱ्या नाम्या पारधी,वय वर्षे 25, ठाकूरवाडी, याने दिनांक 25 जून, 2006 रोजी एका लाकडाची मोळी विकणाऱ्या पारधी महिलेवर बलात्कार केला. 20 दिवस झाले अजून ती महिला घरी आलेली नाही. तिचा खून झालेला असावा असा तिच्या कुटुंबाने संशय व्यक्त केलेला आहे. दिनांक 3 जुलै,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

2006 रोजी त्यांनी कर्जत येथील पोलीस स्टेशनमध्ये तक्रार सुध्दा दाखल केलेली आहे. तिचा अजूनपर्यंत काहीही थांगपत्ता लागलेला नाही. त्या महिलेवर बलात्कार करुन तिला गायब केले आहे. ती जीवंत आहे की तिचा खून झाला आहे हे अजूनपर्यंत समजलेले नाही.

दुसरे एक प्रकरण गंगापूर, तालुका उदगीर येथील सावकार श्री.शिवशंकर बिरादार यांच्याकडून श्री.गोविंद पाटील याने 25 हजार रुपयांचे तीन टक्के व्याजाने कर्ज घेतले. हा सर्व व्यवहार बॉंड पेपरवर झाला होता. श्री.पाटील याने सावकाराने सर्व कर्ज फेडले आणि त्याच्याकडे कागदपत्राची मागणी केली. परंतु सावकाराने त्याची कागदपत्रे परत केली नाहीत. त्याने सावकाराकडे पुन्हा तगादा लावल्यावर सावकाराने त्याच्या पत्नीला पळवून नेले. त्यासंबंधी श्री.पाटील याने लातूर पोलीस अधीक्षक यांचेकडे तक्रार केली. त्याने तक्रार केली म्हणून सावकराने त्याला धमकाविले की, तुझ्या पत्नीला पळवून नेले होते, आता तुझ्या बहिणीला पळवून नेल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा महिलांचे संरक्षण शासन कसे करणार आहे ?

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

तक्रार देऊन 20-20 दिवस झाले तरी आरोपी सापडत नाहीत. कुटुंबाने तक्रार देऊनही लातूर पोलीस अधीक्षकांना आरोपी सापडलेला नाही. अशा प्रकारे ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेचा आनंदी आनंद आहे. माननीय गृहमंत्री महोदय, आपण ग्रामीण भागातील पोलीस स्टेशनची पाहणी करावी. त्याठिकाणचे पोलीस स्टेशन्स हे क्रिमिनल लोकांचे अड्डे बनलेले आहेत. त्याठिकाणी सज्जन माणसांना प्रवेश नाही. आज सज्जन माणूस त्याठिकाणी जाण्यास घाबरतो. त्याठिकाणी दूर्जनास जाण्यास भीती वाटण्याऐवजी सज्जनासच भीती वाटते, अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज त्याठिकाणी गुन्हे घडले तर सज्जन माणसांची तक्रार करण्याची हिम्मत होत नाही, अशा प्रकारची स्थिती आहे. याचे कारण असे की, तक्रार करण्यास गेल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये तक्रारदाराकडून पैसे मागितले जातात किंवा त्यांना धमकी दिली जाते, अशा प्रकारे ग्रामीण भागातील पोलीस स्टेशनची परिस्थिती निर्माण झालेली आहे. याचे परिणाम म्हणून आज राज्यामध्ये दरोडयांचे प्रमाण वाढलेले आहे. याठिकाणी मी पूर्ण राज्याची माहिती आणलेली आहे. मी सुरुवातीला सांगितले की, या सभागृहामध्ये गृहखात्यावर दुसऱ्यांदा चर्चा होत आहे. मी याठिकाणी आपल्याला बुलढाणा व अकोला या दोन जिल्हयांची माहिती देऊ इच्छितो. त्याठिकाणी गेल्या सहा महिन्यांमध्ये जेवढे दरोडे पडले, त्यासंबंधी दरोडेखोरांचा पत्ता आपण अजूनही लावू शकला नाहीत. आज लोकांमध्ये दहशत पसरली असून चोऱ्या झाल्यानंतर आपल्याला चोर वा दरोडेखोर सापडत नाहीत. माननीय गृहमंत्री महोदय, या सभागृहामध्ये आपण सांगितले होते की, ग्रामीण भागामध्ये अवैध सावकारी करणाऱ्या सावकारांस "कोपरा पासून ढोपरापर्यंत सोलून काढू" मी याठिकाणी कोणाचे नांव घेणार नाही. याबाबतीत आपण माहिती घ्यावी. बुलढाणा जिल्हयातील पोलीस स्टेशनमध्ये अवैध सावकारांविरुध्द तक्रारी दाखल झाल्या. त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये असे सांगण्यात येते की, कशावरुन सावकारी व्यवहार झाला ? याबाबतीत कागदपत्रे दाखल केल्यानंतरही पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे रजिस्टर होत नाहीत. आमच्या गावातील पोलीस स्टेशनमध्ये अशा प्रकारच्या 55 तक्रारी दाखल करण्यात आल्या, त्यापैकी फक्त चारच गुन्हे दाखल झाले. सर्व कागदपत्रांची पूर्तता करुनही गुन्हे नोंद होत नाहीत. आपण याबाबतीत पोलिसांवर दबाव आणत आहात. एका बाजूला माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, पोलीस स्टेशन हे राष्ट्रवादीचे अड्डे बनलेले आहेत. परंतु आपल्या काळात आपण गृहमंत्री असताना काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2....

श्री.पांडुरंग फुंडकर...

काँग्रेसवाल्यांनीही पोलीस स्टेशन हे अड्डे बनवले आहेत. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करुनही गुन्हे रजिस्टर होत नाहीत, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे. याबाबतीत आपण कसा चेक ठेवणार आहात ? आज ग्रामीण भागातील गरीब माणसांची सुनावणी पोलीस स्टेशनमध्ये होत नाही, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी भिवंडीमध्ये घटना घडली. काल शिवसेनेचे विधानसभा विरोधी पक्षनेते माननीय श्री.रामदास कदम यांना मुलुंडमध्ये अटक करण्यात आली. 8 दिवसांमध्ये त्याठिकाणी पोलीस स्टेशनच्या बांधकामास सुरुवात होईल, असे माननीय गृहमंत्र्यांनी आश्वासन दिले होते, त्याची पाहणी करण्यासाठी ते त्याठिकाणी जात होते. परंतु त्याठिकाणी प्रत्यक्षात बांधकामास सुरुवात झालेली नाही. सरकारचे हे आश्वासन फोल ठरले आहे. त्याठिकाणी झालेल्या घटनेचे परिणाम म्हणून आपण त्याठिकाणी बांधकामास सुरुवात केली पाहिजे. या राज्यामध्ये अशा प्रकारे जमाव जमवून हजारो माणसे पोलीस स्टेशनवर हल्ला करणार असतील तर तो हल्ला पोलिसांवर नसून तो हल्ला आपल्यांवर झालेला आहे. अशा प्रकारे ते लोक पोलिसांना ठेचून मारणार असतील तर या लोकांचे रक्षण कोणी करायचे ? सभापती महोदय, त्याठिकाणी दोन पोलिसांना ठेचून मारण्याचा प्रयत्न झाला, त्याचबरोबर डी.सी.पी.,ए.सी.पी. लेवलचे अधिकारीही या जमावाकडून वाचू शकले नाहीत. एका पोलिसाचे तर दात पाडण्यात आले. अशा प्रकारे आज महाराष्ट्रामध्ये पोलिसांवरच हल्ले होत आहेत. त्यामुळे हे पोलीस खाते सक्षम आहे, असे आम्ही कसे म्हणावयाचे ? आपले पोलीसच अशा प्रकारे मार खात असतील व त्याची दखल आपण घेणार नसाल तर कसे व्हायचे ? याठिकाणी अशा प्रकारे चॅलेंज करण्यात येत आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

मी सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना यापूर्वीच सांगितले आहे की, हे चॅलेंज गृहमंत्र्यांना नाही तर या सरकारला दिलेले आहे. ज्या अबु आझमीने, पोलीस स्टेशन बांधू देणार नाही, असे चॅलेंज तुमच्या सरकारला दिले त्याच अबु आझमीने भिवंडी येथे पोलीस स्टेशनचे बांधकाम केले तर 20 कोटी मुसलमान रस्त्यावर येतील, अशी धमकीसुध्दा राज्य सरकारला दिली आहे. हे प्रक्षोभक नाही ? परवा, गुजरातचे सन्माननीय मुख्यमंत्री, श्री.नरेंद्र मोदी मुंबईत आले होते. त्यांच्या भाषणाला मी स्वत: हजर होतो, त्यांनी त्या ठिकाणी आपल्या संपूर्ण भाषणात एकही वाक्य प्रक्षोभक उच्चारलेले नाही. परंतु, त्याचेही राजकारण करण्याचा प्रयत्न या सरकारने केला. अबु आझमी काहीही बोलले तरी ते प्रक्षोभक नाही, त्यांनी सरकारला चॅलेंज केले, ते राजकारण नाही, त्यांच्यावर सरकार कोणतीही कारवाई करीत नाही, तुम्ही त्यांचे लांगुलचालन करता ते राजकारण नाही पण दुस-या राज्याचे मुख्यमंत्री या राज्यात येतात, समतोल भाषण करतात, जनतेला शांतता राखण्याचे आवाहन करतात, त्याला मात्र प्रक्षोभक ठरविता ?

सभापती महोदय, अतिरेकी कुठपर्यन्त आलेले आहेत ? आमदार निवासामध्ये सुध्दा अतिरेकी वास्तव्य करु लागले आहेत. हे आम्ही सांगत नाही तर वर्तमानपत्रात तशी बातमी छापून आली आहे. अशा परिस्थितीत आमदारांचे जीवनसुध्दा असुरक्षित झाले आहे, या राज्यातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे.

सभापती महोदय, राज्यात बॉम्बस्फोटांची तर एक साखळीच तयार झालेली आहे. औरंगाबाद, मनमाड, मालेगाव, भिवंडी येथे घडलेल्या घटनांबरोबरच परवा शिवाजी पार्क येथे मॉंसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाची विटंबना, त्यांच्या पुतळयाला चिखल फासण्याचा प्रयत्न झाला. ही एक प्रकारची साखळी आहे, समजून उमजून केलेला डाव आहे आणि त्यामधून महाराष्ट्रातील शांतता धोक्यात आणण्याचा प्रयत्न अतिरेक्यांनी चालविला आहे.

सभापती महोदय, या राज्यातील पोलीस कशा पध्दतीने वागतात याचे एक उदाहरण मी या ठिकाणी देणार आहे. 3 जूनला नवी मुंबई शहरामध्ये भरदिवसा हायवेवर पवनराजे निंबाळकर मारले गेले. 3 जूनपासून आज 21 जुलैपर्यन्त पोलिसांनी काहीही केलेले नाही. मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन आलो. पोलीस स्टेशनमध्ये कोणीही दखल घेण्यास तयार नाही. "या राज्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..........

SRR/ MAP/ KGS/

श्री.पांडुरंग फुंडकर............

आता न्याय मिळविण्यासाठी लोकांना मोर्चे काढावे लागत आहेत", अशा प्रकारची बातमी 'लोकमत' या वृत्तपत्रात आलेली आहे. पवराजेंच्या मारेक-यांना अटक करण्याच्या मागणीसाठी 20 हजार लोकांचा मोर्चा उस्मानाबाद शहरात निघाला. सहकार क्षेत्रात असलेला, सत्तारुढ पक्षाचाच नेता भरदिवसा मारला जातो पण त्यांच्या मारेक-याला हात लावला जात नाही. अशीच स्थिती असेल तर सामान्य माणसांनी न्याय कोणाकडे मागायचा ? पवनराजे निंबाळकरांच्या दोन्ही मुलांनी या राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना पत्र दिलेले आहे आणि मारेक-यांना पकडण्याची विनंती केलेली आहे. परंतु, त्या पत्रामध्ये ज्यांच्यावर आरोप करण्यात आलेले आहेत त्यांचे धागेदोरे तुमच्या पक्षापर्यन्त आले आहेत. पवनराजेंच्या मुलांनी जे पत्र दिले आहे त्या पत्रात असे आरोप केले आहेत की, "3 जून 2006 रोजी आमचे वडिल, पवनराजे उर्फ भोपालसिंग संभाजीराव निंबाळकर आणि त्यांचे चालक समत खान यांची कळंबोली येथे हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलीस ज्या दिशेने तपास करीत आहेत त्यावरुन मारेकरी सापडण्याची शक्यता नाही." त्यांनी आपली असहाय्यता या पत्राव्दारे व्यक्त केली आहे. या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "आर्थिक कारणामुळे नाही तर राजकीय व्देषातून ही हत्या करण्यात आली असून यामध्ये माजी मंत्री, श्री.पद्मसिंह पाटील यांचा हात आहे. तसेच, राज्यमंत्री, श्री.राणा जगजितसिंह पाटील हे दबाव आणत असल्यामुळे पोलीस चुकीच्या दिशेने तपास करीत असून मारेक-यांना पकडण्यात पोलीस अपयशी ठरले आहेत.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .............

माननीय गृहमंत्री याचा तपास करणार आहेत काय ? माननीय गृहमंत्री महोदयांना मी एक उदाहरण देतो. आपल्या राज्यामध्ये युतीचे सरकार सत्तेवर असतांना सातारा येथे एक घटना घडली होती. त्यावेळी आपल्या राज्याचे गृहमंत्री माननीय श्री.गोपीनाथ मुंडेसाहेब होते. श्री.उदयन राजे भोसले आमच्या पक्षाचे आमदार होते. आमच्या पक्षाच्या आमदाराची त्यांनी गय केली नाही. माननीय श्री.गोपीनाथ गुंडे साहेबांनी ताबडतोब आदेश देऊन श्री.उदयन राजे भोसले यांना अटक केली होती. ही हिम्मत आपण करणार आहात काय ? हे माझे म्हणणे नाही. हे पवनराजे निंबाळकर यांच्या मुलांचे म्हणणे आहे. यापूर्वी सुध्दा पवनराजे निंबाळकर यांना अशा प्रकारच्या धमक्या श्री.पद्मसिंह पाटील यांच्याकडून दिल्या गेल्या होत्या. त्यावेळी पवनराजे निंबाळकर यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. परंतु त्यांना संरक्षण मिळाले नाही. माननीय गृहमंत्री महोदयांची अडचण मी समजू शकतो. आपण या घटनेचा तपास करणार नसाल तर हे प्रकरण सी.बी.आय.कडे द्यावे, अशी आमची मागणी आहे. ती मागणी आपण मान्य करणार आहात काय ? अशा पद्धतीने या राज्यातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आलेली आहे. राज्य सरकारने ताबडतोब उपाययोजना केली नाही तर, मी मघाशी सांगितले की, महाराष्ट्र राज्य हे गवताच्या गंजीवर उभे आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये स्फोटकांचे साठे आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये सिमीसारख्या संघटना काम करीत आहेत. महाराष्ट्र अशांत करण्याचे प्रयत्न अतिरेक्यांकडून होत आहेत. अतिरेक्यांनी महाराष्ट्राला टारगेट केलेले आहे. अतिरेक्यांनी मुंबईला टारगेट केलेले आहे. माननीय गृहमंत्री महोदयांनी पोलीस यंत्रणा सक्षम केली नाही तर महाराष्ट्रातील जनतेने कसे जगावयाचे ? पुढच्या कालखंडामध्ये आपल्या राज्यामध्ये एकही बॉम्बस्फोट होणार नाही अशा प्रकारे पोलीस यंत्रणेला आम्ही सक्षम करु, असा शब्द माननीय गृहमंत्र्यांनी दिला तर महाराष्ट्रातील जनता समाधानाने जीवन जगू शकेल, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....2/-

ॲड.अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विधान परिषद नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज पर्यंत या विषयावर सभागृहामध्ये ब-याच वेळा चर्चा झाली. हा विषय ब-याच वेळा सभागृहामध्ये मांडला गेला. परंतु प्रत्येक वेळी राजकीय भाषण केले जाते. माननीय गृहमंत्री आश्वासन देतात आणि पुन्हा तोच विषय सभागृहामध्ये मांडण्याची दुर्दैवी वेळ विरोधी पक्षावर येते. आजच्या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये जे विषय दिलेले आहेत, ते अतिशय गंभीर आहेत. राज्य सरकारने त्यावर निर्णय घेऊन कार्यवाही केली नाही तर येणारी पिढी उद्ध्वस्त होण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे, असे मला नमूद करावयाचे आहे. आज बॉम्बस्फोटाच्या घटनेला 10-11 दिवस पूर्ण होत आहेत. ही घटना घडल्यानंतर आपण मुंबईच्या जनतेला सलाम केला. मुंबईच्या जनतेला सलाम करण्याव्यतिरिक्त आपण काहीही करु शकत नाही. कारण मुंबईच्या जनतेचा पोलिसांवरील विश्वास उडालेला आहे. मुंबईच्या जनतेला कळून चुकले आहे की, आपण स्वत:चे रक्षण करु शकलो नाही तर मुंबईचे पोलीस आपले रक्षण करु शकत नाही. बॉम्बस्फोट झ ााल्यानंतर मुंबईच्या जनतेने एकमेकांना मदत करुन मुंबई पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला. आम्हाला या अंतिम आठवडा प्रस्तावावर राजकीय भाषण नको आहे. सरकार कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ? सरकारने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे ? आम्हाला माननीय गृहमंत्री महोदयांकडून शब्द हवा आहे की, ते यासंदर्भात काय करणार आहेत. बॉम्बस्फोटाच्या घटनेला आज 10-11 दिवस होऊन गेलेले आहेत. परंतु आज पर्यंत कोणत्याही संघटनेवर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही. आज पर्यंत असे कधीही झाले नव्हते. पूर्वी मुंबईचे पोलीस सक्षम होते. पूर्वी मुंबईच्या पोलिसांनी 24 तासाच्या आत जबाबदारी निश्चित केली होती की, हे कृत्य कोणी केले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.सुंबरे .........

ॲड. अनिल परब ....

परंतु गेले 10 दिवस मुंबईचे पोलीस अंधारात चाचपडत आहेत. त्याची शरम वाटली असेल वा दया वाटली असेल म्हणून म्हणा आता अतिरेकी संघटनाच जाहीर करू लागल्या आहेत की, तुम्ही हे शोधू शकत नाही पण आम्ही सांगतो की, आम्ही हे घडविले आहे. इतकी वाईट परिस्थिती मुंबई पोलिसांची येऊन ठेपली आहे. पूर्वी असे होत नव्हते. पूर्वी एखादा बॉम्बस्फोट झाला वा गुन्हा घडला तर कोठलीही प्रतिक्रिया लगेच दिली जात नव्हती., प्रतिक्रिया देण्यापूर्वी त्याबाबत व्यवस्थित माहिती घेऊन मगच प्रतिक्रिया दिली जात होती की, या घटनेच्या पाठीमागे कोण असू शकेल. आता अशी परिस्थिती झाली आहे की, बॉम्बस्फोट झाला की, 10 व्या मिनिटाला पोलीस अधिकारी किंवा मंत्री जाहीर करून टाकतात की, यामध्ये पाकिस्तानचा हात आहे., लष्कर-ए-तोयबा या अतिरेकी संघटनेचा हात आहे किंवा ज्या वेगवेगळ्या अतिरेकी संघटना आहेत त्यांचे नाव घेऊन जाहीर केले जाते. सभापती महोदय, मी यापूर्वीची, यापूर्वी ज्या दंगली, बॉम्बस्फोट वगैरे झाले होते त्यावेळची सर्व वक्त्यांची, मंत्र्यांची भाषणे पाहिली. त्यावेळेस तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांचे भाषणही मी वाचले. एक अतिशय चांगली गोष्ट त्यात त्यांनी सांगितल्याचे मला दिसून आले. प्रथमत: ज्यावेळेस या मुंबईत बॉम्बस्फोट झाले त्यावेळी त्यांनी पहिला आदेश असा दिला की, मुंबईमध्ये अधिकृतपणे जी स्फोटके वाटली गेली आहेत म्हणजे जे स्टॉकिस्ट आहेत त्यांच्याकडील स्फोटकांचा साठा प्रथमत: चेक करा आणि त्यातील काही स्फोटके यासाठी वापरली गेली आहेत की नाही याची माहिती घ्या. ती माहिती आल्यानंतर जेव्हा त्यांना कळले की, यातील एकही ग्रॅम स्फोटक कमी झालेले नाही. त्यावेळेस त्यांनी जाहीर केले की, या स्फोटांमागे परदेशी हात आहे. त्यासाठी वापरण्यात आलेली स्फोटके बाहेरून आलेली आहेत. पण आज परिस्थिती काय आहे ? बॉम्बस्फोट झाल्या झाल्या पोलीस अधिकारी, मंत्री जाहीर करून टाकतात, त्यांना त्या संदभात कोठलीही माहिती नाही, अंदाज नाही केवळ लोकांच्या तोंडावर कारणे फेकावयाची म्हणून अशा प्रकारची वक्तव्ये पोलिसांकडून केली जातात, मंत्र्यांकडून केली जातात. सभापती महोदय, अशा प्रकारे मुंबईच्या जनतेला अंधारात ठेवून या बॉम्बस्फोटावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला जाणार आहे काय ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. सभापती महोदय, मुंबईचे पोलीस असे का झाले ? याचा तपास आपण केला आहे काय ? मुंबईचे पोलीस स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांच्या दर्जाचे होते किंबहुना मुंबई पोलिसांचे मार्गदर्शन इतरत्र घेतले जात होते. पण आज त्याच पोलिसांना मुंबईत

...... आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ......

**( सभापती स्थानी - माननीय उपसभापती )**

बॉम्बस्फोट कोणी केले हे कळण्यासाठी 10 दिवस लागावेत यासारखी दुर्दैवाची गोष्ट कोठलीच नाही. सभापती महोदय, मुंबई पोलिसांची मानसिकता अशी का झाली ? आज मुंबईचे पोलीस अतिशय वाईट परिस्थितीमध्ये आहेत. मुंबई पोलिसांची परिस्थिती भारताच्या अर्थव्यवस्थेसारखी झालेली आहे. मुंबई पोलीस दलामध्ये जी गटबाजी आहे, त्यातून एकमेकांना संपवावयाचे, कट कारस्थाने त्यादृष्टीनेच चालू आहेत आणि त्याचाच नेमका फायदा अतिरेक्यांनी उचललेला आहे असे मला येथे सांगितले पाहिजे. मुंबई पोलीस दलातील ही गटबाजी आहे, एका पोलीस अधिकाऱ्याने दुसऱ्याला कसे खाली खेचायचे, संपवावयाचे, त्यासाठी मग एकाने दुसऱ्यावर खोटेनाटे आरोप करावयाचे, खोट्यानाट्या प्रकरणांमध्ये तो अडकला जाईल अशी स्थिती निर्माण करावयाची, जेणे करून तो अधिकारी पोलीस दलाच्या बाहेर फेकला जाईल या दृष्टीने वातावरण निर्माण करावयाचे हेच आज मुंबई पोलीस दलामध्ये, आपसात चालेले आहे. त्यातही जे चांगल अधिकारी या पोलीस दलामध्ये उरलेले आहेत त्यांना देखील खोट्यानाट्या केसेस मध्ये अडकवून टाकण्याचे काम या अतिरेकी संघटना करू लागल्या आहेत. सभापती महोदय, या अतिरेक्यांची मॅन्युअल्स आपण वाचली असतील, तशी ती वर्तमानपत्रातून देखील जाहीर झालेली आहेत. त्यांनी या अतिरेक्यांना या दृष्टीनेच प्रशिक्षण दिलेले आहे. सगळ्यांना त्यांनी हेच शिकविले आहे की, मुंबईमध्ये दंगल घडवावयाची असेल, बॉम्बस्फोट करावयाचे असतील तर त्यासाठी प्रथमत: तेथील पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करा. पोलिसांना मारा किंवा त्यांना खोट्यानाट्या केसेसमध्ये अडकवून टाका. अशा प्रकरणांतून पोलिसांचे मनोधैर्य खच्ची झाले की, मग मुंबईची कायदा व सुव्यवस्था, मुंबईची अर्थव्यवस्था खिळखिळी होण्यास वेळ लागणार नाही. मुंबईवरील पोलिसांची पकड ढिली होण्यास वेळ लागणार नाही. याचा स्पष्ट उल्लेख त्यांच्या मॅन्युअल्समध्ये झालेला आहे याची दखल माननीय गृहमंत्र्यांनी घेतली आहे असे वाटत नाही. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... जे 1 ..

ॲड. श्री. अनिल परब...

माननीय गृहमंत्र्यांनी त्या दिवशीच्या भाषणामध्ये सांगितले की, शक्तीस्थळावर हल्ले करुन मुंबईची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याबाबत केंद्र सरकारने इशारा दिला होता. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असली तरी देशातील महत्वाची आर्थिक राजधानी आहे. या राजधानीमध्ये बॉम्बस्फोट कुठे होणार आहेत, कधी होणार आहेत हे त्यांनी सांगितले नव्हते. आपल्या सरकारला केंद्र सरकारने वेळ, तारीख, जागा आणि आरोपी कळविले पाहिजेत, त्यानंतर आपण जाऊन त्या आरोपींना पकडणार अशी आपली अपेक्षा आहे काय?

**उपसभापती** : प्रस्तावावरील चर्चेची वेळ 12.30 वाजेपर्यंत आहे. प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या माननीय सदस्यांची भरपूर नावे माझ्याकडे आली आहेत. माननीय उप मुख्यमंत्र्यांना उत्तराचे भाषण करण्याकरिता अर्धा तास लागेल. त्याचप्रमाणे इतर माननीय सदस्यांना देखील संधी मिळावी याकरिता माननीय सदस्यांनी थोडक्यात मुद्देसूद भाषण करावे.

ॲड. श्री. अनिल परब : सभापती महोदय, बॉम्बस्फोट करण्याकरिता अतिरेक्यांना प्रशिक्षण दिले गेले आहे या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला. त्याबाबत महाराष्ट्राचे माननीय उपमुख्यमंत्र्यांचे असे म्हणणे आहे की, बॉम्बस्फोट होण्याची वेळ आणि ते कुठे होणार आहेत याची आम्हाला माहिती नाही. तेव्हा केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारला सर्व कळवावे अशी महाराष्ट्र सरकारची अपेक्षा आहे काय? तर मग महाराष्ट्राची गुप्तचर यंत्रणा काय करते? 1993 च्या बॉम्बस्फोटानंतर आपण त्यामधून काय शिकलो? त्याबाबतची माहिती गुप्तचर यंत्रणांनी स्वत:कडे कां ठेवली? त्या बॉम्बस्फोटामध्ये सापडलेले आरोपी नंतर जामिनावर सुटले, ते आता काय करीत आहेत? त्यांचे ट्रॅक रेकॉर्ड काय आहे? कोणत्या अतिरेकी संघटनेबरोबर त्यांचे संबंध आहेत? याची माहिती माननीय उपमुख्यमंत्र्यांना आहे कां? असेल तर त्यांनी ती सभागृहाला द्यावी. सभापती महोदय, आज महाराष्ट्र अतिशय वाईट परिस्थितीमध्ये आहे..

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी)**

सभापती महोदय, ज्या गोष्टींसाठी महाराष्ट्राच्या पोलिसांचा गौरव केला जातो, त्यांना सलाम केला जातो त्याच गोष्टीसाठी महाराष्ट्राच्या पोलिसांना शिव्या घातल्या जातात, जगभरामध्ये त्यांची नाचक्की होते. बॉम्बस्फोट होऊन दहा दिवस झाले तरी आरोपी सापडत नाहीत. आणि त्यांच्यावर जबाबदारी देखील निश्चित केली जात नाही यापेक्षा महाराष्ट्र सरकारचे अपयश काय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. श्री. अनिल परब...

असेल? हा चर्चेचा महत्वाचा विषय आहे. या पोलीस दलाचे मनोधैर्य खचले आहे, कोणतेही पोलीस स्वत:हून तपास करावयास उत्सुक नाहीत. आणि माननीय गृहमंत्र्यांना नाईलाजास्तव म्हणावे लागते की, आम्ही अे.टी.एस. ला याकरिता पूर्ण मोकळे हात दिले आहेत. तुम्ही पूर्ण तपास करा, त्यासाठी जे अधिकारी लागतील ते घ्या. सभापती महोदय, पूर्वी असे होत नव्हते. बॉम्बस्फोट झाल्यानंतर महाराष्ट्रातील कर्तबगार, सक्षम पोलीस अधिकारी ताबडतोब एक तासाच्या आत पोलीस मुख्यालयामध्ये उपस्थित राहावयाचे. आणि दोन ते तीन तासाच्या आत जे संशयित आरोपी असतील त्यांच्या नातेवाईकांना, मित्रांना उचलून आणले जायचे. अशाप्रकारे तपास सुरु व्हावयाचा. आज दहा दिवसानंतर सर्व मुस्लिम वस्त्यांमध्ये कोंबिंग ऑपरेशन सुरु आहे. काही गरीब लोकांना दोन ते तीन दिवस नाहक पोलीस स्टेशनबाहेर बसून ठेवले जात आहे. ते विदारक दृश्य आपल्याला पहावे लागत आहे. सभापती महोदय, सर्व मुस्लिम बांधव वाईट नाहीत. अतिशय गरीब असलेल्या, हातावर पोट असलेल्या 400 ते 500 मुस्लिमांना आपण पोलीस स्टेशनमध्ये आणून बसविले. बॉम्बस्फोट करणारे कोण आहेत, त्यांना नेमके शोधण्याची गरज आहे. यापूर्वी असे कधी झाले नव्हते. परंतु आज पोलीस अंधारात फिरत आहेत, त्यांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. ते म्हणतात की, "जाऊ द्या आम्हाला काय पडली आहे". पूर्वी पोलीस कर्तव्य म्हणून काम करीत होते आज नोकरी ढकलायची म्हणून काम करीत आहेत. याला सर्वस्वी सरकारच जबाबदार आहे. कर्तबगार पोलिसांना खोटया-नाटया केसमध्ये अडकविण्याचे काम अतिरेक्यांकडून होते व त्याला महाराष्ट्र सरकार बळी पडते. या संदर्भात मी काही पोलीस अधिकाऱ्यांशी बोललो.पूर्वी बॉम्बस्फोट झाल्यानंतर ज्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली त्यांच्याबरोबर बोललो. त्यांच्याशी बोलल्यानंतर एक गोष्ट लक्षात आली की, आम्ही जीव तोडून काम करावयाचे आणि छोटयाशा क्षुल्लक कारणास्तव आम्हाला शासन निलंबित करणार असेल आणि बाहेर टाकणार असेल तर आम्ही आमच्या जीवाचे रान कुणासाठी आणि कशासाठी करावयाचे?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (पुढे सुरु...

ख्वाजा युनुस प्रकरणातील आरोपी पकडले. पोलीस दलामध्ये अतिशय कर्तव्यदक्ष असलेले अधिकारी आहेत. त्यांना अडकवून ठेवलेले आहे. मग ते कशासाठी पोलीस अधिकारी मदत करतील ? बॉम्बस्फोटाचा तपास करण्याचे काम जे अधिकारी करतात, ते रात्रंदिवस काम करतात. त्यांनी एकवेळ जेवणही न घेता आरोपी शोधून काढलेले आहेत. आरोपी पकडल्यानंतर ते सुटतात कसे ? हा प्रश्न आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी ठरविले तर एखाद्या आरोपीला दोन-तीन वर्षे कसे रगडतात याची उदाहरणे मला नेहमी पहायला मिळतात. मेहनत करुन पोलीस आरोपींना पकडून आणतात, त्यानंतर कोणीतरी वरुन फोन करुन पोलिसांवर दबाव आणतात आणि आरोपीला सोडले जाते. त्यामुळे पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होते, ही वाईट परिस्थिती आहे. एक पोलीस दुसऱ्या पोलिसांकडे वेगळ्या पध्दतीने पहात असतो. "तेरी कमीज मेरी कमीज से सफेद कैसे ", अशापध्दतीने एसबी वन चा पोलीस एसबी टू कडे पहात असतो. चहा पाजण्यासाठी कोण पुढे येतो, हे पहात असतात. एकीकडे पोलीस अधिकाऱ्यांचें 25-25 फ्लॅट मुंबईमध्ये आहेत, दुसरीकडे अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना घरामधील सिलिंग अंगावर पडले तर डयुटीवर जाऊ शकू की नाही, या भीतीने त्याला रात्री झोप लागत नाही. अशी पोलीस वसाहतीतील इमारतींमधील खोल्यांची अवस्था आहे.

सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी रेट कार्ड ठरलेले आहे. एम.आर.ए.पोलीस स्टेशन, व्ही.पी.रोड पोलीस स्टेशन, दादर पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांची चढाओढ असते. आज जे पोलीस अधिकारी कर्तव्य दक्ष नाहीत ते या कामासाठी ते पुढे असतात. जे पोलीस स्टेशनच्या बाहेर साईड ब्रॅन्चेसला कर्तव्य दक्ष अधिकारी आहेत, ते पोलीस स्टेशनमध्ये केव्हा जायला मिळेल, याची प्रतिक्षा करत असतात. यामुळे कर्तव्य दक्ष अधिकारी बॉम्बस्फोटाचा तपास करतात, त्यांची मानसिकता दिवसेंदिवस खचत चाललेली आहे. या त्यांच्या मानसिकतेवर फुंकर घालण्याची आवश्यकता आहे. पोलिसांना एकसंध करण्याची गरज आहे. सभापती महोदय, पोलीस वेल्फेअरच्या दृष्टीने शासनाने काय केलेले आहे ? आज पोलीस कमिशनर त्यांच्या खालच्या अधिकाऱ्यांना कितीवेळा भेटतात, हा संशोधनाचा विषय आहे. पूर्वी वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांना विश्वासात घेत होते. त्यांना भेटण्यासाठी दिवस राखून ठेवत होते. त्यांच्याकडून तक्रारी काय आहेत, या जाणून घेतल्या जात होत्या, सुख-दु:ख जाणून घेतली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जात होती. परंतु आज वरिष्ठ अधिकारी आणि कनिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये भिंत निर्माण झालेली आहे. आज कमिशनरांमध्येच वेगळे गट, तट निर्माण झालेले आहेत. हे गट वेगवेगळया पध्दतीने काम करतात. पोलीस खात्यामध्ये एक संधता नाही. पोलीस अधिकारी श्री.नंदकुमार गोखले यांनी स्वत:च्या जीव धोक्यात घालून दंगल आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यामध्ये त्यांची निघृण हत्या झाली. याचे सांगायला दु:ख होते. आज त्या अधिकाऱ्याच्या पत्नीला 110 रु. पेन्शन मिळते.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अजून 13 सन्माननीय सदस्य बोलणारे आहेत, त्यामुळे वेळेची मर्यादा आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय मी शिवसेना पक्षाच्या वतीने चर्चेला सुरुवात केलेली आहे,मला थोडा वेळ द्यावा.

**तालिका सभापती** : आपल्याच पक्षातील आणखी चार सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहे. दुपारी 12-40 च्या आत ही चर्चा संपवायची आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, पोलीस अधिकारी श्री.नंदकुमार गोखले यांच्या पत्नीला 110 रुपये पेन्शन दिले जाते. याचे कारण ते अधिकारी डयुटीवर नव्हते आणि त्यांची सर्व्हीसही कमी झाली होती. हे खरे असले तरी ते डयुटीवर नसतांना दंगल शमविण्यासाठी गेले होते, त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला, ही गोष्ट नाकारता येणार नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ...

परंतु महाराष्ट्र शासनाची याबाबतीतील भूमिका काय आहे ? जो दंगल करतो आणि गोळीबारात मरतो त्याला तुम्ही पैसे देता परंतु जेव्हा कर्तव्य बजावणारा पोलीस अधिकारी मरतो तेंव्हा त्याला तुम्ही सगळे कायदे लावता. ही एक शोकांतिका आहे. कोणता पोलीस अधिकारी तुमचे काम करण्यासाठी जाईल ? आठ तास आपली ड्युटी करावयाची आणि बायका-पोरांना बघावयाचे अशी भावना पोलीस दलात वाढत चाललेली आहे. त्यामुळे आपल्याला हे अपयश समोर दिसते. या सगळ्या गोष्टींमध्ये महाराष्ट्र शासनाच्या प्रायोरिटीज बदललेल्या आहेत. लोकांच्या सुरक्षिततेला माननीय गृहमंत्र्यांची प्रायोरिटी असली पाहिजे. या राज्यातील, या शहरातील लोक सुरक्षित असले पाहिजेत यासाठी प्रायोरिटी असली पाहिजे. राज्यामध्ये डान्स बारबंदीला प्रायोरिटी आहे. रात्री 12.00 वाजता पोलीस स्टेशनची अवस्था बघावी. मी दिवसरात्र पोलीस स्टेशनला जाणारा कार्यकर्ता असल्यामुळे मला पोलीस दलाच्या बाबतीत माहिती आहे. रात्री 12.00 वाजता जे डान्स बार चालू आहेत ते बंद करु या असा त्यांचा एककलमी कार्यक्रम असतो. यामध्ये दोन फायदे आहेत. एक म्हणजे जर डान्स बार चालू असेल तर पैसे मिळतील आणि समजा डान्स बार बंद झाला असेल तर शाबासकी मिळेल. डान्स बारबंदीला प्रायोरिटी आहे. डान्स बार बंद झाले पाहिजेत हे मला पूर्णपणे मान्य आहे. याबाबतीत घेतलेला निर्णय चांगला आहे. परंतु लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जी माहिती दिली पाहिजे यादृष्टीने गुप्तचर यंत्रणा अधिक सक्षम व्हावयास पाहिजे होती. गुप्तचर यंत्रणेबरोबरच पोलीस दल कसे सक्षम केले जाईल याचा विचार झाला पाहिजे. आता राजपत्रित अधिकाऱ्यांच्या बदल्या मंत्रालयातून होणार आहेत. मंत्रालयात बसणाऱ्या अधिकाऱ्यांना निर्मलनगरला कोणता अधिकारी पाहिजे, भिवंडीला कोणता अधिकारी पाहिजे, दादरला कोणता अधिकारी पाहिजे हे माहीत नसते. मंत्रालयामध्ये बसून त्यांच्या बदल्या होणार आहेत. त्यामुळे पोलीस दलाचा दर्जा यापेक्षा आणखी खालावणार आहे. यापुढे अतिशय वाईट परिस्थिती येणार आहे. जे पोलीस अधिकारी सक्षम आहेत ते चांगले काम करु शकत नाहीत. पोलीस स्टेशनचा रेटकार्ड ठरलेला आहे. कोणत्या रेटला कोणत्या पोलीस स्टेशनला बदली मिळते हे त्यांना माहीत असते. सरळमार्गी पोलीस अधिकारी असेल तर तो चांगल्या पोलीस स्टेशनला जाऊ शकत नाही. ज्या ठिकाणी गुन्हे कंट्रोल करावयाचे आहेत अशा पोलीस स्टेशनला असे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

ॲड. अनिल परब ....

अधिकारी पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पोलिसांची मानसिकता खालावत आहे. पोलीस आयुक्त त्यांना किती वेळ भेटतात ? पोलीस आयुक्त आणि इतर वरिष्ठ अधिकारी पंचतारांकित हॉटेल्समध्ये जेवढा वेळ घालवतात त्यातील थोडा वेळ जरी त्यांनी पोलिसांसाठी दिला तर पोलिसांची टीम एकत्र होण्यामध्ये हातभार लागेल. पोलीस वेल्फेअर फंडामध्ये किती पैसे आहेत ? पोलीस क्लबमध्ये वरिष्ठ अधिकारी काय करीत आहेत ? या सगळ्यांचा शोध या निमित्ताने घेण्याची गरज आहे. आज अफरोज सारखा आरोपी 90 दिवसात चार्जशीट दाखल झाली नाही म्हणून सुटतो. ही पोलीस अधिकाऱ्यांची नाचक्की आहे. यामुळे पोलीस अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासले गेले आहे. एका अतिरेक्याच्या बाबतीत आपण 90 दिवसात आरोपपत्र दाखल करु शकत नाही. खोटे तर खोटे पण जे काही आरोप करावयाचे आहेत ते आरोप लावावयास पाहिजे होते.

**तालिका सभापती ( श्री. गुरुनाथ कुलकर्णी )** : सन्माननीय सदस्य ॲड अनिल परब यांनी आपले भाषण लवकर संपवावे. मी आपल्याला सांगितले की, या प्रस्तावावर आणखी 13-14 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. नंतर पुन्हा अशी तक्रार होईल की, एका सदस्याला जास्त वेळ मिळतो आणि दुसऱ्या सदस्याला कमी वेळ मिळतो. मी आपल्याला दोन तीन वेळा सांगितलेले आहे. अन्य शिवसेनेच्या सदस्यांचा वेळ सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांना देण्यास सांगितले तर माझी हरकत नाही. भारतीय जनता पक्षाचे 7 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही नावे दिलेली आहेत.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावरील चर्चा अडीच तासात संपवावयाची आहे. या प्रस्तावावर दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य बोलणार आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शिवसेना पक्षासाठी किती वेळ उपलब्ध आहे ?

**तालिका सभापती** : आपण शिवसेनेच्या इतर सदस्यांचा वेळ सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांना देणार असाल तर माझी हरकत नाही. या ठिकाणी वेळेबद्दलचा तक्ता माझ्यासमोर आहे. या सभागृहामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, जनता दल आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील असे मिळून 49, शिवसेनेचे 12 आणि भारतीय जनता पक्षाचे 13 अशी एकूण सदस्य संख्या आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 11:00

(तालिका सभापती...

डॉ. एम.अे.अझिज : सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलण्यासाठी आपण पक्षनिहाय वेळ ठरवून द्यावा.

तालिका सभापती : अंतिम आठवडा प्रस्ताव हा विरोधी पक्षाकडून येत असल्यामुळे त्यावर बोलण्यासाठी विरोधी पक्षाला अधिक वेळ दिला पाहिजे हे मला मान्य आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर आटोपते घेतले तर इतर सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्याची संधी मिळेल.

ॲड. अनिल परब : या चर्चेमध्ये गेलेला वेळ मला वाढवून द्यावा.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

ॲड. अनिल परब : आज पोलिसांची मानसिकता तुटलेली आहे आणि त्यांची ही तुटलेली मानसिकता उभी करण्याची गरज आहे. या सगळया गोष्टीवर माननीय गृहमंत्र्यांचे नियंत्रण असले पाहिजे, वचक असला पाहिजे, दरारा असला पाहिजे. क्रीम पोस्टींगच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी पोलिसांना दम भरला. त्यांनी सांगितले, "माझ्याकडे कोणी पोस्टिंग मागायला याल तर खबरदार !" पण हे अधिकारी थेट तुमच्याकडे पोस्टिंग मागायला कशाला येतील ? पोस्टिंग मिळण्याच्या बाबतीत कोण कोण दलाल आहेत, कोणत्या अधिका-यांनी शिफरस केली म्हणजे पोस्टिंग मिळेल हे पोलीस अधिका-यांना माहीत आहे. मग ते गृहमंत्र्यांकडे पोस्टिंग मागायला कशाला जातील ? माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांची प्रतिमा फार चांगली आहे. परंतु केवळ प्रतिमेवर राज्य चालत नाही. गृहमंत्री म्हणून राज्याच्या पोलीस यंत्रणेवर दरारा असावा लागतो आणि पोलिसांचा गुन्हेगारांवर दरारा असावा लागतो. पोलीस हे जनतेचे मित्र आहेत असे म्हटले जाते. परंतु खरोखरच अशी परिस्थिती राज्यामध्ये आहे काय ? मी माननीय गृहमंत्र्यांना आव्हान देतो, त्यांनी माझ्याबरोबर पोलीस स्टेशनला भेट द्यावी. पोलीस स्टेशनचा एक तरी अधिकारी शुध्दीवर असतो का ते पहावे. अधिकारी शुध्दीवर नसतात याचे कारण हे शासनच शुध्दीवर नाही. शासनाचा या अधिाका-यांवर कोणताही दबाव नाही. रात्री पोलीस स्टेशनला फोन करायला भीती वाटते, नव्हे लाज वाटते असे म्हटले तरी ते वावगे होणार नाही.रात्री पोलीस स्टेशनला फोन करुन सांगितले की मी आमदार बोलतोय, तर पलिकडून उत्तर दिले जाते की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड अनिल परब...)

"कोण आमदार ?, रात्री आमदार-बिमदार कोण नाही." पोलीस साधे बोलण्याच्याही मन:स्थितीत नसतात, ते शुध्दीत नसतात. या सर्व पार्श्वभूमीवर पोलिसांना सक्षम बनवयाचे असेल तर त्यासाठी पाहिल्यांदा राज्य शासन शुध्दीवर असायला पाहिजे. 1993मध्ये बॉम्बस्फोट झाले त्यावेळी राज्याच्या माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, मुंबईची जनता एक कोटी आहे आणि पोलीस फक्त 27 हजार आहेत. आता ही संख्या दीड कोटी झालेली आहे तर मग किती पोलीस असायला पाहिजेत ? लोकांच्या सुरक्षेला राज्याने पहिले प्राधान्य दिले पाहिजे. त्यासाठी निधी कमी पडू देता कामा नये. ही जबाबदारी राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय गृहमंत्र्यांनी घेतली पाहिजे. आज परिस्थिती अशी आहे की, पोलिसांना रेनकोट हे कोणी तरी स्पॉन्सर करावे लागतात. उद्या पावसाळयात एखादी घटना घडली तर रेनकोट नाहीत म्हणून पोलीस त्या ठिकाणी जाणार नाहीत की काय ? आज प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये कोणी तरी बिल्डर येतो का याची पोलीस वाट पाहात असतात. तो आल्यानंतर त्याला कुठे लाद्या बसवून देण्यास सांगितले जाते, कुठे शौचालय बांधून देण्यास सांगितले जाते, रंगरंगोटी करण्यास सांगितले जाते. आज सर्व पोलीस स्टेशन्स ही लोकांकडून पैसे घेऊन बांधली जात आहेत. परंतु ज्या ज्या लोकांनी पोलीस स्टेशन्स बांधण्यासाठी पैसे दिलेले आहेत त्यांची पार्श्वभूमी काय आहे, पैसे देण्यामागे त्यांचा काय स्वार्थ आहे हे तपासून पाहाण्याची गरज आहे. जोपर्यन्त शासन आपली भूमिका कणखर आणि मजबूत करत नाही तोपर्यन्त पोलिसांचे मनोधैर्य उंचावणार नाही. आज जम्बु सुगंध सारखे पोलीस अधिकारी पिक्चरसाठी फायनान्स करीत आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 11:05

ॲड.अनिल परब.............

आज मुंबईतील सगळयात मोठे खंडणीखोर पोलीसच आहेत असे सगळया वृत्तपत्रात छापून येते. हे खंडणीचे धंदे शिकविले कोणी? खाकी वर्दीतले सगळे खंडणीखोर म्हणून पोलिसांकडे बघितले जाते. त्यांची प्रतिमा सुधारण्याची गरज आहे. जे गँगस्टर पकडले जातात ते सुध्दा पोलिसांनी वाटून घेतले आहेत. छोटा राजन गँग एका अधिकाऱ्याकडे, छोटा शकील गँग दुसऱ्या अधिकाऱ्याकडे, दाऊद गँग तिसऱ्या अधिकाऱ्याकडे असते. पोलीसच या गँगच्या माणसांना पकडून आणतात. पकडल्यानंतर खरे म्हणजे पोलीस स्टेशनमध्ये आणले पाहिजे. परंतु या मुंबई शहरामध्ये पोलिसांनी जवळजवळ 25-30 फ्लॅट खाजगी ठिकाणी खरेदी करुन ठेवले आहेत, तेथे या पकडलेल्या गँगच्या लोकांना घेऊन जातात आणि तेथे सौदा केला जातो. किती लाख देतो बोल? नाही तर एन्काऊंटर केले जाईल. जर एन्काऊंटर करावयाचे नसेल तर ताबडतोब पैसे पाहिजेत. सभापती महोदय, मी एक मजेदार किस्सा सांगतो. पकडून आणलेला गँगचा माणूस सांगतो, माझ याकडे आता पैसे नाहीत. पैसे नाहीत तर मी तुला पैसे देतो परंतु मी 25 लाख दिले तर उद्या मला 30 लाख परत पाहिजेत असे अधिकारीच सांगतात. म्हणजे पकडणारा अधिकारी तोच, फायनान्स करणारा अधिकारी पण तोच. खरे म्हणजे खंडणी, व्याज, सावकारी हे सगळे धंदे पोलिसांचेच झालेले आहेत. अशा वाईट परिस्थितीत पोलीस काम करतात आणि एक पोलीस अधिकारी दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याकडे बघतो. एक पोलीस अधिकारी म्हणतो, दुसरा अधिकारी हे करतो मग त्यानेच काम करावे, त्या कामात मग मी कशाला? फक्त सरकारच्या पगारामध्ये मी माझ ा जीव धोक्यात का घालू? त्यालाच करु देत. त्याच्याबद्दलच्या तक्रारी पोलीस आयुक्तांकडे आहेत, त्याच्याबद्दलचा अहवाल पोलीस आयुक्तांकडे आहे. एक साधा पोलीस सब इन्स्पेक्टर स्वत: पोलीस आयुक्त असल्याच्या थाटात मुंबईमध्ये स्टेटमेंट करतो की, माझ्या कामात कोणी काहीही करु शकत नाही, वरपासून खालपर्यंत सगळयांना हवे ते मी पुरवितो. ही मुजोरी, ही मस्ती पोलिसांची चालली आहे. मला आठवते, माझ्या लहानपणी मी अभ्यास करीत नव्हतो तेव्हा माझी आई मला सांगायची, जास्त गडबड करशील, अभ्यास करणार नसशील तर मी तूला पोलिसांकडे देईन. आज जर मी माझ्या मुलाला असे सांगितले तर तो मला म्हणेल की, तुम्ही मला जो पॉकेटमनी देता तो मी पोलिसांना देईन आणि घरी येईन. आज लोकांचा पोलिसांवरील विश्वास उडत चालला आहे. सभापती महोदय, भिवंडी येथे दंगल झाली. मी ज्या ज्या ठिकाणी दंगली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब..........

झाल्या तेथे कार्यकर्ता म्हणून दंगल शमविण्यासाठी काम केलेले आहे. मी नेहमी सांगतो, मी मुस्लिम वस्तीच्या जवळ राहतो. सगळे मुस्लिम वाईट नाहीत. आपल्या पोटासाठी हातावर काम करणारे गरीब लोक आहेत. परंतु अतिरेकी, अतिरेकी संघटनांशी संबंधित, बाहेरच्या प्रांतातून जे लोक या शहरात आले त्यांना मुंबई अशांत करावयाची आहे. त्यांना या शहरामध्ये शांतता नको आहे. त्यांच्या दबावासमोर गरीब बिचारे मुसलमान काही करु शकत नाहीत. मागील वेळी मी गृहमंत्र्यांना आवाहन केले होते, आमदार फंडातून मुस्लिम वस्त्यांच्या तोंडावर पोलीस चौकी बांधण्याचा प्रयत्न करावा. आम्हाला पोलीस चौकी हवी आहे अशी त्यांची मागणी असते. परंतु तेथे अतिरेकी संघटनांशी संबंधित असलेले लोक पोलीस चौकी होऊ देत नाहीत. ते लोक विरोध करतात. त्यांच्या दबावाला गरीब मुस्लिम जनता बळी पडते. एखादी दंगल झाली तर कित्येक मुसलमानांच्या घरामध्ये दोन-दोन महिने चूल पेटलेली नाही हे मी पाहिले आहे. मुस्लिम समाजाला मुद्दाम अशिक्षित ठेवले जाते. या अतिरेक्यांचा ट्रॅक रेकॉर्ड बघा. सगळे प्रोफेसर झालेले, इंजिनिअर झालेले, डॉक्टर झालेले असे तरुण लोक आहेत. याचा अर्थ काय आहे? अतिशय व्यवस्थित प्रशिक्षण देऊन या अतिरेकी संघटना गरीब मुस्लिमांचा फायदा घेऊन काम करतात. या लोकांना वयाच्या 13व्या, 14व्या वर्षी गरिबीचा फायदा घेऊन उचलले जाते. त्यांच्या मनावर असे बिंबवले जाते की, हा देश तुमचा दुष्मन आहे. या देशात रहायचा तुम्हाला अधिकार नाही. या देशातील लोक तुमच्यावर, मुस्लिम लोकांवर अत्याचार करतात. सभापती महोदय, या सभागृहात अनेक मुस्लिम समाजाचे सदस्य आहेत. या देशात त्यांच्यावर अत्याचार केले जातात का हे छातीठोकपणे त्यांनी सांगावे. या देशात देशप्रेमी मुस्लिमांची नेहमीच कदर केली गेली आहे. अन्यथा श्री.ए.पी.जे.अब्दुल कलाम हे या देशाचे राष्ट्रपती झाले नसते.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ......

ही कदर आहे. राष्ट्रप्रेमी लोकांची ही कदर आहे, या देशाच्या राष्ट्रप्रेमी मुसलमानांची ही कदर आहे, चांगल्या मुसलमान लोकांची ही कदर आहे. परंतु आपल्या राज्यातील काही भाग असे आहेत की, भारताबरोबर जर पाकिस्तान जिंकला तर त्या ठिकाणी झेंडे फडकविले जातात, फटाके वाजविले जातात. अशा लोकांचा विरोध करण्यासाठी आम्ही उतरलो तर त्या भागातील मुसलमानांनी आम्हाला पाठिंबा दिला पाहिजे, आमचे समर्थन केले पाहिजे, आमच्या पाठिशी उभे राहिले पाहिजे परंतु सभापती महोदय, असे होतांना तरी आम्हाला कधी दिसले नाही. बॉम्बस्फोटात जे अतिरेकी पकडले गेले आहेत त्यांच्या बाबतीत पोलिसांकडे काय माहिती आहे? पूर्वी आरोपी पकडला तर त्याला रोज पोलीस स्टेशनवर हजेरी लावावी लागत होती, तो काय करतो, कोठे जातो याची सर्व माहिती घेतली जात होती परंतु आज मात्र सर्व परिस्थिती उलटी झालेली आहे. आज 1993 च्या बॉम्बस्फोटाची फाईल बाजूला ठेवण्यात आलेली आहे. जोपर्यंत तुम्ही ही फाईल हाताळत नाही तोपर्यंत तुम्हाला कोण कोण गुन्हेगार आहेत, अतिरेकी कोण आहेत हे कसे समजेल? सभापती महोदय, 1993 च्या स्फोटातील आरडीएक्स हे दिघी आणि मसळा या ठिकाणावरुन उतरविण्यात आले होते. . या प्रकरणाच्या संदर्भात जेव्हा चौकशी करण्यात आली तेव्हा त्यामध्ये कस्टमचे काही अधिकारी सापडले होते. या कस्टमच्या अधिका-यांना जेलची हवा खाली लागली, अजून सुध्दा काही अधिकारी जेलमध्ये सडत आहेत त्यामुळेच आता या ठिकाणावरुन आरडीएक्स न उतरवता आता हे आरडीएक्स मालेगाव आणि संभाजीनगरामध्ये आढळून आलेले आहे. त्यामुळे इंटेलिजन्स ब्युरो बरोबर काम करीत नाही हे सिध्द होत आहे. त्यामुळे ही स्फोटके आणणारे कोण आहेत? स्फोट घडविणारे कोण आहेत? याबाबत सरकारला अजून तरी काहीही माहिती मिळालेली नाही. दिशाहीन पार्श्वभूमीवर बॉम्बस्फोटाचा तपास चालू आहे. बॉम्बस्फोटाचा एकही आरोपी अजून पोलिसांना सापडलेला नाही. जे कर्तृत्ववान पोलीस अधिकारी आहेत त्यांना परत या ठिकाणी आणण्याची आवश्यकता आहे. आज पोलिसांमध्ये गरीब आणि श्रीमंत असा भेदभाव निर्माण झालेला आहे. गरीब आणि श्रीमंत असे गट पोलिसांमध्ये पडलेले आहेत. सभापती महोदय, आज अबू आझमी सारखा नेता महाराष्ट्र सरकारला आव्हान देत आहे. "हिंमत असेल तर मला अटक करुन दाखवा" असे आव्हान तो महाराष्ट्र सरकारला देत

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ......

आहे परंतु या राज्याचे गृहमंत्री यासंदर्भात मूग गिळून बसले आहे. त्यामुळे यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी त्यांना इशारा दिला पाहिजे. परंतु या प्रकरणाच्या बाबतीत इशारा न देता दुसरीकडेच ते इशारा करीत आहेत. हे सरकार नामर्दाचे नाही हे माननीय गृहमंत्र्यांनी दाखवून दिले पाहिजे. गडबड करणारे जर हिंदू असतील तर त्यांच्यावर देखील कडक कारवाई झाली पाहिजे. परंतु एकाला एक न्याय आणि दुस-याला दुसरा न्याय असे आज चालले आहे. गुजरातचे मुख्यमंत्री श्री. मोदी महाराष्ट्रत मुंबईच्या बॉम्बस्फोटात मृत झालेल्या व्यक्तींना श्रध्दांजली देण्यासाठी आले असतांना त्यांच्या विरुध्द वादंग उठविले जाते, त्यांना गद्दार म्हटले जाते परंतु अबू आझमी महाराष्ट्र सरकारला आव्हान देत असतांना सुध्दा त्यांच्या संदर्भात काहीच केले जात नाही. सभापती महोदय ज्यावेळेस बांद्रयाच्या झकेरिया नगरमध्ये कोम्बींग ऑपरेशन चालू होते त्यावेळेस स्वर्गीय खासदार श्री. सुनील दत्त त्या ठिकाणी आले आणि त्यांनी ते कोम्बींग ऑपरेशन बंद पाडले व त्यामुळे पोलिसांना परत जावे लागले होते. त्यामुळे अशाच प्रकारचे कोम्बींग ऑपरेशन अशा वस्त्यांमध्ये करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, बॉम्बस्फोट करणा-याचा मेंदू पाकिस्तान किंवा दुबईत बसून काम करीत असेल परंतु बॉम्बस्फोट घडविणारे हात येथीलच असणार आहेत. त्यामुळे बॉम्बस्फोट करणारे हात कोण आहेत याचा शोध लागण्याची आवश्यकता आहे. हे बॉम्बस्फोट घडविणारे कोण आहेत? त्यांना आसरा कोण देतो? हे शोधण्याची आवश्यकता आहे. या लोकांना खरे म्हणजे स्थानिक लोकच आसरा देत असतात त्यामुळे हे स्थानिक लोक कोण आहेत हे शोधण्याची आवश्यकता आहे. या स्थानिक लोकांना शोधले तरच पोलिसांचे मनोबल वाढू शकेल, ऊंचावू शकेल. मला खात्री आहे की, जर अशा लोकांचा शोध लावला तरच बॉम्बस्फोटाचा तपास व्यवस्थित लागू शकेल.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिकासभापती श्री.विनोद तावडे )**

ॲड.अनिल परब.........

तेव्हा मी माननीय गृहमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या सर्व गोष्टींवर बारकाईने विचार करण्याची आवश्यकता आहे. केवळ पोलीस अधिकारी सांगतात म्हणून त्यांचेवर 100 टक्के विश्वास न ठेवता या क्षेत्रात काम करणाऱ्या आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचे मत देखील विचारात घेतले पाहिजे. आम्ही महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी जरुर आपणास जरुर मदत करु. जे अतिरेकी कारवाया करणारे आहेत त्यांना ठेचून काढले पाहिजे जेणेकरुन त्यांना कोणताही अपराध करताना भय वाटले पाहिजे. तेव्हा अशाप्रकारचा कठोर निर्णय घेऊन माननीय गृहमंत्र्यांनी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्य यांनी नियम 259 अन्वये उपस्थित केलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने गृह विभागाचे पोस्टमार्टेम करण्याची वेळ आलेली आहे. मुंबई शहरात वा महाराष्ट्रात ज्या काही घटना घडल्या, त्यामध्ये बॉम्बस्फोट असोत, अत्याचार असो, पोलिसांनी केलेला अतिरेक असो, या संदर्भात जे प्रश्न उपस्थित करण्यात आले, ते निश्चितपणे गंभीर आहेत. त्या दृष्टीकोनातून या सर्व प्रकरणाची गृह विभागाने दखल घेणे नितांत गरजेचे झाले आहे. दिनांक 11 जुलै 2006 रोजी रेल्वेमध्ये 11 मिनिटांच्या अंतराने 7 बॉम्बस्फोट झाले. त्यामध्ये जवळपास 200 निरपराध लोकांचा मृत्यू झाला. 700 हून अधिक निरपराध लोक जखमी झाले. ही अतिशय चिंताजनक गोष्ट आहे. या घटनेला आता 10 दिवसांचा कालावधी झालेला आहे. पण या 10 दिवसांमध्ये अतिरेकऱ्यांचा कोणताही सुगावा वा मागोवा पोलिसांना लागलेला नाही. यावरुन पोलीस विभागाचे इंटीलिजन्स फेल्युअर झाल्याचे स्पष्टपणे जाणवते. वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्या तसेच मीडियामध्ये येणाऱ्या बातम्या यावरुन पोलीस विभागाच्या इंटीलिजन्स विभागाची पुनर्रचना करण्याची गरज निर्माण झालेली आहे. पोलीस खाते अधिक कार्यक्षम करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी भिवंडीचे उदाहरण दिले जाते. देशातील आणि राज्यातील मुस्लिम समाजाबद्दल वारंवार बोलले जाते आणि सांगितले जाते की, सर्व मुस्लिम वाईट नाहीत, पण जे समाजविघातक कृत्य करणारे आहेत त्यांचेवर कडक कारवाई केली पाहिजे. समाजविघातक कृत्य करणारे मग ते कोणत्याही धर्माचे असोत,त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळता कामा नये, त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. असेही सांगितले जाते की, भारत पाकिस्तान क्रिकेटची मॅच असो वा हॉकीची मॅच असो, पाकिस्तान जिंकला की, "पाकिस्तान झिंदाबाद" चे नारे देण्यात येतात. पण मी याठिकाणी सांगू इच्छितो की, माझ्या आजपर्यंतच्या कार्यकाळात मुस्लिम समाजाने अशाप्रकारच्या घोषणा दिल्याचे मला आठवत नाही. परंतु अशाप्रकारचा खोडसाळपणा करुन मुस्लिम समाजाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. भिवंडी येथे जी दुर्दैवी घटना घडली

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .............

त्या घटनेचा अभ्यास करुन मी या निर्णयप्रत आलो आहे की, पोलिसांच्या इंटीलिजन्स फेल्युअरमुळे भिवंडीत संघर्ष झाला. मुंबई झालेल्या बॉम्बस्फोटाला 10 दिवस होऊनसुध्दा पोलिसांना अतिरेक्यांचा कोणताही सुगावा लागलेला नाही. पूर्वी मुंबईच्या पोलिसांची तुलना स्कॉटलंडच्या पोलिसांबरोबर व्हायची. पण आज ती प्रतिमा पोलिसांनी धुळीला मिळविली आहे. आज पोलीस खात्यामध्ये उदासीनता आलेली आहे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ D/ पूर्वी श्री.अजित... 11:20

प्रा.जोगेंद्र कवाडे..

त्याचा देखील शोध घेणे आवश्यक आहे. याठिकाणी माननीय ॲड.परब साहेबांनी सांगितल्याप्रमाणे, पोलीस स्टेशनचा ऑक्शन केला जातो. बदली, बढतींमध्ये असे प्रकार घडतात. त्यामध्ये अकार्यक्षम लोकांना संधी दिली जाते व कार्यक्षम लोकांना डावलले जाते. त्यामुळे कार्यक्षम लोकांमध्ये उदासिनता व वैक्षम्य निर्माण होते. त्याचा परिणाम निश्चितच पोलीस खात्याच्या कार्यक्षमतेवर होत असतो, त्यामुळे याबाबतची दखल गृह विभागाने घेणे आवश्यक आहे. आज आपल्याला माहीत आहे की, निरपराध लोकांना पोलीस वेठीस धरतात. आज अनेक ठिकाणी अवैध धंदे पोलिसांच्या आशिर्वादाने चालू आहेत. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी अवैध धंदे गुंडाळलेल्या लोकांना अवैध धंदे का बंद केले ? ते पुन्हा सुरु का करीत नाही, अशा प्रकारचा दबाव पोलिसांकडून आणला जातो. अशा प्रकारे पोलिसांकडूनच अवैध धंद्यांना चालना दिली जात आहे.

सभापती महोदय, नागपूर विभागातील लोणारा येथील कु. कांचन मेश्राम या 17 वर्षीय दलित तरुणीला उचलून शेतामध्ये नेऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आला व नंतर तिचा निर्दयपणे खून करण्यात आला. ही घटना दि.18 डिसेंबर,2005 ची असून अजूनही या प्रकरणातील आरोपीला अद्यापपर्यंत पोलीस शोधू शकले नाहीत वा त्यावर कारवाई करु शकले नाहीत, अशा प्रकारे आज पोलीस खात्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आज अनेक ठिकाणी दलितांवर, आदिवासींवर अत्याचार होत आहेत. अशा प्रकारचे प्रकार ठाणे, रायगड जिल्हयांमध्ये झालेले असून त्याची दखल पोलीस खाते घेत नाही. धनदांडगे लोक अशा प्रकारे अत्याचार करीत असून त्यास आपण प्रवृत्त करीत आहात. आपण धनदांडग्या लोकांना संरक्षण देत आहात. यामुळे अत्याचार करण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

सभापती महोदय, दि.5 जुलै,2006 रोजी नांदेड जिल्हयातील येवती गावामध्ये काही जातीयवादी सवर्णांकडून दलित बौध्दांच्या वस्तीवर हल्ला करण्यात आला. त्यांनी वस्तीतील दलितांना जातीवाचक शिवीगाळ करुन लाठया, काठया, दगड, कु-हाड यासारख्या प्राणघातक शस्त्रानिशी दलित वस्तीवर हल्ला चढवून अत्यंत निर्दयपणे सापडेल त्याला मारण्यात आले. यात जवळपास 50 ते 60 स्त्री-पुरुष अत्यंत गंभीररित्या जखमी झाले असून, सध्या ते शासकीय धर्माबाद रुग्णालयात उपचार घेत आहेत. या हल्ल्याची तक्रार धर्माबाद पोलीस स्टेशनमध्ये दिली असता, हल्लेखोरांवर ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत कारवाई न करता पोलीस निरीक्षक श्री.अलसटवार यांनी

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे..

उलट 59 दलित बौध्दांवर 307 कलमान्वये गुन्हा नोंदवून कारवाई केली. अशा प्रकारे याठिकाणी पोलिसांकडून भेदभावादी वागणूक दिली जाते. याठिकाणी निरपराध लोकांवर कारवाई करण्यात आली व गुन्हेगारांना पोलिसांनी मोकळे सोडून दिले आहे. यासंदर्भात आमच्या रिपब्लीकन पक्षाचे जिल्हा प्रमुख श्री.डी.डी.वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली धर्माबाद तहसिल कार्यालय व पोलीस स्टेशनवर आंदोलन करण्यात आले. परंतु त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही. या अंतिम प्रस्तावाच्या निमित्ताने बोलत असताना अशा प्रकारची गृह विभागाची दशा झालेली आहे. याठिकाणी गृह विभागाच्या महाराष्ट्रातील व मुंबईतील पोलीस खात्याचे शुध्दीकरण व आधुनिकीकरण होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे बॉम्बस्फोटाचा शोध घेण्याच्या दृष्टीने ए.टी.सी. निर्माण करण्यात आली त्याप्रमाणे आपण स्पेशल टास्क फोर्स निर्माण केला पाहिजे.

सभापती महोदय, राज्यांमध्ये दलितांवर, आदिवासींवर पोलीस अतिशय बेछूटपणे कारवाई करतात, मात्र आतंकवाद्यांविरुध्द अशा प्रकारचे मवाळ धोरण स्वीकारले जाते, हे योग्य नाही. अशा प्रकारे पोलिसांमार्फत जो राज्यात आतंकवाद निर्माण केला जातो, तो थांबला पाहिजे. काल टी.व्ही.वर मी पाहिले की, बोरिवलीमध्ये रस्त्यावरुन जाताना एका तरुणीवर ब्लेडने वार करण्याचा प्रकार घडला.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती, श्रीमती सुधा जोशी)**

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

त्यामुळे बोरीवली भागामध्ये तरुणींमध्ये दहशत आणि भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्या आरोपिंनी ब्लेडने वार करुन मुलींना जखमी केले आहे त्यांना पकडण्यात अद्याप पोलिसांना यश आलेले नाही. पोलिसांच्या अकर्मण्यतेमुळे अशा प्रकारे गुन्हेगारांना वाव मिळतो आहे. मग ते अंडरवर्ल्डमधील गुन्हेगार असो किंवा ओव्हरवर्ल्डमधील गुन्हेगार असो ते अधिक उजळ माथ्याने गुन्हे करतांना आपल्याला दिसत आहेत.

सभापती महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने गृह विभागासाठी माझ्या काही सूचना आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पोलीस विभागाचे शुध्दिकरण करणे ही प्रमुख सूचना आहे. पोलीस दलातील बढत्या, बदल्यांच्या प्रकरणांमध्ये पक्षपातीपणा थांबविला गेला पाहिजे. पोलीस दलाला अधिक सक्षम बनविण्यासाठी, मुंबई पोलिस दलाला स्कॉटलंड यार्ड पोलिसांसारखी प्रतिमा पुन्हा प्राप्त करुन देण्यासाठी पोलीस खात्याचे अत्याधुनिकीकरण करण्याची गरज आहे. या खात्याचे सन्माननीय मंत्री, श्री.आर.आर.पाटील हे निश्चितपणे यादृष्टीने प्रयत्न करीत आहेत. परंतु, यादृष्टीने आणखी जास्त प्रयत्न करुन पोलिसांना नैतिक, मानसिक बळ प्रदान करुन हे पोलीस खाते अधिक कर्तव्यदक्ष, कार्यक्षम होण्याच्या दिशेने पावले टाकणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

---------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ D/

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 259 अन्वये उपस्थित केलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये याच विषयावर दोन वेळा चर्चा या सदनामध्ये होत आहे. मागील चर्चेत भाग घेतांना मी असे सांगितले होते की, कोस्टल एरियाचे संरक्षण प्राधान्याने केले पाहिजे. सन्माननीय सदस्य, श्री.अनिल परब यांनी या ठिकाणी सांगितले की, आता अतिरेक्यांकडून स्फोटके ठेवण्याच्या जागा बदलल्या आहेत. मी त्यांच्या मताशी पूर्णपणे सहमत आहे. स्फोटके उतरविण्याच्या जागा त्याच आहेत परंतु ही स्फोटके स्टॉक करण्याच्या जागा अतिरेक्यांनी बदलल्या आहेत. आपल्या राज्याला जवळ जवळ 700 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. प्रामुख्याने जी तस्करी चालते ती याच समुद्र किनारी चालते आणि म्हणून या समुद्र किना-यांचे संरक्षण शासनाने अधिक सक्षमपणे केले पाहिजे, अशा प्रकारची मागणी मी केली होती. परंतु, तशा पध्दतीचे संरक्षण राज्य शासनाकडून दुर्दैवाने होत नाही. याची प्रमुख कारणे आपण बघितली तर अपुरा पोलीस वर्ग, अकार्यक्षम यंत्रणा, पोलिसांना आवश्यक असणा-या अत्याधुनिक साहित्याची कमतरता, अशा आणि इतर कारणांमुळे आपण सागर किना-यांचे संरक्षण चांगल्या पध्दतीने करु शकत नाही. सध्या सागर किना-यांवर जी संरक्षण यंत्रणा आहे ती ठराविक ठिकाणी आहे. त्यामुळे आरडीएक्ससारखी स्फोटके या किना-यांवर येतात, सुखरुपपणे उतरविली जातात आणि राज्यातील काही भागात पाठविली जातात. म्हणून या प्रश्नाकडे शासनाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. समुद्र किना-यांवर वेगवेगळया ठिकाणी ही स्फोटके उतरविली जातात आणि औरंगाबाद, मालेगाव या ठिकाणी पाठविली जातात. सध्या वर्तमानपत्रात पोलीस तपासाचा जो तपशिल वाचावयास मिळतो त्यामध्ये प्रामुख्याने या दोन शहरांचा उल्लेख होत आहे. किनारपट्टीच्या संरक्षणात्मक तपशिलात आपण गेलो तर आपल्या असे लक्षात येईल की, मुंबई किनारपट्टीवरच पोलीस दलाच्या बोटी उभ्या करुन ठेवलेल्या असतात. या बोटींची गती केवळ 2 ते 3 नॉटिकल मैल प्रति तास एवढी आहे. अतिरेकी जी जहाजे किंवा बोटी वापरतात त्यांची गती मात्र 40 ते 45 नॉटिकल मैल प्रति तास एवढी आहे. नागपूर येथील गेल्या हिवाळी अधिवेशनात याच विषयावरील चर्चेत मी सन्माननीय अर्थमंत्री महोदयांना यासंदर्भात विचारले होते आणि

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील..............

त्यांनीही आश्वासन दिले होते की, बोटींचे अत्याधुनिकीकरण करण्यात येईल. परंतु, अद्याप यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. 100 वर्षे वापरातील बोटी आपण अजूनही वापरत आहोत. परदेशामध्ये जेंव्हा अतिरेक्यांकडून हल्ले सुरु झाले त्यावेळी संरक्षणात्मक नॉर्म्स ठरविण्यात आले. कशा प्रकारचा दर्जा असावा, हे ठरविण्यात आले. आज जगामध्ये अलीमोन बोटींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. आपल्याकडे मात्र त्याच जुन्या बोटी, कमी दर्जाच्या बोटी आणि त्याही भाडयाच्या बोटी पोलीस विभागाकडून वापरल्या जात आहेत. यावर पोलीस दलाला येणारा खर्च जागतिक दर्जाच्या बोटींसाठी येणा-या खर्चाएवढाच असला तरीही हा खर्च केवळ कागदावर आहे आणि त्यामधून किना-यांचे संरक्षण मात्र होत नाही, अशी परिस्थिती आहे. यापुढेही किनारपट्टीवर आरडीएक्स उतरविले जाणार आहेत. पण जोपर्यन्त आपण आपल्या दर्जामध्ये बदल करीत नाही, यंत्रणेमध्ये बदल करीत नाही तोपर्यन्त किनारपट्टींचे संरक्षण आपण चांगल्या प्रकारे करु शकणार नाही.

सभापती महोदय, समुद्र किना-यांचे संरक्षण पोलिसांकडून कशा प्रकारे होते याचा थोडा तपशील मी या सभागृहात देणार आहे. जे पर्यटक समुद्र किनारी पर्यटनासाठी येतात त्यांना रात्री अडवून त्यांच्याकडून हप्ते घेतले जातात.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...........

गेटवे ऑफ इंडिया जवळ बोटी फिरत असतात. पर्यटक किंवा स्थानिक लोक रात्री समुद्र किना-याचे सौंदर्य बघण्यासाठी तेथे जात असतात. रात्री तेथे कोणी दारु पितात काय ? किंवा इतर पेय घेतात काय ? पोलीस तेथे येणा-या पर्यटकांकडून हप्ते घेतात. याचा मी स्वत: अनुभव घेतला आहे. एकदा मी गेटवे ऑफ इंडिया येथे फिरण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी एका पोलिसाने माझ्याकडे 5 हजार रुपये मागितले. मी कार्ड दाखविले आणि सांगितले की, मी आमदार आहे. त्या पोलिसाने सांगितले की, साहेब मला माफ करा. या गोष्टीकडे गांभीर्याने बघितले जात नाही. या परिस्थितीमध्ये बदल केला पाहिजे. सभापती महोदय, नेव्ही, कस्टमची देखरेख केंद्र शासनाकडे आहे आणि कोस्टलची देखरेख राज्य शासनाकडे आहे. आपल्या हातामध्ये असून देखील राज्य सरकार याचा बंदोबस्त करीत नाही. राज्य सरकार जोपर्यंत याचा बंदोबस्त करणार नाही तोपर्यंत राज्यामध्ये स्फोटके येतच राहतील. मागच्या आठवडयामध्ये मी असे सांगितले की, काही लोकप्रतिनिधी अतिरेक्यांना आपल्या फंड देत आहेत. याबाबतची चौकशी राज्य शासनाकडून झाली पाहिजे. परंतु राज्य सरकारकडून यासंदर्भात उत्तर आले नाही. वर्तमानपत्रामध्ये अशा प्रकारची बातमी आली होती. लोक आमच्याकडे संशयाने बघतात. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांच्यासारखे लोक आमच्याकडे संशयाने बघत असतात. सिमीसारख्या संघटनेला किंवा इतर कोणत्या अतिरेकी संघटनेला लोकप्रतिनिधींनी आमदार फंड दिला आहे काय ? याची राज्य सरकारने चौकशी केली पाहिजे. लोकप्रतिनिधींनी दिलेल्या आमदार फंडाची राज्य सरकारकडे नोंद आहे. लोकप्रतिनिधींना दिलेला आमदार फंड उघड करण्यास राज्य सरकारला काय अडचण आहे, हे मला कळत नाही. सामाजिक संघटनेचे लोक आमच्याकडे फंड मागण्यासाठी येत असतात. त्यांना आपण फंड देतो. परंतु यापुढे सामाजिक संघटनांना आमदार फंड देतांना लोकप्रतिनिधींना विचार करावा लागणार आहे. राज्य सरकारने याकडे काळजीपूर्वक बघण्याची आवश्यकता आहे. मला असे वाटते की, राज्य सरकार खुलासा करीत नसल्यामुळे जनतेचा लोकप्रतिनिधींकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा होत आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा केली. सभागृहामध्ये मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. दिवसा ढवळया अधिका-यांना

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...........

मारहाण केली जात आहे. अधिकारी माहिती गोळा करण्यासाठी गेला त्यावेळी गुंडांनी त्या अधिका-याला मारहाण केली. परंतु अद्याप राज्य शासनाला आरोपी मिळालेले नाहीत. अलिबाग येथील मुख्य कार्यकारी अधिकारी माहिती गोळा करण्यासाठी ऑफिसमध्ये गेले होते. मी यासंदर्भात नियम 93 अन्वये सूचना दिली होती. आज 15 दिवस झाले. न्यायालयाने दोन वेळा पी.सी. दिली. परंतु 15 दिवसामध्ये एकाही आरोपीला अटक करण्यामध्ये राज्य शासनाला यश आलेले नाही. हे काय चालले आहे ? सभापती महोदय, राजरोसपणे मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत आहेत. अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिले जात आहे. अनधिकृत बांधकाम रोखण्यासाठी राज्य सरकारला अपयश येत आहे.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्या ठिकाणी जे अधिकारी काळजीपूर्वक हे होऊ नये असे पाहतात त्यांना संरक्षण देण्याऐवजी त्यांच्यावर कारवाई होते आहे, त्यांच्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे, त्यांना पुरेसे संरक्षण मिळत नाही. म्हणून या राज्यामध्ये जनता जशी असुरक्षित वाटते आहे तसेच हे अधिकारी देखील असुरक्षित आहेत काय ? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी निश्चितपणे सांगेन की, या राज्यामध्येदेखील जे अधिकारी निर्भयपणे, प्रामाणिकपणे काम करतात त्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी ही राज्य सरकारचीच आहे आणि त्या दृष्टीकोनातून राज्य सरकारने अवश्य विचार करावा एवढे बोलून मी आपला रजा घेतो. धन्यवाद.

*****

..... टी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव येथे मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी, माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील आठवड्यामध्ये बॉम्बस्फोटासंबंधात झालेल्या चर्चेनंतर माननीय गृहमंत्री महोदय विधानसभेमध्ये होते त्यामुळे त्यानंतरच्या काळात अनेक मुद्दे येथे उपस्थित होऊनही त्यावर उत्तरे आलेली नाहीत. परंतु पुन्हा ते मुद्दे मांडण्यात मला स्वारस्य वाटत नसले तरी दोन तीन गोष्टी मला येथे अधोरेखित कराव्याशा वाटतात. त्यामध्ये एक म्हणजे महाराष्ट्रात सध्या जी काही पोलीस रचना आहे त्यामध्ये मुंबई पोलीस आयुक्तालय हे डी.जी.च्या अंडर नाही, अखत्यारीत नाही. याचा अभ्यास करून खरोखरी ही पद्धत उपयोगी आहे की एकाच दलातील दोन अधिकारी सरकारला रिपोर्ट करताहेत आणि त्यातून दलामध्ये बेबनाव होतो आहे हे आपण समजून घेणे आवश्यक आहे. या पद्धतीवर आपण अभ्यास करून निर्णय घेण्याची म्हणूनच वेळ आलेली आहे असे मला वाटते. नुकतेच झालेले बॉम्बस्फोट आणि त्या आधीच्या प्रकरणांवरून तरी ते स्पष्ट होत आहे. म्हणजे एटीएस डीजीच्या अंडर आहे पण मुंबईचे एटीएस मात्र तसे नाही. रेल्वे पोलीस मुंबईमध्येच आहेत पण ते डीजीच्या अंडर आहेत. त्यामुळे यातून जी परस्परांवर जबाबदारी झटकण्याची वृत्ती निर्माण होत आहे वा तसा प्रयत्न होतो त्याचा खरोखरी काय परिणाम होतात हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. याचे फायदे-तोटे काय आहेत याचा अभ्यास सरकारने केला असेल आणि त्या अभ्यासांती गरज असेल तर मुंबई पोलीस आयुक्तालयदेखील डीजीच्या अंडर आणण्याची गरज निर्माण होईल. आता या ठिकाणी डीजी कोण आहेत, मुंबई पोलीस आयुक्त कोण आहेत, ते कोणाचे ऐकतात हे प्रश्न येत नाहीत. सभापती महोदय, मी हे जे काही सांगतो आहे ते राजकारण म्हणून नाही तर पोलीस जिमखान्यावर अशा प्रकारच्या चर्चा होत आहेत हे माननीय गृहमंत्र्यांच्याही कानी आले असेलच. त्यामुळे ज्याला प्रशासनिक शिस्त म्हणतात ती शिस्त आपल्या पोलीस दलामध्ये यावयाची असेल तर या पद्धतीची गरज आहे काय ? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. आता ज्या ज्यावेळी मुंबईत बॉम्बस्फोट झाले तेव्हा त्याच्या तपासाची सूत्रे ही मुंबईच्या क्राईम ब्रँचकडे होती, त्यांची त्यात प्रमुख भूमिका होती. पण आता क्राईम ब्रँचचा रोल यामध्ये शून्य आहे. एटीएस, नॉर्कोटीक्स वगैरे पोलीस दलातील जे विभाग आहे त्यांच्यातील स्ट्रगल

...... टी 3 ...

श्री. तावडे .....

तर सर्वश्रुत आहे. त्या सगळ्या पॉवर स्ट्रगलमधून पोलीस दलामध्ये जी दरी वेगवेगळ्या विभागांमध्ये निर्माण होत आहे ती महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय चिंतेची गोष्ट आहे. सभापती महोदय, मी यापूर्वीच्या चर्चेमध्ये मांडले होते की, श्री.करकरे नावाचे आपले पोलीस अधिकारी आहेत त्यांना कोठेही पोस्टिंग नाही. रॉ मध्ये त्यांनी काम केलेले आहे. त्यांचा यामध्ये चांगला उपयोग झाला असता. त्यांनी नॉर्कोटिक्समध्ये चांगले काम केलेले आहे असे प्रमाणपत्र खुद्द मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहे. असे अधिकारी आज केवळ हजेरीपटावर सही करण्यापुरतेच आहेत. अशाच काही अधिकाऱ्यांची नावे देखील मी येथे घेतली होती. त्यांचा विचार माननीय गृहमंत्री करतील असे वाटते आणि यातून अशा कार्यक्षम पोलीस अधिकाऱ्यांना आपण कामाला लावू शकलात तर आपल्याला यामध्ये प्रगती नक्की करता येईल. ...

( यानंतर श्री. सरफरे .... यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदया, दुसरे असे सांगावेसे वाटते की, माननीय गृहमंत्र्यांनी पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त यांच्यासमवेत अमूक प्रकारचा साठा पकडल्याबद्दल वर्षा बंगल्यावर काढलेले फोटो पाहिले. यासंबंधी मला आपल्यामार्फत माननीय गृहमंत्र्यांना विचारावयाचे आहे की, हा साठा पकडण्यामध्ये आपली पोलीस यंत्रणा नेमकी कुठे होती? या कामाकरिता आपण केंद्र सरकारच्या एजन्सीला लेबर सप्लाय केले होते काय? प्रत्येक इन्व्हेस्टिगेशनमध्ये आपले महाराष्ट्राचे पोलीस लेबर सप्लाय केले जातात. इन्व्हेस्टिगेशन केंद्र सरकारमार्फत केले जात असले तरी त्यांना महाराष्ट्रामध्ये फोटो काढण्याची परवानगी नाही. आपल्या पोलिसांनी चांगले काम केले तर त्यांना नक्की शाबासकी दिली पाहिजे. परंतु या अधिकाऱ्यांना असे वाटते की, आपण मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मंत्री यांना मूर्ख बनवू शकतो. पकडण्यात आलेला आर.डी.एक्स. चा साठा कुणामुळे हाती लागला, त्यामध्ये महत्वाची भूमिका कुणी बजावली? त्यामध्ये पोलीस दलाची भूमिका किती महत्वाची होती? त्याबाबतीत आपले पोलीस अधिकारी क्रेडिट घेणार असतील तर ती अतिशय चिंतेची बाब आहे. मघाशी माननीय सदस्य ॲडव्होकेट श्री. अनिल परब यांनी पोलीस अधिकाऱ्यांकडे असणाऱ्या पैश्यासंबंधी उल्लेख केला. काल मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना प्रश्न विचारला होता की, एस.आर.ए. योजनेमध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हेगार आणि राजकीय नेत्यांचा पैसा गुंतविण्यात आला असल्याचा अहवाल आपणाकडे आला आहे काय? त्यामध्ये सुधारणा करुन मला असे विचारावयाचे आहे की, गुन्हेगार, राजकीय नेते आणि आय.पी.एस., व आय.ए.एस. अधिकाऱ्यांचे पैसे मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी सुरु असलेल्या एस.आर.ए. योजनेमध्ये गुंतविण्यात आले आहेत काय? पूर्वी डान्स बारमध्ये पैसे गुंतविले जायचे. इतका पैसा त्यांच्याकडे कोठून येतो? माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मागील अधिवेशनामध्ये पेट्रोल, नाफ्थाच्या भेसळीसंबंधीचा मुद्दा मांडला होता. त्यामध्ये जे अधिकारी सामील होते त्यांचे पोस्टींग कुठे करण्यात आले आहे? त्याचप्रमाणे ठाण्याच्या लँड डिलिंग प्रकरणाचा देखील आपण अभ्यास केला तर त्यामध्ये आपल्याला अधिकाऱ्यांची इंटीग्रिटी कळेल. यापेक्षा अधिक महत्वाची बाब अशी की, जे गुन्हे घडत आहेत त्यामध्ये पैश्याची लिंक अतिशय महत्वाची असते. यासंबंधीचा विषय पोलिसांच्या प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेला नाही. उदा. इंटरनॅशनल हवाला प्रकरण असेल किंवा एखादा बॉम्ब ब्लास्ट करावयाचा असेल तर दीडशे कोटी रुपये खर्च येतो. त्यामधील फायनान्शिअल ट्रँझॅक्शनचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला गुन्हा शोधणे सोपे होते. परंतु ते शोधण्याची क्षमता आपल्या पोलीस



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

अधिकाऱ्यांमध्ये नाही. कारण त्याप्रकारचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आलेले नाही. ते दिले नसेल तर अशावेळी खाजगी स्पेशलाईज असलेले लोक आपण हायर केले पाहिजेत. ते लोक तपासामध्ये आपल्याला मदत करु शकतात. अन्यथा फक्त धरपकड करुन हा तपास लागणार नाही. फायनान्शिअल ट्रँझॅक्शन कशाप्रकारचे झाले आहे याचा तपास झाला पाहिजे. मला याबाबतीत कुणावर आरोप करावयाचा नाही. माजी केंद्रीय मंत्री श्री. शरद यादव यांनी जेट एअरवेजच्या आणि दाऊदच्या संदर्भातील पत्राचा उल्लेख केला होता. ही बाब अमेरिकेला समजल्यानंतर अमेरिकेने त्यांना विमान नेण्यास परवानगी नाकारली. अशा लोकांची लिंक जुळलेली असू शकते. त्यासंबंधीच्या अहवालाची आपण चौकशी केली पाहिजे. या बाबी आपण किती गंभीरपणे घेत आहोत? मुंबईच्या पोलिसांच्या रेकॉर्डवर उपायुक्त मेरी फर्नांडिस या गायब आहेत. त्यांना नवीन मुंबई येथे पाठविण्यात आले. त्याठिक्‍ाणी गेल्यानंतर त्यांनी धडा धड धाडी टाकल्या. त्यानंतर श्री. पाटणकर यांना पाठविण्यात आले. त्यांच्या ऑफिशियल वेबसाईटवर लाल रंगाने मार्कींग केले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.... 11:45

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु....

पोलीस उपायुक्त श्रीमती मेरी फर्नांडीस त्या कोठे गेल्या आहेत ? त्या विदेशामध्ये देखील गेलेल्या होत्या. या सगळ्या गोष्टींवर आपण किती गंभीर आहात? हा खरा प्रश्न आहे. मागे फातिमा हायस्कूलच्या प्रिन्सीपॉलचा एसएमएस त्यांना आलेला होता. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे दिला असल्याचे मागच्या अधिवेशनामध्ये सांगितले होते. परंतु अजूनही सीआयडींनी काही केले नाही. त्यानंतर पवईमधील एका एनजीओनी हायकोर्टमध्ये केस दाखल केली. त्या ठिकाणी प्रिन्सीपॉलना बोलावले होते, परंतु ते नोकरी सोडून निघून गेलेले होते. आज सीआयडी पोलीस काही करत नाहीत, असे म्हटले तर त्या बाईंचे काय चुकले ? त्यावेळेस ही गोष्ट सभागृहामध्ये मी सांगत होतो परंतु गृहमंत्री महोदयांनी हे सगळे भयानक आहे त्यामुळे ते येथे न सांगता माझ्याकडे येऊन सांगा, असे सांगितले होते. त्याप्रमाणे मी त्यांच्याकडे जाऊन सांगितले. परंतु पुढे खरोखरच काही झालेले नाही. आम्हालाही चिंता वाटते.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सागरी किनाऱ्यावर बोटी कशा उभ्या आहेत, त्या बोटीवर अधिकारी कसे झोपलेले होते ? याचे चित्रण दूरदर्शनवरुन दाखविले असल्याचे सांगितले. महाराष्ट्राच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सागरी पोलीस आयुक्तालय स्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी जो काही जास्तीचा खर्च येईल तो करावा. बॉम्बस्फोटाचा आजही लोकांना धोका वाटत आहे. रेड अलर्टची सूचना देण्यात आलेली आहे. सागरी किनाऱ्यावरील चौताली, गंगा, कृष्णा या बोटी आहेत, त्या मोडकळीस आलेल्या आहेत, त्यांचे मेन्टेनन्स करणे आवश्यक आहे. सन्माननीय गृहमंत्री सांगतात की, पोलीस विभागाला अर्थ विभाग पैसे देत नाही. परंतु जोपर्यन्त आपण सागरी पोलीस आयुक्तालय स्थापन करत नाही, तोपर्यन्त सागरी किनारा सुरक्षित रहाणे कठीण आहे. आपल्याकडे आरडीएक्स येते ते विमानाने येऊ शकत नाही, रस्त्याच्या मार्गाने येऊ शकत नाही, आले तर ते सागरी मार्गाने येईल. आपण दार बंद केले नाही किंवा किचनमधील मोरी बंद केली नाही तर याबाबत काही अटकाव होणार नाही. समुद्र किनाऱ्यावरील सुरक्षितता ठेवली तर 50-60 टक्के यावर नियंत्रण आणू शकतो. यासाठी पैसे नसतील तर बजेटमध्ये विशेष मागणी करावी परंतु समुद्र किनाऱ्यासाठी सागरी पोलीस आयुक्तालय स्थापन करावे. राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशाप्रकारची उपाययोजना करणे महत्वाचे आहे,असे या निमित्ताने मला सांगावयाचे आहे. काही अधिकारी ज्या काही गोष्टी सागतात,त्याप्रमाणे त्वरित कारवाई केली पाहिजे. श्री.कश्यप सारख्या अधिकाऱ्याच्याबाबतीत असेच झालेले आहे. ज्या ठिकाणी अशा गोष्टी घडतात, त्याबाबत



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु.....

उपमुख्यमंत्री महोदय जाहीर न सांगता मंत्रालयातील अधिकारी जाहीर करतात. कोणत्याही राजकीय पक्षाची सत्ता असू दे. ज्यांना लोकांनी निवडून दिलेले आहे, ते राज्य चालवितात त्यांनी याबाबतीत सांगितले पाहिजे. ज्या ज्या वेळी अशा गोष्टी होतात त्या त्या वेळेला या गोष्टींच्या संदर्भात कडकपणाने निर्णय घेण्याची गरज आहे. जगामध्ये सर्वात मोठी एनजीओ कोणती आहे असा कोणी प्रश्न विचारला तर "मुंबई पोलीस",असे उत्तर द्यावे लागेल. या ठिकाणी कोपरापासून ढोपरापर्यन्त सगळे काही आहे. पोलीस रचनेपासून ते सागरी पोलीस आयुक्तापर्यन्त आणि अधिकाऱ्यांच्या पोस्टींपर्यन्तचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्याबबात अतिशय गंभीरपणाने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. ती पावले उचलावीत अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, विरोधी पक्षाच्यावतीने नियम 259 अन्वये संपूर्ण राज्यातील कायदा व सुव्यवस्था आणि खासकरुन औरंगाबाद, मनमाड, नाशिक व मालेगाव अशा अनेक ठिकाणी जे स्फोटकांचे साठे सापडले त्याबाबतीत अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्याबाबतीत माझे विचार मांडण्यासाठी उभी आहे.

एक बाब अशी की, दहशतवाद विरोधी पथकामध्ये अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या फार कमी आहे. त्या पथकामध्ये फक्त 26 लोक आहेत आणि त्याचा परिणाम असा होतो की, फार मोठ्या प्रमाणावर ज्या ठिकाणी स्फोटके सापडत आहेत त्या सर्व ठिकाणचा ताण या पथकावर आलेला असतो. धार्मिक प्रश्नातून जो ताणतणाव निर्माण होतो आणि त्यानंतर जो हिंसाचार होतो तो हिंसाचार होण्याच्या अलीकडच्या ज्या पायऱ्या आहेत त्या कडे लक्ष दिले जात नाही. त्या ठिकाणचे सर्व वाद शेवटच्या क्षणी दहशतवाद विरोधी पथकाकडे जातात. गेल्यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये पुण्यात अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीमध्ये कार्यकर्त्यांचा हिंसाचार झाला तसेच पोलिसांवर देखील मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. त्यामध्ये पोलीस जखमी झाले. हे जे कार्यकर्ते होते ते सर्व दशहतवाद पसरविणारे किंवा लश्कर-ए-तोयबा किंवा अल कायदा सारख्या संघटनांचे कार्यकर्ते नव्हते. ते गणेशोत्सव मंडळाचे लोक होते. त्या ठिकाणी कोणतेही नियोजन नव्हते. त्या ठिकाणी कोणीही सूत्रधार नव्हता. हे पोलिसांना देखील माहीत आहे. तरीही दुर्दैवाने ज्यावेळी अशा काही गोष्टी सामान्य कार्यकर्त्यांच्या हातून घडलेल्या असतात त्यांचा तपास सुध्दा दहशतवाद विरोधी पथकाकडे दिला जातो. मागे "सामना" वृत्तपत्राच्या कार्यालयात कार्यकर्ते आणि पोलिसांची धुमश्चक्री झाली होती. त्यावेळी मी के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी सुध्दा आम्हाला दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी या घटनेच्या संदर्भात माहिती घेत असताना दिसले. यासंदर्भात शासनाने आत्मपरीक्षण करावयास पाहिजे. समाजामध्ये जे धर्मश्रध्द लोक आहेत त्यांना आपण दहशतवादी बनवित आहोत काय ? छोट्या छोट्या गोष्टींवर लोकांच्या मनातील भावना प्रक्षुब्ध झालेल्या असतात त्या ठिकाणी सुध्दा दहशतवादाचे नाव द्यावयास लागलो तर कारण नसताना वेगळे वातावरण तयार होईल. यामुळे आपण दहशतवाद विरोधी पथकावर जास्त दबाव आणत आहोत असे वाटते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

दुसरी बाब पोटा कायद्याच्या संदर्भात आहे. सगळे बॉम्बस्फोट झाल्यानंतर लवकरात लवकर न्याय मिळत नाही असे सातत्याने बोलले जाते. त्यामध्येही पोटा सारखा कायदा नाकारल्यानंतर त्याला पर्याय काय आहे ? साक्षीपुराव्यांचे संरक्षण कसे होऊ शकेल ? याचा विचार झालेला नाही. सन 2002 मध्ये मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर मुंबईतील 14 पोलीस स्टेशन्समध्ये आम्ही महिलांच्या संदर्भात काम करीत असल्यामुळे त्या कामाच्या अनुषंगाने जात होतो. दोन तीन ठिकाणी पोलीस अधिकारी हेच कारण सांगत होते की, बॉम्बस्फोट झाल्यामुळे सगळी यंत्रणा त्या कामाच्या पाठीमागे लागली आहे त्यामुळे इतर विषयांच्या बाबतीत पाठपुरावा करणे अतिशय अवघड झालेले आहे. आताच्या बॉम्बस्फोटामध्ये ज्यावेळी बॉम्बस्फोट झाले त्यानंतर काही दिवस मी समजू शकते पण यावेळी बॉम्बस्फोट झाल्याबरोबर महिलांच्या सुरक्षिततेसाठी जे पोलीस होते ते ताबडतोब काढून घेण्यात आले. आभाळाला कोठे कोठे ठिगळ लावणार असा प्रश्न असला तरी आपण याबाबतीत कशा स्वरुपामध्ये कार्यवाही करणार याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट नाही. तिसरी बाब अशी की, पोलीस खात्याचे नीतिधैर्य संपूर्णपणे खच्ची होत असताना जे लोक कायद्याच्या कक्षेमध्ये राहून, कायद्याच्या चौकटीमध्ये राहून स्वत:च्या भावना व्यक्त करण्यासाठी परवानगी मागतात त्याची कदर शासनाकडून राखली जात नाही असे चित्र दिसते. मी याबाबत उदाहरण देईन. पुढच्या दोन महिन्यामध्ये हा प्रश्न ऐरणीवर येणार आहे. रात्री लाऊड स्पीकर वाजविण्यावर बंदी घालण्यात आली. पुण्यामध्ये श्री. रशीद शेख हे नगरसेवक सुप्रीम कोर्टापर्यंत गेले. त्यांच्यावर आम्ही विश्वास ठेवला. माननीय गृहमंत्र्यांनी वारंवार सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाबाबत सांगितले. त्यानंतर एका महिन्याने गुजरातमध्ये नवरात्रीसाठी आम्हाला काही दिवस परवानगी मिळणार काय ? असे म्हटल्यानंतर सुप्रीम कोर्टाने त्यांना परवानगी दिली. त्यानंतर माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, आंबेडकर जयंतीचा एक दिवस, मुस्लिमांसाठी एक दिवस, अनंत चतुर्दशीला एक दिवस अनुमती देऊ. मुळामध्ये सुरुवातीला सुप्रीम कोर्टामध्ये आपली बाजू जेवढ्या तडाखेबंद पध्दतीने मांडावयास पाहिजे होती तशी मांडली नाही. न्यूयॉर्कमध्ये किंवा लंडमध्ये काय झाले ? जे विकसित देश आहेत त्या देशातील यंत्रणा सुध्दा विकसित आहे. अशा वेळेला तेथील यंत्रणा फेल होते याचे महत्वाचे कारण म्हणजे संपूर्ण जगामध्ये ख्रिश्चन धर्म मानणारे आणि मुस्लिम फंडामेंटलिस्ट यांचे युध्द चालले आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

असे असताना हिन्दुस्थानने कितीही ठामपणे सांगितले की, आम्ही धर्मनिरपेक्ष आहोत तरीही अशा घटना राज्यामध्ये घडत आहेत ही वस्तुस्थिती आहे. जेहाद करण्याच्या नावाखाली धर्मांध संघटनांना पाठिंबा देणारा काही मुस्लिम जनसमुदाय आहे. हा जनसमुदाय देशहिताला मानणा-या मुस्लिम समाजाला बरोबर घेऊन त्यांचा विघातक कृत्ये करण्यासाठी उपयोग करुन घेत आहे. बॉम्बस्फोटामध्ये मृत आणि जखमी झालेल्या लोकांना तसेच भिवंडी घटनेतील जखमी झालेल्या लोकांना शासनाने मदत केली. परंतु पुण्यामध्ये गणेश विसर्जनाच्या वेळी निघालेल्या मिरवणुकीच्या वेळी झालेल्या दंगलीमध्ये जे लोक जखमी झाले त्यांना मात्र कोणत्याही प्रकारची मदत दिली गेली नाही. अजूनही लोकांवर केसेस चालू आहेत. महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदायाप्रमाणेच जे भाविक आहेत, त्यांना शांतपणे आरत्यांचे कार्यक्रम करण्यामध्ये रस आहे. ते करण्यास त्यांना मुभा द्यावी. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला की, पुढील अधिवेशनामध्ये आपण त्यासंबंधीची चर्चा करतो. मुळामध्ये बॉम्बस्फोटासारख्या घटना घडल्यानंतर लोकांच्या भावनांची जपणूक करण्याची भूमिका घेतली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. मागील आठवड्यामध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांमध्ये मृतांच्या नातेवाईकांना आणि जखमींना आर्थिक मदत करण्याची शासनाने घोषणा केली. नानावटी हॉस्पिटलमध्ये दाखल झालेल्या रुग्णांना जी औषधे दिली गेली त्याचे त्यांना पैसे मिळालेले नाहीत. खरे म्हणजे औषधांच्या बिलांचे पैसे मिळण्यासाठी शासनाने जी व्यवस्था केलेली आहे त्याची माहिती रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना दिली पाहिजे. त्यांना सांगितले पाहिजे की, ज्या दिवशी औषधे घेतली जातील त्याच दिवशी संध्याकाळी औषधांची बिले काऊंटरवर सादर करुन त्याचे रिइम्बर्समेंट घ्यावे. ह्या गोष्टी रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना माहीत नसल्यामुळे त्यांना मोफत ट्रीटमेंट मिळत नाही. मी उपस्थित करीत असलेल्या मुद्यांबाबत माननीय गृहमंत्री उत्तर देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

सभापती महोदय, राज्यामध्ये जळगाव, मनमाड, औरंगाबाद अशा विविध ठिकाणी धर्मांध संघटना कार्यरत आहेत. पंढरपूर याठिकाणी गटारामध्ये एक बॉम्ब सापडला असून तो बॉम्ब साधासुधा नाही तर विमानातून टाकण्यासारखा तो बॉम्ब आहे असे सोलापूरच्या पोलीस अधिका-यांनी सांगितले. आता हा बॉम्ब विमानातून टाकलेला आहे काय ? कोणत्याही घटनेची अर्धवट माहिती मिळाली तर त्यामुळे लोकांमध्ये घबराट निर्माण होते. राज्यातील विविध भागामध्ये





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

आज स्फोटके, बॉम्ब, शस्त्रास्त्रे सापडत आहेत या पार्श्वभूमीवर राज्यातील सुरक्षा यंत्रणा अधिकाधिक प्रभावी करावयास पाहिजे. सभापती महोदय, आज राज्यामध्ये दहशतवादी कृत्ये घडवून आणण्यामध्ये महिलांचाही सहभाग घेतला जात आहे. अलीकडेच सांताक्रुझ एअरपोर्टवर बुरखा घातलेल्या इसमाला पकडण्यात आले. अनेक ठिकाणी दहशतवादी कृत्ये करण्यासाठी बुरखा घातलेल्या महिलांचा उपयोग केला जातो ही वस्तुस्थिती आहे. अशा प्रकारे शोषित, पीडित महिलांवर अत्याचार होत आहेत, त्यांना विघातक कृत्ये करण्यास भाग पाडले जात आहे. अशा महिलांना अशा कृत्यांपासून परावृत्त करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बॉम्बस्फोटामध्ये ज्या कुटुंबातील माणसे दगावली आणि ज्यांची मुले लहान आहेत त्यांना अनुकंपातत्वावर शासकीय सेवेमध्ये आता सामावून घेता येणार नाही. परंतु ही मुले मोठी झाल्यानंतर त्यांना अनुकंपातत्वावर सेवेत सामावून घेतले जाणार आहे काय ? हा देखील प्रश्न आहे.

सभापती महोदय, बान्द्रा येथील शासकीय वसाहतीमध्ये राहाणा-या श्रीमती लता भालेकर यांच्या घरी 8 डिसेंबर 2005 रोजी सकाळी 10.00 वाजता 1 लाखाची चोरी झाली. अजून आरोपी मिळालेले नाहीत. ज्या महिलांनी दारुबंदीच्या विरोधात आंदोलने केली अशा महिलांवरील खटले मागे घेतले जातील असे माननीय गृहमंत्र्यांनी मागील अधिवेशनामध्ये सांगितले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदनही केले. परंतु यासंदर्भात माननीय गृहराज्यमंत्र्यांचे मला पत्र आले. त्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, कोणकोणत्या महिलांवर केसेस दाखल झालेल्या आहेत त्यांच्या नावांची यादी द्यावी. खरे म्हणजे ही माहिती त्यांनी पोलीस अधीक्षक किंवा कमिशनरेट कार्यालयाकडून घ्यावयास पाहिजे.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

आम्ही यादी उपलब्ध करुन द्यायची असेल तर ठीक आहे, त्याला आमची हरकत नाही. शासनाला स्वत:ची यंत्रणा वापरायचीच नसेल तर आम्ही आमच्यापरीने काम करु. परंतु शासनाने संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली तर परफेक्ट माहिती मिळू शकेल. असे असताना आमच्यावर जबाबदारी का ढकलली याची कल्पना नाही. म्हणून शासनाच्या यंत्रणेने या खटल्यांची माहिती द्यावी एवढे सांगून गणेशोत्सवाच्या संदर्भात कोणत्याही परिस्थितीत लोकांचा उत्साह न मोडता लाऊडस्पीकरची परवानगी मिळाली पाहिजे हे आवर्जून सांगावेसे वाटते. गृहमंत्र्यांनी या बद्दल आजच निवेदन करावे. धन्यवाद.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदया, विरोधी पक्षातर्फे जो अंतिम आठवडा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

खरे म्हणजे या विषयावर यापूर्वी सभागृहात चर्चा झालेली आहे. याठिकाणी असे सांगावेसे वाटते की, मुंबईमध्ये पश्चिम रेल्वेच्या लोकल गाड्यांमध्ये जे बॉम्बस्फोट झाले, त्यापूर्वीच्या दोन महिन्यामध्ये मुंबईमध्ये घडलेल्या छोट्या मोठ्या घटना, मग घाटकोपर येथील स्फोट, जिलेटिनच्या कांडा सापडणे, नागपूरच्या संघ कार्यालयावर झालेला अतिरेक्यांचा हल्ला, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनमधील बॉम्बस्फोट, अंधेरी सीप्झ येथील बॉम्बस्फोट झालेले होते. पोलीस यंत्रणेच्या त्याच वेळी लक्षात आले पाहिजे होते. खरे म्हणजे अतिरेक्यांनी एक प्रकारे मुंबई पोलिसांना इशारा दिला होता. हा इशारा देऊन ते मोठया प्रमाणात बॉम्बस्फोट घडविण्यामध्ये यशस्वी झालेले आहेत. यामध्ये मुंबई पोलीस किंवा गुप्तचर यंत्रणा कशी असफल ठरली हे आपल्या लक्षात येते. मोठ्या संकटांची सुरुवात मागील दोन महिन्यातील स्फोटांच्या श्रृंखल्यातून आपल्या लक्षात येते. मुंबई पोलीस किंवा गुप्तचर यंत्रणेने मागील दोन महिन्यापासून ही विषवल्ली खणायला सुरुवात केली असती तर बॉम्बस्फोटात जे 200 बळी गेले, ती निरपराध माणसे वाचली असती. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मुद्दा मांडला की, महाराष्ट्राला जो सागरी किनारा लाभलेला आहे त्या सागरी किनाऱ्यावर मोठया प्रमाणात स्फोटके उतरविण्यात येतात. या सागरी किनाऱ्यावर महाराष्ट्राच्या पोलिसांचे नियंत्रण आहे का? किनाऱ्यावरील वाहतुकीची माहिती देणारे शिपिंग ॲक्टिव्हीटी अधिकारी पोलीस दलामध्ये आहेत का? असतील तर ते सक्षम आहेत का? अशी जी शंका निर्माण झाली आहे, त्यामुळे सागरी पोलीस आयुक्तालयाची मागणी करण्यात आली ती अत्यंत महत्वाची आहे. त्याचबरोबर मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्रीमती कांता नलावडे...

सभापती महोदय, मुंबईमध्ये अनेक नेत्यांना संरक्षण दिले जात असते, बाहेरचे बरेच नेते मुंबईमध्ये येत असतात त्यामुळे या नेत्यांना सुध्दा पोलीस संरक्षण द्यावे लागते. मुंबई शहराची लोकसंख्या पाहिली तर मुंबई शहरात काम करणा-या पोलिसांची संख्या ही फार कमी आहे. त्यामुळे पोलिसांवर एक प्रकारचा ताण पडत असतो त्यामुळे याचा देखील विचार होण्याची आवश्यकता आहेत. मी मुंबईतील पोलीस वसाहतींना भेटी दिलेल्या आहेत. या ठिकाणच्या पोलीस वसाहतीची अवस्था फार वाईट आहे. पोलीस वसाहतीमध्ये साधी पाण्याची सुध्दा चांगली व्यवस्था नाही. त्यामुळे अशा वाईट परिस्थितीत पोलिसांना रहावे आणि काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्या मनोबलाचा देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. मुंबई येथील करीरोड येथून आकांक्षा या अल्पवयीन मुलीला पळवून नेण्यात आले होते परंतु सुदैवाने ही मुलगी परत घरी आलेली आहे. एका महिला कॉन्स्टेबल मुळेच ही मुलगी परत येऊ शकली आहे. त्यामुळे अशा घटना पुढील काळात घडणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये लहान मुली पळवून नेण्याच्या अनेक तक्रारी आपल्याला बघावयास मिळतात. पळवून नेलेल्या मुलींना विकले जाते, त्यांच्याकडून भीक मागवली जाते, त्यांना अनैतिक कामासाठी वापर केला जातो त्यामुळे या गोष्टीचा देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. करीरोड येथील आकांक्षा ही मुलगी सापडल्यामुळे आता या गोष्टीकडे दुर्लक्ष होता कामा नये. आज लहान मुले मुंबईत सुरक्षित राहिलेली नाहीत. पूर्वी 2-2 वाजता महिला मुंबईत फिरल्या तरी त्यांना भिती वाटत नव्हती परंतु आता 3 वर्षापासून मुंबई सुरक्षित राहिलेली नाही, मुंबईतील भगिनी सुरक्षित राहिलेल्या नाहीत. मुंबईत येणा-या ज्या भगिनी आहेत त्यांच्यावर गुदरलेले प्रसंग या ठिकाणी सांगता येण्यासारखे नाहीत. या महिलांवर लैंगिक अत्याचार झालेले आहेत, त्यांचे विनयभंग झालेले आहेत. त्यामुळे मुंबईमध्ये पोलिसांची संख्या वाढवून कायदा व सुव्यवस्था बळकट करण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-लातूर पोलीस स्टेशनमध्ये गायब झालेले दागिने मिळविण्यासाठी संबधित व्यक्ती गेली असता पोलीस स्टेशनमधूनच सापडलेले हे दागिने गायब झालेले आहेत. ठाणे जिल्हयातील शहापूरमध्ये जी दगडफेक झाली त्याची घटना सर्वांनाच माहिती आहे. या ठिकाणी पोलीस रोडवर हप्ते घेत असल्यामुळे त्या ठिकाणी ॲक्सीडेंट झ ाल्यामुळे

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

तेथील ग्रामस्थांनी त्यासंदर्भात आवाज उठविला होता परंतु पोलिसांनीच या ग्रामस्थांवर लाठीचार्ज केला होता. आज मुंबईमध्ये कायदा आणि सुव्यवस्था नावाला देखील राहिलेली नाही. एका बाजूला पोलीस सर्रास हप्ते घेत आहेत तर दुसरीकडे अल्पवयीन मुला- मुलींना पळवून नेले जात आहे. रेल्वेमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यातील स्फोटके कोठून आणली, यामध्ये कोणाचा हात होता हे अजून समजले गेले नाही. खरे म्हणजे या सरकारची गुंडावर, अतिरेक्यांवर आता दहशतच राहिलेली नाही. मुंबईतील पश्चिम रेल्वेत जे बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये 200 लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. आज मुंबईच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र असुरक्षित झालेला आहे आणि याचे श्रेय हे या लोकशाही आघाडी सरकारला जात आहे त्यामुळे या सरकारने त्वरीत राजिनामा द्यावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

-----------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय गृहमंत्र्यांकडे केवळ 20 मिनिटेच वेळ शिल्लक राहिलेला आहे. मी सुरुवातीलाच सांगितले होते की, प्रत्येक वक्त्याने थोडया वेळातच आपले भाषण पूर्ण करावे. ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी या चर्चेच्या निमित्ताने केवळ सूचनाच कराव्यात .

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी केवळ दोन तीन सूचनाच करणार आहे. ज्यावेळेस पोलिसांवर हिंस्त्र जमाव हल्ला करतो त्यावेळेस पोलिसांना गोळीबार किंवा लाठी चार्ज करावा लागतो. परंतु अशा गोळीबारामध्ये किंवा लाठी चार्ज मध्ये जे लोकजखमी होतात किंवा मृत पावतात अशा लोकांना नुकसान भरपाई देता कामा नये. नुकसान भरपाई करण्याचे शासनाने थांबविले पाहिजे. पोलिसांना गत्यंतर नसल्यामुळेच पोलीस गोळीबार किंवा लाठी चार्ज करीत असतात.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.........

त्यामध्ये जर कोणी मृत्युमुखी पडले असतील तर त्यांना कोणतीही मदत देण्यात येऊ नये. जर पोलिसांनी अतिरेक केला असेल तर त्याठिकाणी मदत देण्यात यावी.

सभापती महोदय, भिंवडी येथील झालेल्या दुर्घटनेला आता 15 दिवसांहून अधिक कालावधी लोटलेला आहे. त्याठिकाणी कोणत्याही परिस्थितीमध्ये पोलीस चौकी झाली पाहिजे, अन्यथा हे सरकार दुर्बल आहे असा अर्थ निघू शकेल. आज मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टया वाढलेल्या आहेत. या झोपडपट्टयांमध्ये विशेषत: रेल्वे लाईन्सच्या बाजूला ज्या झोपडपट्ट्या आहेत त्यामधून या अतिरेक्यांना आश्रय मिळत आहे. अतिरेक्यांनी आता त्यांची मेथड बदलली आहे. राजीव गांधी यांची हत्या कशाप्रकारे झाली याची आपणा सर्वांना माहिती आहे. मानवी बॉम्बने त्यांची हत्या घडवून आणण्यात आली. स्वत:ही मरायचे आणि समोरच्यालाही मारायचे,अशी धर्मांधता त्यांना शिकविण्यात येते. अशाप्रकारची धर्माधता जेथे शिकविली जाते अशी धर्मस्थळे मग ती कोणत्याही जातीची असोत, त्यांना एक रुपयाची मदतसुध्दा शासनाने देता कामा नये.

सभापती महोदय, मुंबई शहरात आणि महाराष्ट्रात हिंदूच्या देवस्थानांना पोलीस संरक्षण देण्यात आलेले आहे. आता सांगण्यात आले आहे की, प्रत्येक गणेशोत्वस मंडळाने मेटल डिटेक्टर्स ठेवले पाहिजे आणि ते आवश्यकही आहे. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, फक्त अशाप्रकारचे संरक्षण हिंदू देवस्थानासाठी का ? मी पॉझीटीव्ह अर्थाने बोलत आहे. चर्च किंवा मशिद याठिकाणी संरक्षण देण्यात आलेले नाही. कारण कोणताही हिंदू अतिरेकी धर्मस्थळावर हल्ला करणार नाही हे माहीत आहे. तेव्हा याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

श्री.अफरोज याच्यावर 90 दिवसांमध्ये चार्जशीट दाखल न केल्यामुळे त्याची सुटका झाली. त्यामुळे महाराष्ट्रात बॉम्बस्फोट घडवून आणल्यानंतर सुध्दा चार्जशीट दाखल होत नाही असा समज बाहेर गेलेला आहे. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी कामात कुचराई केली त्यांना शिक्षा झाली का ?

मध्यंतरी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी सांगितले की, रेल्वेने प्रवास करताना स्त्रियांनी जास्त दागिने घालू नयेत. याचा अर्थ चोरी करणाऱ्याला पकडायचे नाही. आता रेल्वेमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्याअनुषंगाने सांगण्यात आले की, रेल्वेमध्ये सामान ठेवण्यासाठी जे रॅक आहेत ते काढून टाकले पाहिजेत, लोकांनी बसताना आपल्या आजुबाजूला काय आहे याची तपासणी केली पाहिजे. लोकांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.........

दक्षता घेतली पाहिजे यात वाद नाही. परंतु सरकारची देखील काही जबाबदारी आहे. आपण जर रेल्वेतील रॅक काढून टाकले तर अतिरेकी त्यांची मेथड बदलतील.

सभापती महोदय, एक शेवटचा मुद्दा मांडतो. आर्थररोड जेलचे प्रकरण सी.बी.आय.कडे आहे. हा तपास लवकर पूर्ण होण्यासाठी माननीय गृहमंत्र्यांनी त्यांचेबरोबर चर्चा केल्यास बरे होईल असे वाटते. त्याचप्रमाणे बंदरामध्ये कंटनर्समधून विस्फोटके येतात त्याचा शोध घेतला पाहिजे तसेच स्फोटके कोणत्या गॅगस्टर्सकडे पोहोचतात याचा देखील शोध घेण्याची आवश्यकता आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूरे करतो.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव याठिकाणी आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, वेळ थोडा असल्यामुळे मी फक्त मुद्देच मांडणार आहे. अंतिम आठवडा प्रस्तावाच्या अनुषंगाने गृह विभागावर चर्चा करताना याठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मुस्लिम जिहादचा उल्लेख केला. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, अतिरेक्याला कोणताही धर्म वा पंथ नसतो. फक्त दिलेले काम तो पुरे करीत असतो. याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांकडून सांगण्यात आले की, बॉम्बस्फोट होऊन 10 दिवसांचा कालावधी लोटला तरी अजून पोलिसांना कोणताही सुगावा लागलेला नाही. या निमित्ताने मी गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, स्कॉटलंडमध्ये एक वर्षापूर्वी बॉम्बस्फोट झाला. पण त्यातील आरोपिंना अजून पकडण्यात आलेले नाही, अशी माहिती स्कॉटलंड पोलिसांच्या वेबसाईटवर आहे. अमेरिकेतील 9/11 चा हादसा आपणा सर्वांना माहीत आहे. त्याठिकाणी दीड कोटी मुस्लिमांची वस्ती आहे, पण त्याठिकाणी आजपर्यंत कोणतीही जातीय दंगल झालेली नाही. सांगण्याचा उद्देश एवढाच की, कोणत्याही घटनेचे राजकारण करण्यात येऊ नये. मध्यंतरी आपण वॉर रुमबद्दलची माहिती वर्तमानपत्रात वाचली असेल. वॉर रुम लिक प्रकरणामध्ये जे सात आरोपी पकडले त्यामध्ये एकही आरोपी मुसलमान नव्हता. पण एसएमएस आले की, "All अतिरेकी are Muslims but all Muslims are not अतिरेकी."

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

या देशातील मिलिटरीची गुप्त माहिती कधी इस्त्रायला तर कधी पाकिस्तानला विकली जाते. ती माहिती कोण विकतो ? याची आपण माहिती घ्यावी. परंतु याबाबतीत भेदभाव न करता व पोलिसांवर जास्तीचा दबाव न आणता, त्यांनाच टारगेट न करता, यामध्ये राजकीय दृष्टीकोन न ठेवता हा प्रश्न समन्वयाने सोडवावा. भारताच्या हिताच्या दृष्टीने हा प्रश्न सोडवावा. हा संपूर्ण भारताचा प्रश्न आहे, आपल्या राज्यातील पोलिसांचाच हा प्रश्न नाही. त्यामुळे हा प्रश्न आपण सहकार्याच्या भावनेतून सोडवावा, एवढीच माझी विनंती आहे.

-----

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, परवा झालेल्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी जे उत्तर दिले, तेच उत्तर या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने मिळणार असेल तर याठिकाणी आमचा अपेक्षाभंग होणार आहे. त्यांनी त्यावेळी अनेक अडचणी, दु:ख व्यक्त केले. हा प्रश्न एकटया गृह विभागाशी मर्यादित नसून याबाबतीतील जबाबदारी ही संपूर्ण शासनाची आहे. मागे ज्यावेळी चीन युध्द हरले त्यावेळी त्यांच्या राज्यकर्त्यांनी अशी कारणे दिली होती की आमच्या सैनिकांकडे बुट नव्हते, कपडे नव्हते त्यामुळे आम्ही युध्द हरलो. परवाचा जो बॉम्बस्फोट झाला, त्यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनीही अशाच प्रकारचे निवेदन केले आहे. त्यांनी असे सांगितले की, आमच्याकडे अत्याधुनिक साधने नाहीत, पैसा नाही, कर्मचारी वर्ग नाही अशा अनेक अडचणी त्यांनी सांगितल्या. अशा प्रकारची कारणे न सांगता संपूर्ण राज्य सरकार म्हणून संयुक्त जबाबदारीने त्यांनी उत्तर देणे अपेक्षित आहे. या संपूर्ण प्रश्नाची सोडवणूक करण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी शासन म्हणून उत्तर देणे आवश्यक आहे. या चर्चेला उत्तर देत असतांना सरकार पैसा कमी पडू देणार नाही, हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कसल्याही प्रकारची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे त्यांनी सांगितले पाहिजे. त्यामुळे या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी एका खात्याच्या वतीने उत्तर न देता राज्य शासनाच्या वतीने उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची बाब मला माननीय गृहमंत्र्यांच्या लक्षात आणून द्यावयाची आहे. शिर्डी संस्थानने स्वसंरक्षणासाठी 'मोसाद' या संघटनेची मदत मागितल्याची बातमी वृत्तपत्रात आली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. आपण अशा प्रकारे मोसादला बोलावत असू तर स्वत:हून अतिरेक्यांना आमंत्रण देत आहोत. त्यामुळे हे योग्य नाही. याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी ख्रिस्ती आणि हिंदू, हिंदू आणि मुसलमान यांचा उल्लेख केला, मला वाटते तो योग्य नाही. त्याचे कारण असे आहे की, हा धर्मा-धर्मातील वाद नाही तर जगभर ख्रिस्ती आणि मुसलमान यांच्यामध्ये संघर्ष पेटवून आखाती देशातील तेल खनिजावर कब्जा करण्यासाठी व जेरुसलमवर कब्जा करण्यासाठी हे सर्व चालले आहे. आणि त्यासाठी अमेरिकेने

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

हा संघर्ष पेटविला आहे. अशा प्रकारे अमेरिका सर्वांना टारगेट करीत आहे व हे सर्व वातावरण अमेरिका निर्माण करीत आहे. सभापती महोदय, एक बाब मी सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मी कालपासून पाहत आहे की, विश्व हिंदू परिषदेने सगळीकडे प्रक्षोभक बॅनर्स लावलेले आहेत. ती ताबडतोब हटवली गेली पाहिजेत. तसेच, आपल्या राज्यातील पोलीस अधिकारी श्री.रिबेरो यांना पंजाब सरकारने बोलाविले होते. आता ते मुंबईमध्ये परत आले आहेत. मुंबई पोलिसांनी बॉम्बस्फोटाच्या संदर्भात त्यांचा सल्ला घेतला पाहिजे. या आतंकवादाच्या विरोधात कसे लढता येईल, या दृष्टीने त्यांचा सल्ला गृह विभागाने घ्यावा, अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, आपण याठिकाणी विनाकरण काही एन्काऊंटर स्पेशालिस्ट अधिकाऱ्यांचे कौतुक सुरु केले आहे. गेल्या 8 दिवसांपासून त्यांचे कौतुक सुरु झाले आहे. हे कौतुक प्रथम आपण थांबविले पाहिजे. याचे कारण असे आहे की, या एन्काऊंटर स्पेशालिस्ट अधिका-यानी हिंदू आणि मुस्लिमांची फार छोटी छोटी माणसे मारलेली आहेत व तीही सुपारी घेऊन मारलेली आहेत. त्यामुळे कृपा करुन त्यांना आपण डोक्यावर घेऊ नका व त्यांचे एवढे कौतुक करु नका. गेल्या 8 दिवसांपासून मी पाहत आहे की, त्यांचे कौतुक प्रत्येकवेळी होत आहे. मी याबाबतीत स्वत: एन्काऊंटर स्पेशालिस्ट पडवळ व सावंत या अधिकाऱ्यांचा वैयक्तिक अनुभव घेतलेला आहे. हा वैयक्तिक अनुभव खरे पाहता मी सदनामध्ये सांगणार नव्हतो परंतु त्यांचे अशा प्रकारे कौतुक होत असल्याने ते मला सांगावे लागत आहे. एका फसवणूक करणा-या बिल्डरच्या विरोधात माझ्या भावाने तक्रार केल्यामुळे याच एनकाऊंटर फेम पोलीस अधिका-यांनी अटक केली व त्याला आत टाकले होते. मी जेव्हा त्यावेळचे पोलीस उपायुक्त श्री.भूजंगराव मोहिते यांच्यासमोर जाऊन उभा राहिलो त्यावेळी हे सर्व थांबले. त्यामुळे आपण एन्काऊंटर स्पेशालिस्ट यांना डोक्यावर घेऊ नका. आपल्या दहशतवादाची लढाई करावयाची असेल तर याचा शोध घेण्याची जबाबदारी आपण श्री.रिबेरो यांना द्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------

यानंतर श्री.रोझेकर....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) :सभापती महोदय, नाशिक, मालेगाव, मनमाड या परिसरात स्फोटके सापडणे, अतिरेक्यांच्या कारवायांमुळे झालेले स्फोट, भिंवंडीमध्ये झालेली दंगल, पोलीस स्टेशन बांधण्यात गृह विभागाला आलेले अपयश, असे अनेक मुद्दे घेऊन विरोधी पक्षाने अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने चर्चा उपस्थित केली आहे. सभापती महोदय, याच अधिवेशनामध्ये 3 वेळा या विषयावर चर्चा झाली आहे, जे प्रश्न मांडले गेले त्याची उत्तरेही दिली गेली आहेत, त्याचीच पुनरावृत्ती करीत आज पुन्हा ही चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. मी या चर्चेला राजकीय उत्तर देऊ इच्छित नाही. चर्चेच्या अनुषंगाने आलेल्या सगळयाच सूचना राजकीय होत्या असेही मी मानीत नाही. परंतु, आज सगळयांनी संवेदनशील वातावरणामध्ये एकत्रितपणे बसून राज्यासाठी आणि देशासाठी काही निर्णय घेऊन परिस्थिती शांत होईल आणि खरे गुन्हेगार एकटे बाजूला पडतील यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी सन 1999 मध्ये आमदार झालो, पण माझ्यादृष्टीने हे अधिवेशन सगळयात खराब अधिवेशन होते. कुठेतरी टीका सहन करावी लागेल याची मला कल्पना आहे पण एक घटना धरुन सगळया पोलीस दलालाच आरोपीच्या पिंज-यामध्ये उभे करण्याचा प्रयत्न झ ााला. असे असले तरी आज शेवटच्या दिवशी 2 चांगल्या गोष्टी मी या सदनाला सांगून माझ्या भाषणाला सुरुवात करणार आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांनी आपले भाषण संपविल्यानंतर काही वेळासाठी मी सदनाच्या बाहेर गेलो होतो. आज मी एका शिष्टमंडळाला भेटीची वेळ दिली होती. त्यानुसार रजा अकादमीचे शिष्टमंडळ मला भेटण्यासाठी आले होते. या शिष्टमंडळाने असे स्पष्ट केले की, भिवंडी नगरपालिकेने जो प्लॅन मंजूर केला आहे त्याप्रमाणे पोलीस स्टेशन बांधण्यास रजा अकादमीचा विरोध असणार नाही आणि या गोष्टीला त्यांनी मान्यता दिलेली आहे. यानुसार भिवंडी नगरपालिकेचा प्लॅन बघितला जाईल, नगरपालिकेच्या इंजिनिअर्सना विचारले जाईल आणि पोलीस स्टेशनचे बांधकाम सुरु केले जाईल. या शिष्टमंडळाने आज अशाही भावना व्यक्त केल्या की, "आम्हाला वाटत होते की, आमच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे, तेवढे आपण तपासून पहावे. परंतु, एवढा प्रकार वाढेल, असा प्रसंग येईल आणि धर्मा-धर्मात तणाव निर्माण होईल याची किंचितही कल्पना आम्हाला नव्हती."

..2...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ KGS/

श्री.कपील पाटील : सभापती महोदय, धर्मा-धर्मात तणाव आजही निर्माण झालेला नाही. त्यामुळे सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यासंबंधी केलेला उल्लेख मागे घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी त्या विषयाकडे येणार आहे. परंतु, जो काही प्रसंग यामधून घडला त्यातून एक वातावरण असे झाले की, पोलीस विरुध्द अल्पसंख्यांक, दुस-या बाजूने काही लोक कारसेवा करण्यासाठी त्या ठिकाणी गेले आणि पोलीस स्टेशन आम्ही बांधू असे सांगू लागले. यामधील काही लोक या राज्याचे माजी मंत्री होते. ते ज्यावेळी मंत्री होते त्यावेळी भिवंडीमध्ये पोलीस स्टेशन नाही, ते बांधले पाहिजे, असे त्यांना वाटले नव्हते.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एकच गोष्ट लक्षात ठेवावी की, त्यांनी या सदनामध्ये असे आश्वासन दिले होते की, 8 दिवसाच्या आत पोलीस स्टेशन बांधले जाईल. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जर या सदनामध्ये असा खुलासा केला असता की, 8 दिवसात पोलीस स्टेशन बांधू शकलो नाही आणखी 4 दिवसांची मुदत द्यावी तर हा प्रश्नच उद्‌भवला नसता. त्यामुळे ही जबाबदारी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांची आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी मला सांगण्यात आले की, मी स्वत: उद्या जाणार आहे, त्यावेळी मी आणि सन्माननीय मुख्यमंत्री यांनी व्यक्तिश: त्यांना सांगितले होते. तरी सुध्दा जाण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली. जाऊ द्या, पुढे त्यांना पोलिसांनी अडविले, पुढचा काही प्रकार घडला. आज महाराष्ट्रामध्ये 123 पोलीस स्टेशन्स अशी आहेत की, ज्यांना इमारती नाहीत. मुंबईमध्ये अशी काही पोलीस स्टेशन्स आहेत की त्यांनाही सुसज्ज इमारती नाहीत.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ...........

पोलीस स्टेशनच बांधावयाचे असते तर ते कोठेही बांधता आले असते आणि आम्ही परवानगीही दिली असती. दुसरीकडील पोलीस स्टेशनबद्दल काही देणेघेणे नव्हते, कोणत्या भावनेतून आपण या भूमिका घेत आहात ? मी सांगितले होते की, 8 दिवसात कागदपत्रे तपासून बघू आणि शासनाची जागा असेल तर पोलीस स्टेशन बांधू. अनेक प्रसंगांमुळे परिस्थिती बदलत असते. ज्यावेळी 8 दिवसाची मुदत दिली होती. त्यावेळी राज्यात स्फोट झालेले नव्हते. आश्वासन दिल्यानंतर दुस-या दिवशी मुंबईमध्ये स्फोट झाले. परिस्थिती बदलली. स्फोट झाल्यानंतर व्ही.आय.पी. राज्यामध्ये आले. स्फोट झाल्यामुळे तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली होती. आरोपींना पकडावयाचे होते. पुन्हा असे प्रसंग घडू नयेत, म्हणून पोलिसांना जागरुक राहण्याची भूमिका घ्यावी लागत होती. अशा परिस्थितीमुळे पोलीस दलाची प्रॅायॅरिटी बदलली होती. एका बाजूला अशी परिस्थिती असतांना दुस-या बाजुला 8 दिवसांच्या टेक्निकल बाबीवर येऊन उतरणे किती योग्य होते, हे मी त्यांच्यावरच सोपवितो. आज रजा अकादमीने पुढे येऊन हा प्रश्न सोडविण्याची तयारी दाखविली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

जी स्फोटके सापडली त्याबद्दल आम्हाला माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीवरुन मराठवाडा परिसरामध्ये जवळ जवळ दीड महिना पाळत ठेवून 16 अे.के.47, 3,200 काडतुसे, 43 किलो आर.डी.एक्स., 50 हात बॅाम्ब ही सर्व शस्त्रे पकडण्यामध्ये आणि 17 आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आलेले आहे. आरोपींना सोडण्याची भूमिका घेतली नाही. माहिती मिळाल्यानंतर आरोपींना पकडण्याची भूमिका पोलिसांनी घेतलेली आहे. तरी सुध्दा स्फोट झाले, या गोष्टीचा आम्हाला खेद आहे. मागच्या वर्षभरातील परिस्थिती बघितली तर आपली परिस्थिती बघत असतांना जगातील परिस्थिती देखील आपल्याला बघावी लागेल. कारण आपला देश जगाच्या बाहेर नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आधी आपल्या घराबद्दल माहिती द्यावी. त्यानंतर जगाची माहिती द्यावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, दिनांक 7 जून, 2005 रोजी लंडन येथे स्फोट झ ाला, दिनांक 11 मार्च, 2004 रोजी माद्रीद स्पेन येथे स्फोट झाला, दिनांक 12 मे, 2003 रोजी चेचन्या येथे स्फोट झाला, दिनांक 10 ऑक्टोबर, 2004 रोजी दिल्ली येथे स्फोट झाला आणि



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ..........

न्युयॉर्कमध्ये देखील टॉवर उडविला गेला. जगभरामध्ये घडलेल्या घटना बघितल्यानंतर तेथील लोक, तेथील विरोधी पक्षाचे लोक, तेथील शासन कसे वागले हे सुध्दा बघण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, माननीय श्री.लालकृष्ण अडवाणीसाहेब राज्यामध्ये आले होते. त्यांनी कोणतेही राजकारण मध्ये न आणता स्पष्टपणे सांगितले की, हा हल्ला मुंबईवरचा हल्ला मानता कामा नये, हा आपल्या देशावर झालेला हल्ला आहे. माननीय पंतप्रधान राज्यामध्ये आल्यानंतर त्यांनी सांगितले की, हे संकट सिमेपलिकडून आलेले आहे. ज्यावेळी देशावर हल्ला होतो त्यावेळी स्थानिक मतभेद सर्वांनीच बाजूला ठेवणे क्रमप्राप्त ठरते. काही प्रमाणामध्ये स्थानिक मतभेद ठेवलेले आहेत. त्या दिवशी मी मुंबईच्या जनतेला धन्यवाद दिले. बॉम्बस्फोट झाल्यानंतर मुंबई तातडीने पूर्ववत झाली. बॉम्बस्फोट झाल्यानंतर पंचविसाव्या मिनिटाला मी माहीम येथे पोहोचलो होतो. हजारो तरुण स्फोट झालेल्या बोगी जवळ होते. अजून स्फोटके असू शकतात तुम्ही बाजूला व्हा असे पोलीस त्या तरुणांना सांगत होते.

यानंतर श्री.सुंबरे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .....

सभापती महोदय, पण एकही जिद्दी तरूण तेथून बाजूला हटत नव्हता आणि चार मिनिटांमध्ये तेथील डेड बॉडीज् आणि जखमी लोकांना बाहेर काढण्यासाठी सगळेजण प्रयत्न करीत होते. खरे तर त्यांनी त्या ठिकाणाहून बाजूला जाणे हे बंधनकारक होते पण ते बंधन झुगारून एकमेकाला मदत करण्यामध्ये सगळेचजण तेथे कार्यरत होते. आज मुंबईमध्ये एक स्फोट झाला आणि पोलीस दलाच्या कामगिरीपासून इंटेलिजन्स पर्यंत अनेक प्रश्नचिन्हे सगळ्यांनीच उभी केली. सभापती महोदय, जगातील असा कोणता देश आहे की, ज्यांच्याकडे 100 टक्के पूर्ण माहिती आहे ? अशा प्रकारे 100 टक्के इंटेलिजन्स जगातील देशांकडे असतील तर अमेरिकेमध्ये टॉवर्स उडविले गेले नसते, लंडनमध्ये बॉम्बस्फोट झाले नसते, काही देशांनी आपल्या पंतप्रधानांना का गमावले असते ? इतकेच काय पण पार्लमेंटमध्ये अतिरेकी कसे काय घुसू शकले असते ? यापूर्वी मुंबईमध्ये बॉम्बस्फोट का झाले असते ? ....

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सभागृहाची वेळ 12.30 पर्यंत होती. त्यामुळे आता सभागृहाची वेळ वाढविण्याची आवश्यकता आहे.

**उपसभापती** : बरोबर आहे. सभागृहाची वेळ या प्रस्तावावरील उत्तर संपेपर्यंत, 1.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मुंबईमध्ये स्फोटके आणत असताना लष्कर-ए-तोयबाच्या चार अतिरेक्यांना जानेवारीमध्ये महिन्यामध्ये पोलिसांनी पकडले आहे. नागपूर येथील आरएसएसच्या कार्यालयावर हल्ला होत असताना पकडून ठार मारण्यामध्ये आपले पोलीस यशस्वी झाले आहेत. मराठवाड्यातून शस्त्रास्त्रे पास होत असताना ती पकडण्यामध्ये देखील आपले पोलीस यशस्वी झाले आहेत. सभापती महोदय, अशा प्रकारे गेल्या वर्षभरातील घटना पाहिल्या तर आपल्या पोलीस दलाचा सर्वच ठिकाणी विजय झालनेला आहे, त्यांना यश मिळालेले आहे. परंतु एका अपवादात्मक परिस्थितीमध्ये अतिरेकी यशस्वी ठरले असले म्हणून राज्यातील आणि या मुंबईतील पोलीस यंत्रणा पूर्णपणे नाकाम झालेली आहे असे वातावरण निर्माण करण्यामध्ये काहीही अर्थ नाही. सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. पहिले चार दिवसात गृहमंत्री म्हणून मला अनेक प्रश्न विचारले गेले. या स्फोटांचे धागेदोरे सापडले की नाहीत ? अतिरेकी पकडले गेले की नाही ? एक ना दोन, अनेक प्रश्न विचारले गेले. सभापती महोदय, लंडन मधील

....... इइ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

स्फोटांमधील आरोपी अजूनही सापडलेले नाहीत. तेथे तर कॅमेरे वगैरे सगळी काही यंत्रणा कार्यरत आहे पण अजूनही तेथील पोलीस देखील आरोपींना पकडू शकलेले नाहीत. तेथे स्फोट झाल्या बरोबर सुरक्षेच्यादृष्टीने रेल्वेने जी उपाय योजना .....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांना मी विनंती करीन की, त्यांनी मागे केलेले भाषणच पुन्हा येथे करू नये. आज आम्ही जे मुद्दे येथे उपस्थित केलेले आहेत त्यावर त्यांनी उत्तर द्यावे.

श्री. आर.आर.पाटील : पण आजच्या चर्चेतही तेच ते मुद्दे उपस्थित केले गेले असतील तर मी देखील तेच उत्तर देणार आहे. सभापती महोदय, 1300 कोटी रूपये त्यांनी खर्च करून उपाय योजना केली ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या चर्चेमध्ये आम्ही अनेक वेगळे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. 2003 च्या बॉम्बस्फोटातील काही आरोपी पकडले गेले आहेत पण काही अजूनही वॉंटेड आहेत. तसेच त्यानंतरच्या घटनांतील काही आरोपी पकडले गेले नाहीत, आरडीएक्स पकडले गेले नाही, असे अनेक मुद्दे आम्ही उपस्थित केले आहेत त्यावर गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, मी सगळ्यांच मुद्यांवर उत्तर देत असताना मला आपल्या मुद्यांपर्यंत येऊ तरी द्यात. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही लंडन संबंधात काहीही विचारलेले नाही. बाहेरच्या देशांतील माहिती येथे देण्याची गरजच नाही. ती माहिती मंत्री महोदय कशासाठी देत आहेत ? ....

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ... )

श्री. जितेंद्र आव्हाड : दहशतवादाची लढाई ही जागतिक लढाई आहे त्यामुळे ते विषय देखील मंत्री महोदयांच्या भाषणात येऊ शकतात. ...

( अडथळा )

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथमत: सर्वांनी खाली बसावे. मी सर्वांनाच विनंती करतो की, मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण चालू आहे, त्यांचे म्हणणे आपण पूर्णपणे ऐकून घ्यावे.

...... इइ 3 ...



KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 12:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : पण गृहमंत्र्यांनी हेच भाषण मागील वेळेसही केले आहे. तेच भाषण ते आता रिपिट करीत आहेत, त्याची येथे गरज नाही हेच आम्ही सांगतो आहोत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, चर्चेमध्ये सगळे मुद्दे तेच असतील तर उत्तर देखील तसेच येणार आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आम्ही सगळे वेगळे मुद्दे चर्चेत उपस्थित केले आहेत. विशेष करून पोलिसांची मानसिकता कशी बदलली गेली आहे हे आम्ही येथे दाखवून दिलेले आहे ...

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा ..)

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांचे, विरोधी बाकांवरील सदस्यांची भाषणे या बाजूने आम्ही ऐकून घ्यायची आणि मी बोलत असताना, त्यांनी मात्र वेळोवेळी अडथळे आणावयाचे हे बरोबर नाही. ..

( यानंतर श्री. सरफरे .... एफएफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी या कारवाया देशाच्या सीमेपलिकडून होत असल्याचे म्हटले आहे....

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आम्ही उपस्थित केलेले मुद्दे वेगळे होते...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या बॉम्बस्फोटाचा तपास लवकरात लवकर लागावा याकरिता सर्वांची उत्सुकता आहे. जेवढी उत्सुकता जनतेला आहे तेवढी या राज्याचा गृहमंत्री म्हणून मला देखील असणे स्वाभाविक आहे. ही घटना घडल्यानंतर केंद्र सरकारची गुप्तचर यंत्रणा, क्राईम ब्रँचचे अधिकारी, अे.टी.एस. चे अधिकारी, मुंबईचे पोलीस दल, महाराष्ट्राचे पोलीस दल हे आपापल्यापरीने माहिती गोळा करण्याचे काम करीत होते. आज मला याठिकाणी सांगावयास आनंद वाटतो आणि मी पहिल्यांदाच सांगतो की, कालच्या या घटनेशी संबंध असलेले पुरावे पोलिसांना मिळाले आहेत. त्यामध्ये 1) कमाल अहमद वकील अन्सारी वय 32 वर्षे 2) खालिद अजिज रौनक अजिज शेख वय 24 वर्षे यांना बिहारमधील नेपाळच्या बॉर्डरवरुन काल अटक करुन मुंबईमध्ये आणण्यात पोलीस दलाला आणि केंद्रीय गुप्तचर दलाला यश मिळाले आहे. मुमताज अहमद मकबूल अहमद चौधरी यालाही पकडण्यात आले आहे. या गुन्हयाचा तपास अतिशय संवेदनशील असल्यामुळे याबाबतची सविस्तर माहिती आता देणे योग्य ठरणार नाही. परंतु मी राज्याच्या जनतेला विश्वास देतो की, या गुन्हयाचा तपास अत्यंत वेगाने सुरु आहे. घटना घडल्यानंतर या प्रकरणी कोण तपास करणार आहे, यासंबंधी मनामध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे भाष्य माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केले. ही घटना घडल्यानंतर दोन तासाच्या आत पोलीस आयुक्तांच्या कार्यालयामध्ये मी स्वत: जाऊन बसलो होतो. सर्व विभागाचे लोक त्याठिकाणी होते. या गुन्हयाचा तपास करु शकतील अशा सक्षम अधिकाऱ्यांची त्यांना साथ होती. तीन तासाच्या आत तपास करण्याकरिता सात युनिटचे स्क्वॉड त्याठिकाणी नेमले होते आणि ते घटनास्थळावर जाऊन पोहोचले होते. घटना घडल्या बरोबर एक तासाच्या आत सीमा बंद करण्याचे काम पोलीस दलाने केले होते. ज्या काही उपाययोजना कराव्या लागतात त्या करण्यात कोणतीही कसूर ठेवलेली नाही. या आरोपींना अटक करुन या देशातील स्टेट इंटेलिजन्सने, राज्य पोलीस दलाने आपली क्षमता पुन्हा एकदा सिध्द केली आहे. मुंबईवर हल्ला केला जातो, मुंबईचे पोलीस दल दुबळे म्हणून नव्हेतर मुंबईवर व मुंबईच्या पोलीस दलावर हल्ला केला जातो तो या देशाला दुबळा करण्यासाठी असेल. एखाद्या प्रसंगामध्ये त्यांना यश मिळाले असेल, परंतु या अतिरेक्यांपर्यंत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील...

पोहोचण्यामध्ये मुंबईच्या पोलीस दलाला नेहमी यश आले आहे.आणि भविष्यामध्ये सुध्दा हे यश केवळ आमच्या बाजूला असेल. त्यासाठी ज्या काही गोष्टी कराव्या लागतील त्या करण्याची पूर्णपणे या सरकारने तयारी ठेवली आहे. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आजपर्यंत आमचे बजेट हे डेव्हलपमेंटसाठी, विकासाचा केंद्रबिंदू मानून केले जात असे, प्लॅनवर आधारीत केले जात असे. गेल्या वर्षीचा आपला सुरक्षेवरील खर्च 100 कोटींचा होता. यामध्ये आता आम्ही आमूलाग्र बदल करण्याचे ठरविले असून जनतेच्या जीवाचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे या कामाला राज्य शासनाचे पहिले प्राधान्य राहिल. मागील बजेटच्या प्रॅायॅरिटीज बदलल्या जातील. त्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ तयार करुन आवश्यक असलेले स्टेट इंटेलिजन्स वाढवून कायदेशीर लढाया लढण्यासाठी योग्य सक्षम वकील नेमण्याची भूमिका स्वीकारुन गुन्हेगारांना जरब बसविण्यासाठी जे काही करावे लागेल ते करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न राज्य सरकारकडून केला जाईल. ही गोष्ट खरी आहे की, आज पोलिसांकडून लोकांच्या अपेक्षा खूप वाढत चालल्या आहेत. त्याचबरोबर हेही लक्षात आले आहे की, 1 ते 5 क्रमांकाचे गुन्हे त्यामध्ये खून, खूनाचा प्रयत्न, दरोडे,...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु..

जबरी चोरी इ.च्याबाबतीत राज्यामध्ये कमालीची घट होत आहे त्याचबरोबर नार्कोटिक्सच्या गुन्ह्याच्या बाबतीत जेवढया वर्षभरामधील केसेस नोंदल्या गेलेल्या आहेत, त्याच्या दीडपट केसेस पाच महिन्यात पोलिसांनी रजिस्टर केलेल्या आहेत. अवैध दारुच्या व्यवसायावर काही प्रमाणात नियंत्रण आणलेले आहे, एक्साईजचे उत्पन्न 700 कोटी रुपयांची वाढलेले आहे.

सन्माननीय सदस्यांनी सावकारीच्या संबंधात उल्लेख केला. मी निदर्शनास आणून देतो की, अनेक अडथळ्यांची शर्यत आपण करत आहोत. आम्ही ज्या गांभीर्याने भूमिका घेतलेली आहे, तीच भूमिका पोलिसांनी घेतलेली आहे. 1600 सावकारांना अटक करण्याचे काम पोलिसांनी केलेले आहे. यामुळे राज्यातील सावकारी संपली असा माझा दावा नाही. पंरतु सहा महिन्याच्या कालावधीमध्ये पोलिसांनी हे काम केलेले आहे. महाराष्ट्र हे देशातील असे राज्य आहे की, येथे 5-6 महिन्याच्या कालावधीमध्ये 1600 सावकारांवर कारवाई केलेली आहे. एका बाजूने कारवाई सुरु असताना, या संबंधातील ज्या काही तक्रारी येतात, त्याची शहानिशा करुन, तपासणी करुन गुन्हा रजिस्टर करावा लागतो. अन्यथा कोर्टामध्ये पोलिसांचे हसे होते. म्हणून मी विनम्रपणे सांगतो की, ज्या सावकारांच्या विरुध्द तक्रारी आल्या, ते सावकार कोण आहेत, हे न पहाता त्यांच्या विरुध्द गुन्हे रजिस्टर करण्याचे काम पोलिसांनी केले. सन्माननीय सदस्यांनी ज्या तक्रारीचा उल्लेख केला, त्याबाबतीतील प्रकरण तपासून घेतले जाईल. त्यामध्ये थोडे जरी तथ्य आढळून आले तर...

श्री.पांडुरंग फुंडकर : यासाठी किती वेळ घ्यायचा यालाही काही मर्यादा आहेत. सहा महिने होऊन गेले तरी काही कारवाई केलेली नाही. अजूनही तपास चालू आहे. किती दिवस हा तपास केला जाणार आहे ? एका पोलीस स्टेशनमध्येच याबाबतच्या 55 तक्रारी आलेल्या आहेत.

श्री.आर.आर.पाटील : त्या तक्रारींमधील तथ्य समजून घेणे आवश्यक आहे. विधानसभेमध्येही या संदर्भात चर्चा झाली. सावकाराने बायको पळवून नेल्याची एक तक्रार आलेली होती. त्या संदर्भातील गेल्यावर्षी याच तक्रारदारांनी माझी बायको पाच तोळे सोने आणि 16 हजार रुपये घेऊन पळून गेली असल्याची तक्रार केलेली होती. आता तोच तक्रारदार बायको सावकाराने पळवून नेल्याची तक्रार करत आहे. या तक्रारींच्या प्रती माननीय विरोधी पक्ष नेत्यांना द्यायला मी तयार आहे. जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात, त्याची नोंद काही वर्षापूर्वी झालेली असते, अशा प्रकरणामध्ये पोलिसांनाही गुन्हा नोंदविण्यास मर्यादा येतात. याबाबतीत कोणत्याही राज्याने न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केलेली कामगिरी महाराष्ट्राच्या पोलीस दलाने करुन दाखविलेली आहे. हे सगळे करत असतांना पोलिसांचे मनुष्यबळ अपुरे पडते. त्यामध्येही काही प्रमाणात वाढ करण्याचा आम्ही निर्णय घेतला आणि 11031 पोलिसांची भरती करण्यात आली. तीही संख्या कमी पडेल, म्हणून यापुढे आणखी पोलिसांच्या संख्येमध्ये आणखी वाढ करण्याची भूमिका राज्य सरकारमार्फत स्वीकारली जाईल. रेल्वे वाहतूक सुरक्षित करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, तशी सुरुवात केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी समुद्रमार्गे आरडीएक्स येण्याची शक्यता असल्यामुळे त्या ठिकाणची सुरक्षा व्यवस्था ठेवण्याबाबातचा मुद्दा उपस्थित केला. केवळ महाराष्ट्रातील समुद्र किनारा सुरक्षित ठेवला तरी समुद्र केवळ महाराष्ट्राच्या बॉर्डरवर आहे अशातला भाग नाही. दुसऱ्या राज्यामध्येही आहे. म्हणून सागरी किनाऱ्यावरील सुरक्षा व्यवस्था करत असतांना, बाहेरच्या राज्यात असलेल्या समुद्र किनाऱ्यावरुनही स्फोटके येऊ शकतात. मराठवाड्यामध्ये जी शस्त्रे सापडली ती दक्षिणेकडून आली असल्याची माहिती मिळालेली आहे.

यानंतर श्री.बरवड....

`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

सभापती महोदय, एकंदरीत देशाचा सागरी किनारा आपल्याला सुरक्षित करावा लागेल. त्यादृष्टीने केंद्र सरकारने आवश्यक पावले उचललेली आहेत. केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये जो सागरी किनारा आहे तो सुरक्षित करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारच्या काही प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. सागरी किनारा सुरक्षित करीत असताना डिसेंबर, 2005 मध्ये 40 कोटी 92 लाख रुपयांच्या सागरी किनारा सुरक्षा योजनेला केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे. त्याची लवकरच महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी होणार आहे. या योजनेअंतर्गत नवीन 12 सागरी पोलीस ठाणे गठीत करणे, असलेल्या 24 चेकपोस्ट स्टेशनचे नूतनीकरण करणे, 32 नवीन चेकपोस्ट तयार करणे त्याचबरोबर 25 जीप्स आणि 28 स्पीड बोटी खरेदी करणे यासाठी हा निधी खर्च होणार आहे. या कामाला लवकर सुरुवात करण्यात येईल आणि आम्ही जे नियोजन केलेले आहे त्याप्रमाणे यावर्षी राहिलेल्या अर्ध्या वर्षामध्ये 2 कोटी 19 लाख रुपये खर्च होणार आहेत. समुद्राकडे सुध्दा केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे कटाक्षाने लक्ष आहे. या पध्दतीने कोणताही धोका होणार नाही यासाठी योग्य त्या उपाययोजना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, क्राईम ब्रँचच्या बाबतीमध्ये मी फारसे बोलू इच्छित नाही. ज्या काही गोष्टी करावयाच्या आहेत त्या फारशी चर्चा न करता करण्याची आवश्यकता असते. क्राईम ब्रँचच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी वेगळा मुद्दा मांडला. बोलण्यापेक्षा योग्य कृती करणे मी योग्य समजतो. याबाबतीत जे निर्णय आतापर्यंत घेण्यात आले आणि भविष्यामध्ये जे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे ते निर्णय घेतले जातील असा मी विश्वास देतो. आपण क्राईम ब्रँच प्रामुख्याने खंडणीच्या संदर्भात गठीत केली होती. गँगस्टर लोक मोठ्या व्यापाऱ्यांकडून, बिल्डर्सकडून, उद्योगपतींकडून खंडणी मागतात. तो प्रकार थांबविण्यासाठी या युनिटची रचना केली होती. मी आज एवढेच सांगेन की, खंडणीच्या एवढ्या कमी घटना यापूर्वी कधीच नव्हत्या. खंडणी मागण्याची हिंमत कोणी दाखवतील अशी परिस्थिती नाही. कोणी खंडणी मागितलीच तर त्यांना जिवंत ठेवावयाचे नाही अशी भूमिका पोलिसांनी सुध्दा वेळोवेळी सिध्द करुन दाखवली आहे. आज खंडणी जवळजवळ हद्दपार करण्यात आलेली आहे. फसविण्याच्या भूमिकेतून येणारे किरकोळ दोन चार फोन सोडले तर या प्रकाराला आज पूर्णपणे पायबंद घालण्यामध्ये पोलीदल निश्चितपणे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. आर. आर. पाटील ....

यशस्वी झालेले आहे. या ठिकाणी अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. एस.आर.ए. योजनेमध्ये अंडरवर्ल्डचे लोक आहेत असे सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले. त्यासंदर्भात आपण आर्थिक गुन्हे शाखा गठीत केलेली आहे. ती शाखा याबाबतीत काम करीत असते. कोणत्या राज्यकर्त्यांचे, कोणत्या गँगस्टरचे पैसे त्यामध्ये गुंतलेले आहेत याची माहिती आपल्याकडे असेल तर ती द्यावी. असे काम करण्यास मलाही आवडते. निश्चितपणे त्यामध्ये जे कोणी असतील त्यांच्यावर आपण कारवाई करण्यास कचरणार नाही असा मी आपल्याला विश्वास देतो. सभापती महोदय, त्याच त्याच प्रश्नांची पुन्हा पुन्हा या सदनामध्ये चर्चा झाली होती. त्यामुळे आतापर्यंत दिलेली उत्तरेच देण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नव्हता. महंमद अफरोज, अब्दुल रझाक या अल कायदा संघटनेच्या लोकांवर वेळेवर चार्जशीट दाखल न केल्यामुळे त्यांना जामीन मिळाला. त्यांना पोटा कायद्याच्या अंतर्गत सात वर्षाची शिक्षा झालेली आहे. माझ्याकडे सर्व रेकॉर्ड आहे. त्यांची चार्जशीट एवढ्याच कारणासाठी तयार झाली नव्हती की, त्या आरोपीच्या संदर्भात काही माहिती आपल्याला परदेशातून आणावयाची होती. सी.बी.आय.मार्फत परदेशातून ती माहिती आणण्याचा प्रयत्न झाला. परदेशातून 90 दिवसांमध्ये पुरावे आणणे सी.बी.आय.ला आणि पोलीस दलाला शक्य झाले नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, परदेशातून माहिती आणावयाची होती म्हणून चार्जशीट दाखल केली नाही. जे सगळे परदेशी आरोपी आहेत त्यांच्या चार्जशीट्स दाखल होत नाहीत काय ? पोलीस प्रोसीजरप्रमाणे त्यांची प्राथमिक चार्जशीट दाखल करतात आणि मॅजिस्ट्रेटकडून वेळ मागून घेतात व त्यानंतर माहिती आल्यावर ॲडिशनल चार्जशीट दाखल करतात. चुकीची माहिती रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी हे सांगितले.

श्री. आर. आर. पाटील : या प्रकरणामध्ये चुकीची माहिती देण्याची आवश्यकता नाही.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:50

(श्री. आर.आर.पाटील...)

90 दिवसाच्या आत गुन्हेगारांवर पोटा कायदा लावण्यात आला. याबाबतीत विविध समित्या आणि न्यायाधीश देखील आहेत. त्यांच्या कमिटीने घेतलेला तो निर्णय आहे. आज या देशावर हल्ला करणा-या कोणत्याही आरोपीला ना कधी पाठिंबा होता, ना कधी तो असणार आहे. तेव्हा या ठिकाणी ज्या प्रमाणे भावना व्यक्त करण्यात आल्या त्या पाहता अशा पध्दतीने कोणत्याही गुन्हेगाराला कोणीही पाठिशी घालण्याची भूमिका घेऊ शकत नाही इतकेच मी सांगतो.

आज राज्यातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एक चांगली सूचना करण्यात आली. कधी कधी पोलिसांवर दगडफेक केली जाते, लाठी चार्ज होतो. अशा वेळी पोलिसांना नाईलाजास्तव गोळीबार करावा लागतो. मग अशा घटनांमध्ये मृत वा जखमी झालेल्यांना मदत घेण्याची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे. मालेगाव येथील घटनेनंतर ही भूमिका राज्य सरकारने स्वीकारली. अशा प्रकारची मदत गुन्हेगाराला का करावयाची, असे जे मत या ठिकाणी व्यक्त करण्यात आले त्या मताशी मी देखील पूर्णपणे सहमत आहे. काही ठिकाणी असेही आढळून आले आहे की, पोलिसांनी गोळीबार केल्यानंतर जे हिंसाचारमध्ये नव्हते असे निरपराध देखील मृत्यूमुखी पडलेले आहेत. जर मरणारा निरपराध असेल, तो त्या मोर्चामध्ये, दंगलीमध्ये, हिंसाचारामध्ये सहभागी नाही हे सिध्द होत असेल तरच त्याला मदत देण्याची भूमिका स्वीकारली जाईल, अन्यथा पोलीस गोळीबारामध्ये जखमी वा मृत झालेल्याला मदत न देण्याची भूमिका स्वीकारली जाईल. अशा प्रकारे मदत देण्याचे राज्य सरकारचे धोरण चुकीचे होते. त्या धोरणामध्ये बदल केला जाईल. या पुढच्या काळामध्ये अशी घटना घडली तर त्यामध्ये जे जखमी वा मृत होतील, जे कायद्याला आव्हान देण्याची भूमिका स्वीकारतील त्यांना मदत देण्याची भूमिका स्वीकारली जाणार नाही. राज्याचे पोलीस दल वाढवणे, सुरक्षा व्यवस्था वाढवणे या सगळ्या गोष्टी गतीने आणि आक्रमकपणे सुरु आहेत. परंतु एखादी कुठे उणीव राहिली म्हणून संपूर्ण पोलीस यंत्रणेलाच दोष देण्याची भूमिका स्वीकारणे बरोबर नाही. उलट या घटनेमध्ये पोलीस दल, आम्ही स्कॉटलंड यार्ड पोलिसांच्या दोन पावले पुढे आहोत, हे कृतीने सिध्द करुन दाखवील. ही गोष्ट खरी आहे की, एखादा सुनील मोरे सारखा बिनडोक माणूस एखादे कृत्य करतो. पण त्या बलात्काराच्या घटनेचा तपास लावून पोलिसांनी त्याला देखील शिक्षा केलेली आहे. तो पोलीस दलातील होता म्हणून कोणीही त्याची पाठराखण केली नाही. कुठे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...

तरी एखादी चूक झाली म्हणजे सगळे पोलीसच चुकीचे वागतात, असे घडत नाही. आज पोलिसांचा ॲव्हरेज ड्युटीचा वेळ 16 तासावर पोहोचला आहे. मागील एक आठवड्यामध्ये कोणालाही सुट्टी किंवा रजा देता आलेली नाही. कधी पूर तर कधी अतिवृष्टी तर कधी बॉम्बस्फोटासारखे संकट, अशा परिस्थितीमध्ये पोलिसांना प्रचंड तणावाखाली काम करावे लागते. अशा वेळी आपल्यामुळे पोलिसांचे काम वाढणार नाही याचा प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. एका बाजूला ही परिस्थिती असताना दुस-या बाजूला कायदा हातात घेऊन स्वत:च्या राजकारणाच्या फायद्यासाठी जाती जाती मध्ये तेढ निर्माण करणारे राज्यामध्ये कमी आहेत असे नाही. या राज्यातील हिंदु-मुस्लिम यांच्यामध्ये तेढ निर्माण करुन दंगली सुरु व्हाव्यात, राज्यामध्ये एकात्मतेचे प्रश्न निर्माण व्हावेत असे प्रयत्न आतंकवाद्यांकडून होत असून केवळ राजकारणासाठी अशा गोष्टी कोणी पुढे आणण्याचा प्रयत्न केला तर आतंकवाद्यांच्या अपेक्षा आपण पूर्ण करायला निघालो आहोत असा त्याचा अर्थ होईल. तेव्हा याही गोष्टीचा विचार केला पाहिजे. कोणी तरी असे घोषित करतो की, "माझ्यावर काही कारवाई केली तर 20 कोटी लोक रस्त्यावर उतरतील." ..(अडथळा)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 12:55

श्री.आर.आर.पाटील........

मुस्लिम समाजातील प्रमुख संघटनांनी पत्रक काढले, कोण आमचा नेता व्हायला निघाला, आम्ही त्याला विचारत सुध्दा नाही. पण त्यांचे तिकडे प्रयत्न आहेत की, 20 कोटी लोकांचा पुढारी व्हायचे. आपण त्याचे नाव घेऊन त्याला का हिरो बनविता या प्रश्नाचे उत्तर मला कळत नाही. अशी कुणाची अपेक्षा आहे का? मुस्लिम संघटित झाले तर दुसरी बाजू आपोआप संघटित होईल. सभापती महोदय, अशा पध्दतीने समाजाची तोडफोड ही देशाला, राज्याला हितकारक आहे का? आज मुंबईच्या जनतेने आणि महाराष्ट्राच्या जनतेने घेतलेली भूमिका आपण तपासून बघण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, भिवंडीमध्ये जो प्रकार घडला त्याच्या प्रतिक्रिया भिवंडीच्या बाहेर उमटलेल्या नाहीत. मुंबईमध्ये आठ बॉम्बस्फोट झाले तरी चार तासात मुंबई पूर्ववत झाली. जनतेने प्रतिक्रिया देण्याऐवजी पोलिसांनी त्यांचे काम करावे, गुप्तचर यंत्रणेने त्यांचे काम करावे. हा प्रश्न जनतेने सरकारवर सोपविला. याचे भांडवल करुन आता तेढ निर्माण होणार नाही, आंतकवाद्यांची इच्छा साकार होणार नाही यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळी देशापेक्षा, राज्यापेक्षा पक्ष मोठा बनविण्याचा प्रयत्न करतात, स्वार्थ अधिक जवळ जातो त्यावेळी अशा चुका घडू शकतात. यातून आपले राज्य फार होरपळून गेले आहे. या राज्याने दंगली बघितल्या, बॉम्बस्फोट बघितले. चुकांची पुनरावृत्ती हे शहाणपणाचे लक्षण नसते. म्हणून माझे सदनाला आवाहन आहे, आपल्या मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये शांतता राखण्यासाठी आपल्या परीने जे करता येईल ते करण्याचा या संवेदनशील परिस्थितीमध्ये प्रयत्न केला पाहिजे. शांततेच्या वातावरणातच विकास होत असतो. भांडवली गुंतवणूक येत असते. उद्योगधंदे उभे राहतात, त्यातून बेकारांच्या हाताला काम मिळते. जर रोज आगीच लागल्या तर कोणता उद्योगपती भांडवल गुंतवणूक करेल, कोण कारखानदारी निर्माण करेल, रोजगाराच्या संधी कशा निर्माण होतील? सभापती महोदय, राजकारणाच्या पलिकडे सुध्दा देश महत्वाचा आहे, राज्य महत्वाचे आहे. या भूमिकेतून सगळयांनी बघण्याची आवश्यकता आहे. संवेदनशील प्रश्नावर काही काळासाठी राजकारण करता येईल. पण महाराष्ट्रातील जनतेचा मात्र सगळया अतिरेक्यांसाठी संदेश आहे, अतिरेकी संघटना त्यांचे काम करण्यासाठी सरसावल्या असतील तर महाराष्ट्राची जनता कोणत्याही अतिरेक्यांच्या पाठिशी नाही हे जनतेने कृतीने सिध्द केले आहे. जनतेला हवे ते सगळयांनी मिळून करण्याची गरज आहे................





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी पंढरपूर येथे जो बॉम्ब सापडला, दहशतवाद विरोधी पथकाची संख्या, लाऊडस्पीकर बंदी व महिलांवरील खटल्यांचा प्रश्न उपस्थित केला होता त्याबाबत मंत्रीमहोदयांनी काहीही उत्तर दिलेले नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावर दोन तास चर्चा झाली आणि उत्तर द्यायला फक्त अर्धातास वेळ देण्यात आला आहे. जो वेळ प्रश्न विचारण्यासाठी देण्यात आला तेवढा वेळ मला उत्तर देण्यासाठी लागेल. सभापती महोदय, पंढरपूर येथे जो बॉम्ब सापडला तो तपासण्यात आला आहे. या देशातून परदेशातून भंगार आणले जाते. भंगारातून जुन्या युध्दामध्ये वापरलेली शस्त्रे, शिल्लक सुटे पार्टस् यापूर्वी देखील आणले गेले आहेत. बिहारमध्ये अशा वस्तूचा स्फोट होऊन मध्यंतरी 22 माणसे दगावली होती. आपल्या राज्यात गेल्या तीन वर्षात 9 माणसे मेली आहेत. हे भंगार आणले जाते त्यामध्ये युध्दात वापरलेल्या साहित्याचा समावेश असतो. कस्टममधून माल आणताना 25 टक्के चेकिंग केले जात होते. राज्य सरकारने पुढाकार घेतला आणि पुढच्या काळात परदेशातून भंगार आणीत असताना 100 टक्के चेकिंग कस्टमने केली पाहिजे अशा पध्दतीची मागणी केंद्र सरकारकडे केली व ती मागणी मान्य झाली आहे. आता 100 टक्के चेकिंग सुरु झाली आहे. युध्दामध्ये वापरलेला तो जुना बाम्ब होता. सभापती महोदय, ज्या महिलांवर दारुबंदी आंदोलनामुळे केसीस दाखल झाल्या, त्यांच्यावरील गुन्हयांच्या संदर्भात राज्य सरकारची ही स्पष्ट भूमिका आहे की, या केसीस काढल्या पाहिजेत. मात्र सुप्रीम कोर्टाच्या निकालाप्रमाणे सरकारला निर्णय घेऊन सरसकट केसीस काढता येत नाहीत. ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे त्यांच्या विनंतीवरुन सरकारने मेरिटप्रमाणे विचार करावा असा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. तरी सुध्दा पोलीस स्टेशन्सकडून अशा गुन्हयांची माहिती आम्ही घेतली आहे. जसजशी माहिती येईल त्याप्रमाणे केस टू केस काढण्याची भूमिका स्वीकारली जाईल. ही गोष्ट यापूर्वीच करायचे सरकारने ठरविले होते.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची वेळ आता संपत आलेली आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना केली होती त्यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी थोडक्यांत माहिती द्यावी. तसेच या विषयाच्या संदर्भात मलाही दोन मिनिटे बोलावयाचे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पवनराजेंच्या खुनाच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहाला माहिती द्यावी.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, पवनराजे यांच्या मुलांने या खुनाच्या संदर्भात पोलिसांकडे तक्रार केली होती. हा खून राजकीय हेतूने झालेला असावा अशी शंका त्यांनी व्यक्त केली होती त्यामुळे हा खून राजकीय हेतूने झालेला आहे काय याबाबत पोलिसांनी तपास देखील केलेला आहे. त्या अँगलने हा विषय हाताळला गेलेला आहे. परंतु यामध्ये आर्थिक व्यवहार देखील खूप मोठया प्रमाणात झालेला आहे. हा खून आर्थिक व्यवहारामुळे सुध्दा होऊ शकतो. परंतु या खुनाच्या संदर्भात अजून तरी पोलीस निष्कर्षाप्रत आलेले नाहीत. परंतु या केसमध्ये आर्थिक बाबीचाही उलगडा होत आहे. हे प्रकरण सीबीआय कडे देण्याची मागणी सुध्दा करण्यात आलेली आहे. हे प्रकरण सीबीआयकडे देण्याच्या संदर्भात सरकारचा कोणताही विरोध नाही. परंतु सीबीआय कडे खुनाच्या संदर्भातील प्रकरणे बरीच आहेत. आता खुनाच्या संदर्भात केसेस सीबीआय स्वीकारीत नाहीत, त्यांनी यासंदर्भात असमर्थता देखील व्यक्त केलेली आहे. परंतु या प्रकरणाच्या संदर्भात पोलीस योग्य दिशेने प्रकरण हाताळीत आहेत, हे प्रकरण योग्य दिशेने जात आहे एवढेच मी या निमित्ताने सांगतो. असे असतांनाही हे प्रकरण सीबीआयकडे द्यावयाचे काय? हे प्रकरण योग्य दिशेने जात असतांना देखील या प्रकरणाच्या संदर्भातील तपास सीबीआयकडे देण्यास आमची हरकत असणार नाही.

**उपसभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केलेला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ........

माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, भिवंडी येथे पोलीस स्टेशन बांधण्याच्या संदर्भात रझा अकादमीने संमती दिलेली आहे. एक गोष्ट मला सदनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की भिवंडी येथे पोलीस स्टेशन व्हावे म्हणून मी माझ्या आमदार फंडातून 10 लाख रुपये दिलेले आहेत, तसेच या पोलीस स्टेशनचे भूमिपूजन माझ्या हस्ते झालेले आहे, मी सुध्दा तेथील लोकप्रतिनिधी आहे. तसेच भिवंडीचे स्थानिक लोकप्रतिनिधी श्री. योगेश पाटील तसेच सन्माननीय सदस्य मुजफ्फर हुसेन यांनी सुध्दा आपल्या आमदार फंडातून पैसे दिलेले आहेत. तसेच भिवंडी महापालिकेने सुध्दा यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. आझाद मैदानावर जेव्हा यासंदर्भात निदेर्शने झाली त्यावेळेस रझा अकादमीचे लोक, भिवंडीच्या संदर्भात मला भेटायला येणार होते. यासंदर्भात मी त्यांना वेळ सुध्दा दिला होता परंतु कोणाच्या तरी प्रेरणेने हे लोक मला भेटण्यासाठी आले नाहीत. रझा अकादमीचे लोक जर मला भेटावयास आले असते तर पुढील रामायण घडलेच नसते. या पोलीस स्टेशनच्या संदर्भात जो वाद निर्माण झाला त्यासंदर्भात रझा अकादमीचे लोक मला भेटले असते तर हा वाद निर्माण झालाच नसता एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभागृहाची बैठक मी आता स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक 1.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 1.02 वाजता, 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

( राखून ठेवलेला ता.प्र.क्र. 18558 )

**सभापती** : बुधवार दिनांक 5 जुलै, 2006 रोजी तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 18558 राखून ठेवण्यात आला होता. हा प्रश्न प्रथम चर्चेला घेण्यात येईल.

**(ता.प्र.क्र. 18558- श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता )**

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18558...

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, नांदेड जिल्हयातील हदगांव तहसिलमध्ये संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी योजने अंतर्गत झालेल्या अपहारामध्ये एकूण आरोपी किती, त्यांची नांवे काय ?तसेच याठिकाणी आपण म्हटले आहे की, "गुन्हयातील राहिलेल्या आरोपींचा शोध घेऊन अट करणे, यामुळे गुन्हा प्रलंबित आहे." याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, अजून हा गुन्हा किती दिवस प्रलंबित राहणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या गुन्हयांमध्ये एकूण 41 आरोपी असून हा गुन्हा सन 1995-2005 या कालावधीमध्ये झालेला आहे. याठिकाणी आरोपींची नांवे भरपूर असून यातील काही आरोपींना पकडण्यात आले आहे. 15 आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच काही आरोपींनी कोर्टातून जामीन मिळालेला आहे, काही आरोपी मयत झालेले आहेत व दोन आरोपी फरारी आहेत. या गुन्हयाची व्याप्ती मोठी असून जवळपास 1 कोटी 32 लाख रुपयांचा अपहार इ ाालेला आहे. या गुन्हयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे यासंबंधीचा तपास आम्ही सी.आय.डी.कडे सोपवला आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, हा गुन्हा केव्हा निदर्शनास आला ? व या तपासाबाबत एवढा विलंब लागण्याची कारणे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, यासंबंधीची तक्रार सन 2005 मध्ये आली होती. या प्रकरणाचा तपास एक वर्षापासून चालू असून यामध्ये कोण कोण अडकले आहे, हे आता बाहेर येत आहे. अजून यामध्ये जास्त माहिती निष्पन्न होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आम्ही याचा तपास सी.आय.डी.कडे दिलेला आहे.

श्री.वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, दोन फरारी आरोपींची नांवे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.तुकाराम गणपत कदम, वय 54, नोकरी हदगांव व श्री.संजय देवांग, लिपीक, हदगांव, अशी दोन फरारी आरोपींची नांवे आहेत.

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदय, यामध्ये ज्या अधिकाऱ्यांवर दोष सिध्द झाले त्यांची नांवे काय ? तसेच त्यामध्ये कमिटीवर असणाऱ्या सदस्यांचा सहभाग होता काय ?

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18558...

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणाच्या बाबतीत कमिटीवरील चेअरमन किंवा सदस्य यांचा कुठल्याही प्रकारचा संबंध नाही. या प्रकरणाच्या बाबतीत ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे, त्यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत. श्री.सी.एच.डोखले, नायब तहसिलदार यांना अटक करुन निलंबित केले, कु.ए.बी.कोलगणे, नायब तहसिलदार यांना अटक करुन निलंबित केले, श्री.नागेश पाटील शेकापूरकर, लिपीक यांना अटक करुन निलंबित केले, श्री.एस.ए.पाटील, लिपीक यांना अटक करुन निलंबित केले, श्री.शेख वाजिद अली, शिपाई यांना अटक करुन निलंबित करण्यात आले आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ही प्रकरणे कमिटीपुढे मंजुरीसाठी न ठेवता ती अधिकाऱ्यांनी कशी मंजूर केली ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 100 लोकांचे प्रकरण मंजूर झाले असेल तर त्यामध्ये आणखी 50 लोकांची नांवे टाकून अपहार केलेला आहे.

------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हरकतीच्या मुद्यासंबंधी.**

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, याठिकाणी माझी हरकत अशी आहे की, दिनांक 4 जुलै,2006 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 17353 ज्यावेळी चर्चेला होता त्यावेळी आपण निर्देश दिले होते व माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, मंत्रिमंडळाच्या पुढील एक दोन बैठकीमध्ये याबाबत निर्णय घेऊ. यासंदर्भात आपले समाधान झाले नाही.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डायगव्हाणे.........

आणि म्हणून आपण असे निर्देश दिले होते की, हा प्रश्न या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त राखून ठेवतो. परंतु, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असूनही कार्यक्रमपत्रिकेत हा राखून ठेवलेला प्रश्न अंतर्भूत करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, या संदर्भात न्यायालयामध्ये प्रकरण गेले होते, त्या ठिकाणी न्याय मिळालेला आहे. पण असाच न्याय या सभागृहात मिळत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिलेला प्रश्न आजच्या कार्यक्रमपत्रिकेत समाविष्ट करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. मी या प्रश्नाच्या संदर्भात माझ्या दालनात एक बैठक आयोजित करतो जेणेकरुन या प्रश्नाला न्याय मिळू शकेल. ही बैठक 15 दिवसाच्या आत बोलाविली जाईल.

---

..2............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(तारांकित प्रश्न)**

**बापेरे झोरेवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याला डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत मान्यता देऊन सदर रस्ता पुर्ण करण्याबाबत**

**(१) * १७५४४ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बापेरे झोरेवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याला डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत मान्यता देऊन सदर रस्ता पुर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वने मंत्री यांना दिनांक ८ फेब्रुवारी, २००६ रोजी लेखीनिवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व सदर रस्ता किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) आमदाराच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यामुळे कार्यवाहीस विलंब झालेला नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, प्रश्नात उल्लेख केलेल्या कामाबाबत सद्य:स्थिती काय आहे ? सदर रस्ता कधीपर्यन्त पूर्ण होणार आहे ? या रस्त्याच्या कामासाठी एकूण किती रुपयांचे बजेट आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या रस्त्याचे अंदाजपत्रक ३ लाख ४१ हजार रुपयांचे असून सदर रस्ता १ किलोमीटर लांबीचा आहे. या रस्त्याच्या अंदाजपत्रकास दिनांक ३०/३/२००६ रोजी मंजूरी देण्यात आलेली असून २ लाख २ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. हे काम जिल्हा परिषदेमार्फत होणार असून लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत. पावसाळा संपल्यानंतर या कामास सुरुवात करण्यात येईल.

---------------

..३.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील पोलिसांना देशातील इतर पोलिसांपेक्षा जास्त पगारवाढ देण्याचे बाबत**

**(२) * १८४१८ श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. सदाशिवराव पोळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीसांना देशातील इतर पोलीसांपेक्षा सर्वात जास्त पगारवाढ देण्याचे आश्वासन दिनांक १ मे, २००६ रोजी मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत राज्य शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१), (२) व (३) होय. राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सद्या देण्यात आलेली वेतनश्रेणी व महसूल विभागातील कर्मचारी व अधिकारी यांना देण्यात आलेली वेतनश्रेणी यांच्यातील तुलनात्मक तफावतीचा आढावा घेण्यात येत असून आढाव्याअंती आवश्यक निर्णय घेतला जाईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे मान्य केले आहे की, पोलीस कर्मचा-यांना अन्य कर्मचा-यांपेक्षा जास्त वेतन देण्याचा निर्णय शासन घेणार आहे, असे जाहीर वक्तव्य दिनांक १ मे २००६ रोजी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी केले होते. या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, महसूल विभागातील कर्मचारी/अधिकारी यांना देण्यात आलेली वेतनश्रेणी आणि पोलीस विभागातील कर्मचारी/अधिकारी यांची वेतनश्रेणी यांचा तौलनिक आढावा घेण्यात येत आहे. माझा प्रश्न असा आहे की, असा आढावा घेण्यात आलेला आहे काय ? काही पोलीस भ्रष्टाचारी असले तरी एकूणच पोलीस कर्मचा-यांची वेतनश्रेणी कमी आहे. तसेच, या कर्मचा-यांना गमबूट नाहीत, रेनकोट नाहीत अशाही तक्रारी वेळोवेळी येत असतात. या पार्श्वभूमीवर पोलीस कर्मचा-यांना अन्य विभागातील कर्मचा-यांपेक्षा अधिक वेतन देण्याचा जो निर्णय सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केला आहे त्याबाबत मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय ? मंत्रीमंडळाने या प्रस्तावास मंजूरी दिली आहे काय ? या निर्णयाची अंमलबजावणी केंव्हा पासून सुरु होईल ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपल्या राज्यातील पोलिसांची वेतनश्रेणी आणि देशातील इतर राज्यातील पोलिसांची वेतनश्रेणी याचा अभ्यास करण्यात आला असून काही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.१८४१८ पुढे सुरु.........</u>**

राज्यातील वेतनश्रेणी आपल्या राज्यातील वेतनश्रेणीपेक्षा जास्त आहे तर काही राज्यांशी तुलना करता ती कमी आहे. या सर्व बाबींचा अभ्यास करुन महाराष्ट्रातील पोलिसांना कोणती वेतनश्रेणी देता येईल, याचा विचार केला जाईल व हे काम लवकरच पूर्ण होईल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय ने बताया कि हमारे राज्य के पुलिस कर्मचारियों का पगार देश के बाकी पुलिस वालों से ज्यादा हो इसलिए वह उनसे तुलनात्मक अभ्यास कर रहे हैं लेकिन मुझे पूछना है कि ऐसा करने के लिए महसूल विभाग से तुलनात्मक अभ्यास करने की क्या जरुरत है ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महसूल कर्मचा-यांमध्ये तलाठी, ग्रामसेवक यांचे जे पगार आहेत त्यांच्या समकक्ष पोलिसांचे पगार असावेत तसेच इतर राज्यातील पोलिसांपेक्षा कमी असू नयेत यादृष्टीने हा अभ्यास केला जात आहे.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.18418 .........**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, घोषणा करणा-यांचे मला आश्चर्य वाटते. आपल्या राज्यातील पोलिसांना किती पगार मिळतो आणि इतर राज्यातील पोलिसांना किती पगार मिळतो याची माहिती न घेता, आम्ही पोलिसांना इतर राज्यांपेक्षा जास्त पगार देऊ अशा प्रकारचे प्रलोभन माननीय गृहमंत्र्यांनी पोलिसांना दाखवावयाचे आणि प्रत्यक्ष कृती मात्र करावयाची नाही हा काय प्रकार आहे ? यासंदर्भात किती दिवसामध्ये अभ्यास पूर्ण होईल ? माननीय गृहमंत्र्यांनी पोलिसांना दिलेले आश्वासन आपण किती दिवसात पूर्ण करणार आहात ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चर्चा करुन शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, पोलिसांना ज्या सुविधा पुरविल्या जातात त्यातील बूट हा महत्वाचा भाग आहे. चर्मोद्योग विकास महामंडळाकडून आपण पोलिसांसाठी बूट खरेदी करीत होतो. चांगल्या प्रतीचे बूट चर्मोद्योग विकास महामंडळाकडून पुरविले जात होते. आता प्रायव्हेट संस्थेकडून बूटांची खरेदी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय ? आणि त्याचे कारण काय आहे ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे. यासंदर्भातील माहिती घेऊन ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पोलिसांच्या वेतनाची चिंता करीत असतांना माननीय गृहमंत्री महोदयांनी खालच्या सभागृहामध्ये आणि वृत्तपत्रांना अशी माहिती दिली की, पोलिसांच्या युनिफॉर्मसाठी लोकांकडे भीक मागावी लागते. पोलिसांना गमबूट मिळत नाहीत, असे त्यांनी सांगितले. आता पर्यंत पोलिसांकरिता कोणाकडून रेनकोट, गमबूट मिळविण्यात आले आणि त्याचा पोलिसांना किती फायदा झाला ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे.

**सभापती** : जसा पगार महत्वाचा आहे, तशा त्यांना उपलब्ध होणा-या सुविधा सुध्दा महत्वाच्या आहेत. मंत्री महोदयांनी या दोन्ही सूचनांची गांभीर्याने नोंद घ्यावी.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.**18418 .........

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पोलिसांना गमबूट आणि रेनकोट पुरविण्यासाठी कोणाची तरी स्पॉन्सरशिप मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, हा प्रश्न पोलिसांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. पोलिसांना 12 ते 14 तास काम करावे लागते. पोलिसांना एवढे काम करुन सुध्दा वेळेवर पगार मिळत नाही. पोलिसांना जास्त वेळ काम करावे लागत असल्यामुळे काही पोलीस वाईट मार्गाला लागतात. इतर राज्यातील पोलिसांच्या पगारापेक्षा आपल्या राज्यातील पोलिसांचे पगार वाढूवन दिले जातील, अशी माननीय गृहमंत्र्यांनी घोषणा केलेली आहे, यासंदर्भात माननीय राज्यमंत्री काही सांगू शकतील काय ? इतर राज्यातील पोलिसांच्या पगाराचा आणि आपल्या राज्यातील पोलिसांच्या पगाराचा आढावा किती दिवसामध्ये घेतला जाईल ? आपण ही आनंदाची बातमी पोलिसांना किती दिवसात देणार आहात ?

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18418......

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, याबाबत जितक्या लवकर शक्य होईल तितक्या लवकर निर्णय घेण्यात येईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, पोलिसांचे पगार वाढविण्याची घोषणा आपण केलेली आहे. परंतु पोलिसांच्याच दर्जाच्या त्या त्या कॅटेगरीतील इतर जी पदे आहेत, उदा. एक्साईज इन्स्पेक्टर वगैरे. त्यांच्याबाबतीत, पोलिसांचे पगार वाढविले तर बाकी विभागातील अशा कर्मचाऱ्यांचे पगार देखील तशाच पद्धतीने आपल्याला वाढवावे लागतील याची आपल्याला कल्पना आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, इतर खात्यातील समकक्ष कर्मचाऱ्यांच्या पगारांमध्ये समन्वय राखण्यासाठीच याबाबतीत जो अहवाल येईल त्यानंतरच निर्णय घेण्यात येईल.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझ्याकडे 2 मे 2006 रोजीच्या 'दैनिक सकाळ' या वृत्तपत्रातील एका बातमीचे कात्रण आहे. त्यामध्ये मंत्री महोदयांनी म्हटलेले आहे की, दिवाळीपूर्वी पोलिसांना अधिक पगार. तेव्हा दिवाळीपूर्वी हा अधिक पगार पोलिसांना देण्याचा निर्णय आपण घेणार आहात का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दिवाळीपूर्वी हा निर्णय घेण्यात येईल.

****

....... पीपी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई उपनगरातील बीयर बार, पब व डिस्कोथेक यांना दिलेल्या मनोरंजनाच्या परवान्याबाबत**

**(3) * 17596 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई उपनगरात सुरु असलेल्या बीयर बार, पब व डिस्कोथेक यांना देण्यात आलेल्या मनोरंजनाच्या परवान्याबद्दल व मनोरंजनकराबद्दल माहिती मिळविण्यासाठी विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडून दिनाक 1 मार्च, 2006 व दिनांक 20 एप्रिल, 2006 रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना निवेदने दिली होती, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी कोणत्या स्वरुपात कारवाई करण्यात आली आहे,
(3) कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिद्धाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय.
(2) दिनांक 31.03.2006 व दिनांक 20.04.2006 रोजी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मनोरंजन कराराबाबतची माहिती देऊन बीअरबार, पब व डिस्कोथेक यांना मनोरंजनाचा परवाना संबंधीची माहिती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडून उपलब्ध होऊ शकेल असे दिनांक 09.06.2006 च्या पत्रान्वये अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांना कळविले आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी देण्यात आलेले हे उत्तरच आक्षेपार्ह आहे. मी ही जी माहिती मागितली आहे ती उगाचच मागितली नाही. मी त्यासाठी रितसर पत्र दिले आहे. आपण बीअर बार, पब, डिस्कोथेक यांना परवाने देतो आणि त्यांच्याकडून आपण मनोरंजन कर घेत असतो. तर अशांकडून आपल्याला किती कर मिळतो वगैरे माहिती आम्हाला पाहिजे होती. तसेच त्यामध्ये अनधिकृतपणे चालणारे किती बार, पब्स आहेत याचीही माहिती विचारली होती. परंतु आम्हाला सांगण्यात आले की, ही माहिती तुम्ही पोलिसांकडून घ्या. आता हा कर वसुलीचा विषय आहे. बीअर बार, पब्स, डिस्कोथेक इत्यादींना परवानगी कलेक्टरांच्या सहीने दिली जाते. परंतु असे असतानाही अशा पद्धतीने कलेक्टर आम्हाला सुचविणार असतील तर ते कठीणच आहे. आम्ही यामध्ये त्यांना अशी माहिती विचारली होती की, गेल्या तीन वर्षामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी किती मनोरंजन करापोटी वसुली केली आहे ? पण त्याचे उत्तर देण्याबाबत त्यांचेकडून टाळाटाळ करण्यात आली. नेमके उत्तर आम्हाला आलेले नाही आणि आता येथेही आलेले नाही. खरे म्हणजे आज या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे अन्यथा हा प्रश्न

...... पीपी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 17596...

राखून ठेवण्याची मागणी करण्यासारखे हे उत्तर आहे. आम्ही 31 मार्चला पत्र दिलेले होते. आणि हा प्रश्न त्यानंतर पण अधिवेशनापूर्वी 45 दिवस अगोदर दिलेला आहे. आता जुलै महिन्याचा शेवटचा आठवडा आहे. असे असताना अशा पध्दतीने शासकीय अधिकाऱ्यांकडून उत्तरे येणे सोयीचे नाही.

**सभापती** : या ठिकाणी कॅबिनेट मंत्री म्हणून सन्माननीय वन मंत्री उपस्थित आहेत. तेव्हा मी त्यांच्या ही बाब लक्षात आणून देऊ इच्छितो की, अशा पद्धतीने कोणत्याही लोकप्रतिनिधींना उत्तरे देणे बरोबर नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या पत्रावर उत्तर दिले आहे की, आवश्यक असेल तर ती माहिती तुम्ही पोलिसांकडून घ्यावी. एवढ्या जबाबदार अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे लोकप्रतिनिधींना उत्तर देणे केव्हाही बरोबर नाही. ही आक्षेपार्ह पद्धत आहे. त्याची शासनाने नोंद घेण्याच्या दृष्टीने आपण महसूल विभागाला ही बाब कळवावी. तसे पाहिले तर हा प्रश्न गृह विभागाचा होऊ शकत नाही. मी हा प्रश्न रोखून ठेवतो आणि पुढील अधिवेशनामध्ये तो घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला या निमित्ताने आपणास एक विनंती करावयाची आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांना अशा प्रकारे उत्तर एका सनदी अधिकाऱ्यांनी पाठविणे हे प्रथा आणि परंपरेला धरून नाही. त्यामुळे असे उत्तर देणारे जे कोणी अधिकारी असतील त्यांना समज देण्याची गरज आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, काळ सोकावण्याची भीती जास्त. अशा प्रकारे उत्तर देण्यातून माननीय विरोधी पक्षनेत्यांचा अपमानच झालेला आहे.

**सभापती** : सन्माननीय वन मंत्री यांनी याची देखील नोंद घ्यावी आणि संबंधितांना तसे कळविण्यात यावे.

श्री. बबनराव पाचपुते : ठीक आहे.

****

...... पीपी 4 ...

**मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या चौक (जि.रायगड) गावाजवळील धावरी नदीवरील पुलाचे बांधकामाबाबत**

**(4) * 18899 श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावरील चौक गावाजवळील धावरी नदीवरील पुल बांधण्याचे काम बी.ओ.टी. पध्दतीने बांधकाम करण्यास एका खाजगी संस्थेस माहे ऑगस्ट, 2004 पासून हस्तांतरीत करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या पुलाचे बांधकामामुळे त्या ठिकाणी एकेरी वाहतूक ठेवल्यामुळे वाहतूकीची कोंडी निर्माण होवून सर्वसामान्य जनतेला त्याचा त्रास होत आहे हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या पुलाचे बांधकाम मुदतीत न होण्यास कोणती कारणे आहेत
(4) या पुलाचे बांधकाम पुर्ण होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री.अनिल देशमुख** : (1) होय.
(2) होय.
(3) काम मुदतीत पूर्ण होत असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) पुलाच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक 9.8.2004 रोजी दिला आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी 24 महिने असून काम दिनांक 8.8.2006 पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. पूलाचे बांधकाम मुदतीत पूर्ण होईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी धावरी नदीवर जो जुना पूल होता त्यावर एकेरी वाहतूक करण्याची काय गरज होती ? आपण तेथे नवीन पूल बांधत आहात असे असताना जुन्या पुलावर दुहेरी वाहतूक होत होती त्याऐवजी आता आपण तेथे एकेरी वाहतूक सुरू करण्याचे कारण काय ? तसेच या नवीन पुलाच्या बांधकामासाठी दोन वर्षांचा कालावधी दिलेला आहे आणि तो कालावधी 18 दिवसात संपणार आहे. तेवढ्या 18 दिवसात हे काम पूर्ण होणार आहे काय ? कारण मी त्या कामावर स्वत: जाऊन आलो आहे. तसेच महिन्यामध्ये एक दोन वेळा तरी तेथून मी जात-येत असतो. अजून 18 महिने लागतील इतके काम तेथे बाकी आहे अशी माझी माहिती आहे असे असताना ते काम 18 दिवसात पूर्ण होणार आहे काय ? नसल्यास संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई आपण करणार आहात का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, धावरी नदीवरील पूलाचे काम 8 ऑगस्ट पर्यंत पूर्ण करावयाचे आहे आणि येत्या 18 दिवसात ते काम पूर्ण होणार आहे. हा संपूर्ण रस्ता 24

..... पीपी 5 ...

श्री.अनिल देशमुख (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 18899 .....

महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे आपण ठरविले आहे, त्यातील हा शेवटचा पूल बाकी आहे व 15 ऑगस्टच्या दरम्यान पुणे-मुंबईचा एनएच 4 नावाने ओळखला जाणारा हा जो रस्ता आहे तो रहदारीसाठी आपण सुरू करणार आहोत.

( यानंतर श्री. सरफरे .... क्यूक्यू 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18899..

श्री. अनिल देशमुख...

सभापती महोदय, माननीय सदस्यांना पूलाच्या उदघाटन समारंभाकरिता बोलाविण्यात येईल. दोन वर्षाच्या कालावधीमध्ये 283 कोटींचे काम पूर्ण करण्यात येणार असल्यामुळे आणि निश्चित कालावधीमध्ये काम पूर्ण होत असल्यामुळे कामासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**झोपडपट्टी मुक्त फूटपाथ आणि वेगवान वाहतुकीसाठी मुंबई शहरात येत्या दीड वर्षात सहा नवे उड्डाणपूल होणार असल्याबाबत**

**(५) * १७७९४ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी मुक्त फूटपाथ आणि वेगवान वाहतुकीसाठी मुंबई शहरात येत्या दीड वर्षात सहा नवे उड्डाणपूल होणार असल्याची माहिती मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक १३ मे, वा त्यासुमारास जाहिर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित नवे सहा उड्डाण पूलांच्या बांधकामाचा शुभारंभ कधी करण्यात येणार आहे,

(३) या पूलांच्या बांधकामाची कंत्राटे कोणत्या कंपनीला देण्यात आली आहेत ?

**श्री. अनिल देशमुख** : (१) होय.

(२) मुंबई शहरात खालीलप्रमाणे सहा उड्डाण पुल प्रस्तावित आहेत.

१) सायन जंक्शन २) सायन इस्पितळ ३) किंग्ज सर्कल ४) भारतमाता सिनेमा ५) हिंदमाता सिनेमा व ६) लालबाग सायन जक्शन येथील उड्डाणपूल बांधणेच्या कामाच्या निविदा बोलविण्यात आल्या आहेत. उर्वरित पाच उड्डाणपुलाच्या कामाचे संकल्प चित्र तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मुंबईतील रस्ते वाहतूक सुरळीत व वेगवान व्हावी यासाठी फूटपाथ झोपडपट्टी मुक्त करण्याकरिता तसेच यापुढे फूटपाथवर झोपडपट्टी उभी राहू नये यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे?

श्री. अनिल देशमुख : फूटपाथवर झोपडपट्टी उभी राहू नये यासाठी नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. मुंबईत अनेक ठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामे चालू आहेत. त्याचप्रमाणे शहरामध्ये ९२५ कोटी रुपयांची २२ फ्लायओव्हरची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामध्ये वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, मुंबई पूर्व उपनगर व पश्चिम उपनगरामध्ये कामे हाती घेतली आहेत. मुंबईमध्ये जी वाहतुकीची कोंडी होते ती या कामांमुळे कमी होण्यास मदत होईल. आणि आपण उपस्थित केलेले प्रश्न यामधून सुटतील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, हे सर्व उड्डाण पूल बांधल्यानंतर मुंबईतील सर्व रस्ते,फूटपाथमुक्त व झोपडपट्टी मुक्त कसे होणार आहेत? उर्वरित पाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**१७७९४....**

श्री. मधुकर चव्हाण...

उड्डाण पूलाच्या कामाचे संकल्प चित्र तयार करण्यासंबंधी आपण निश्चित कालमर्यादा घातली आहे काय? आणि त्यासाठी बजेटरी प्रोव्हिजन केली आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, कोणत्याही रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येते त्यावेळी मोठया प्रमाणामध्ये उड्डाण पूल बांधण्यात येतात. त्यामुळे वहातुकीचा प्रश्न काही प्रमाणात सुटतो. मुंबईमध्ये रस्ता रुंदीकरणाची, उड्डाण पूलाची आणि रेल्वेच्या पूलाची बरीच कामे हाती घेण्यात आली आहेत. एकूण २२ उड्डाण पूलाची कामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी ९२५ कोटींची कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी २२ उड्डाण पूलाच्या बांधकामासंबंधीचे उत्तर दिले.परंतु छापील उत्तरामध्ये फक्त ६ उड्डाण पूलाचे संकल्पचित्र तयार करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. तेव्हा यासंबंधी वस्तुस्थिती काय आहे? त्याचप्रमाणे फूटपाथ झोपडपट्टी मुक्त केल्यानंतर तेथील झोपडपट्टया उठणार आहेत. त्याठिकाणी असलेल्या रहिवाश्यांच्या पुनर्वसनाची तरतूद केली आहे काय? आपल्याला फूटपाथ झोपडपट्टी मुक्त करावयाची असेल तर तेथील झ ोपडीधारकांचे पुनर्वसन कोणत्या ठिकाणी आणि केव्हा करण्यात येणार आहे?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी मुंबईमधील सहा उड्डाण पूलाचे संकल्प चित्र तयार करण्याचे काम चालू आहे. त्याव्यतिरिक्त पश्चिम व पूर्व उपगरामध्ये उड्डाण पूल बांधण्यात येणार आहेत. त्यामुळे याठिकाणी फक्त मुंबईमध्ये बांधण्यात येणाऱ्या उड्डाण पूलाची माहिती दिली आहे. एकूण उड्डाण पूल बांधण्याकरिता ९२५ कोटी रुपये खर्च येणार आहे. फूटपाथवरील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाबाबत शासनाच्या नियमानुसार कारवाई होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बांद्रा (पूर्व) येथील खेरवाडी जंक्शनवर उत्तर - दक्षिण किंवा दक्षिण-उत्तर असा एक उड्डाण पूल होणार आहे. त्याकरिता रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील झाडे कापून काढली आहेत. दोन्ही बाजूला रुंद नाले होते, ते अरुंद करण्यात आले आहेत.त्यामुळे त्या भागामध्ये नेहमी पाणी भरते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17794 (पुढे सुरु....

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

एमएमआरडीअेचे लोक आणि रस्ते विकास महामंडळाचे लोक याकडे लक्षच देत नाहीत. दोन्ही बाजूचे सेवा मार्ग आहेत, त्या ठिकाणी खड्डे करुन ठेवलेले आहेत. ही गोष्ट कोणाच्या लक्षात येत नाही. याचा परिणाम म्हणून वर्षभरामध्ये उपद्रव आणि त्रास निर्माण झालेला आहे. या संबंधातील माहिती या लेखी उत्तरामध्ये दिलेली नाही. हा काय प्रकार आहे ? समजत नाही. मुंबईचे सगळे फूटपाथ झोपडपट्टीमुक्त कधी करणार आहात ?

श्री.अनिल देशमुख : पूर्व द्रुतगती मार्ग आणि पश्चिम द्रूतगती मार्गाचा प्रश्न उपस्थित केला. तसेच सन्माननीय सदस्यांनी सेवा मार्गाची तक्रार केली. सेवा मार्ग खराब झालेला असेल तर लगेच दुरुस्ती करण्यात येईल. वाहतुकीला कोणत्याही प्रकारची अडचण होऊ नये, याची दक्षता घेतली जाईल.

श्री.संजय केळकर : सहा उड्डाण पूल आहेत. त्यापैकी एकेरी वाहतूक असलेले किती आहेत आणि दुहेरी वाहूक असलेले किती आहेत ?

श्री.अनिल देशमुख : सहा उड्डाण पूल आहेत, त्यापैकी एकेरी वाहतूक असलेले कोणते आणि दुहेरी वाहतूक असलेले कोणते, याबाबतची माहिती पटलावर ठेवतो.

श्री.जयंत प्र.पाटील : मुंबईमध्ये उड्डाण पूल आहेत, त्याच्या खाली झोपडपट्ट्या झालेल्या आहेत. त्या काढून टाकण्याबाबतची कारवाई करणार आहात काय ?

श्री.अनिल देशमुख : त्या झोपड्या काढून टाकण्यात येतील. काही पूल एमएसआरडीसीने, काही पूल बांधकाम विभागाने आणि काही उड्डाण पूल मुंबई महानगरपालिकेने बांधलेले आहेत. पुलाच्या खाली प्लॅन्टेशन करुन सुशोभीकरणाला सुरुवात केलेली आहे. त्याच्या खाली झोपड्या असतील तर त्या काढून टाकण्यात येतील. सेवन लव्ह उड्डाण पूल, कॉपर चिमणीसमोरील उड्डाण पूल या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते, त्या ठिकाणी पे ॲन्ड पार्क या धर्तीवर पार्किंगची व्यवस्था कशी करता येईल ? या दृष्टीने प्रयत्न करत आहोत.

श्री.कपिल पाटील : या उड्डाण पुलाच्या खालची जागा विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेसाठी आणि नागरी सुविधांसाठी उपलब्ध करुन देणार आहात काय ? उड्डाण पुलाच्या बाजूला सब वे निर्माण केलेले नाहीत, त्याबाबत विचार करणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ D/

ता.प्र.क्र.17794 (पुढे सुरु...

श्री.अनिल देशमुख : नागरी सुविधांसाठी ही जागा देणे योग्य होणार नाही. वाहतुकीची कोंडी लक्षात घेऊन पे ॲन्ड पार्कची व्यवस्था करणार आहोत.

श्रीमती कांता नलावडे : फुटपाथवरील झोपड्या उठविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करणार आहात ? घाटकोपर ते मुलुंड येथील उड्डाण पुलाखाली बेकायदेशीर अनैतिक व्यवसाय चालू आहेत. ते बंद करुन त्या ठिकाणी सुशोभिकरण लवकरात लवकर करणार आहात काय ? पश्चिम द्रुतगती मार्गावर सुशोभिकरणाचे काम ताबडतोब सुरु करणार आहात काय ? तिसरा प्रश्न असा आहे की,पुलाच्या बांधकामाचे कंत्राट कोणाला दिलेले आहे, याचे उत्तर देण्यात आलेले नाही. परंतु बांधकामाचे कंत्राट कोणाला तरी दिले असेल, ते कोणाला दिलेले आहे ?

श्री.अनिल देशमुख : पहिल्यांदा पश्चिम द्रुतगती मार्गावरील सुशोभीकरणाचे काम हाती घेतलेले आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17794 ...... श्री. अनिल देशमुख .....

आपल्याला वर्षाभरामध्ये मुंबईतील जे एम.एस.आर.डी.सी. आणि सार्वजनिक बांधकाम खात्याचे उड्डाण पूल आहेत त्यांचे सौंदर्यीकरण झालेले दिसेल. आम्ही मुंबई महानगरपालिकेला सुध्दा सूचना दिलेल्या आहेत की, त्यांच्याकडील जे उड्डाण पूल आहेत त्यांचे सौदर्यीकरण करावे जेणेकरुन मुंबईतील उड्डाण पूल चांगले दिसतील. दिल्ली, हैद्राबाद, मद्रास या ठिकाणी अतिशय चांगल्या पध्दतीने उड्डाण पुलांचे सौंदर्यीकरण केलेले आहे. त्याच पध्दतीने मुंबई शहरातील उड्डाण पुलांचे सौंदर्यीकरण करणार आहोत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, इंग्रजांनी ज्यावेळी 100 वर्षापूर्वी व्ही.टी. स्टेशन बांधले त्यावेळी त्या ठिकाणी रेल्वेने येणाऱ्या प्रवाशांची संख्या 10 हजार होती. आता 100 वर्षानंतर त्या ठिकाणी रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या जवळजवळ 30 लाख झालेली आहे. इस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर सायन आणि धारावी क्रॉस करणारा उड्डाण पूल बांधला. त्या पुलावरुन एकतर्फी वाहतूक होईल अशी व्यवस्था केली. त्या ठिकाणी सायनवरुन घाटकोपर, चेंबूर भागामध्ये वाहने जातात. आज त्या ठिकाणी पूल बांधून सुध्दा वाहनांची फार गर्दी होते. त्यामुळे सकाळी 8.00 ते रात्री 8.00 या कालावधीत घाटकोपर, चेंबूरकडे येणारे ट्रॅफिक त्या पुलावरुन येते. त्या ठिकाणी ट्रॅफिक फार वाढलेले आहे. त्या ठिकाणी दुसरा पूल वाढवावयाचा असेल तर तो शासन वाढविणार काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या पुलाच्या ठिकाणी वन वे आहे. त्या ठिकाणी टू वे चा सुध्दा शासन विचार करील.

डॉ. दीपक सावंत : आपण अनेक पूल बांधलेले आहेत परंतु त्या ठिकाणी जे चौक तयार झालेले आहेत ते सुधारण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते. पुलावरुन खाली उतरल्यावर जो बॉटल नेक असतो त्या ठिकाणी वाहतूक हळूहळू जाते. ते चौक सुधारण्याचे आश्वासन गेल्या अधिवेशनामध्ये दिले होते. त्याबाबत शासन विचार करणार काय ? दुसरा प्रश्न असा की, मिलन सबवेच्या ठिकाणी पूल बांधणार काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MHM/

ता. प्र. क्र. 17794 ......

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, उड्डाण पूल बांधल्यानंतर काही ठिकाणी लहान चौक तयार होतात. त्या ठिकाणी नवीन पध्दतीने चौक कसे करता येतील यादृष्टीने शासन विचार करीत आहे. मिलन सबवेच्या बाबतीत तक्रार आहे. त्या ठिकाणी त्रास होत असतो. ते काम आमच्या खात्याकडे नाही. परंतु शासनाच्या माध्यमातून तो प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी रेल्वे ओव्हर ब्रिज घेता येईल काय याचा विचार चालू आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई हायकोर्टामध्ये बांद्रा-वरळी सागरी मार्गाच्या बाबतीत एक जनहित याचिका दाखल झाली होती आणि त्या कामाचा खर्च 450 कोटीवरुन 1300 कोटीपर्यंत का वाढला ? याचे डिटेल्स कोर्टाने सादर करण्यास सांगितले होते. हायकोर्टात आपण याबाबतचे डिटेल्स सादर करणार असाल तर ती माहिती सभागृहाला देणार काय ? कारण याबाबत चौकशी करावी अशी मागणी करण्यात आली होती. ती मागणी आपण नाकारली.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, बांद्रा-वरळी सागरी पुलाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना कल्पना आहे. त्या पुलाचे बांधकाम अतिशय जोरात चालू आहे. परंतु वरळीमधील काही लोक मधल्या काळामध्ये हायकोर्टात गेले होते. ॲड. वाय.पी.सिंग आणि अन्य लोकांनी जनहित याचिका दाखल केली होती. आठ दिवसांपूर्वी त्या याचिकेचा निकाल लागलेला आहे. त्यामध्ये हायकोर्टाने शासनाची बाजू उचलून धरली. त्यांनी सांगितले की, बांद्रा वरळी आणि वरळी नरीमन पॉईंट या ठिकाणी जी वाहतुकीची कोंडी होते ती दूर करण्यासाठी हा मार्ग महत्वाचा आहे. त्यामुळे काही मंडळी यामध्ये अडथळा आणत असतील तर ते योग्य नाही. कोर्टाने शासनाच्या हिताच्या दृष्टीने निर्णय दिलेला आहे. त्या ठिकाणी वरळी रेसिडेन्ट्स असोसिएशन आहे. त्यांची याचिका खारीज करण्यात आली. कोर्टाने अतिशय चांगल्या पध्दतीने शासनाची बाजू उचलून धरलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, काही ठिकाणी पूल न बांधता देखील वाहतुकीची कोंडी दूर होऊ शकते. माहीम येथे पंधरा वीस मिनिटे का अडकून पडावे लागते, याचा अभ्यास करुन चौक व रस्ते रुंद केले तर मोठा रिलीफ मिळू शकतो. दोन चार उड्डाण पूल बांधणार. त्यापेक्षा जंक्शन इम्प्रूव्ह केले तर जास्त रिलीफ मिळू शकतो.

यानंतर श्री. शिगम ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.17794... (श्री. नितीन गडकरी ..)

नागपूर मधील ट्राफिकच्या संदर्भात दिल्लीच्या सेंट्रल रोड रिसर्च ऑर्गनायझेशनकडून नागपूर मधील जंक्शन मोठे करण्यात आले. त्याप्रमाणे मुंबईतील माहीम सारखी जंक्शन मोठी केली तर वाहतुकीच्या कोंडीचा प्रश्न सुटू शकेल. तेव्हा मुंबईतील जंक्शन, चौक यांचा एमएसआरडीसीकडून अभ्यास करुन ते मोठे करण्यात येतील काय ? रस्त्यावर पडलेल्या खंड्यांमुळे देखील वाहतुकीची कोंडी होते. चांगल्या क्वालिटीचे रस्ते बांधले तर 10 वर्षे काही अडचणी निर्माण होणार नाहीत. तेव्हा एमएसआरडीसी रस्त्यांच्या क्वॉलिटीचे नॉर्म्स् ठरवून त्यांचे स्टॅण्डरडायझेशन करणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : माहीम जंक्शन येथे वाहतुकीची कोंडी होते, ती होऊ नये यासाठी बान्द्रा-वरळी सागरी मार्ग हाती घेतलेला आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे माहीम सारखी जंक्शन एमएसआरडीसी इम्प्रूव्ह करील. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर डांबरी रस्ते बांधलेले आहेत. पावसाळयामध्ये डांबरी रस्त्यावर खड्डे पडतात. तेव्हा ज्याचे लाईफ 30-35 वर्षे असू शकेल असे सिमेंट कॉन्क्रीटचे रस्ते कसे मोठ्या प्रमाणावर बांधता येतील तसेच डांबरी रस्ते बांधायचे झाले तर कोणते क्वॉलिटी नॉर्म्स असले पाहिजेत याबाबतीत अभ्यास चालू आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## जळगांव शहरात विमानतळ घोटाळा प्रकरणातील दोषी व्यक्तींच्या चौकशीबाबत

**(६) * १९८३७ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. नितीन गडकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरात विमानतळ घोटाळा प्रकरणी दोषी असलेल्या वीस व्यक्तींविरुध्द भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष हेमचंद्र खाडे यांनी दिनांक १० मार्च, २००६ रोजी शहर पोलिस स्टेशन जळगांव येथे फिर्याद दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) श्री.हेमचंद्र जगन्नाथ काळे, यांनी दि.१० मार्च, २००६ रोजी विमानतळ विकास योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत तक्रार अर्ज जळगांव शहर पोलीस ठाणे येथे दिला आहे.

(२) व (३) प्राथमिक चौकशी केली असता असे निष्पन्न झाले आहे की, जळगांव नगर पालिका व महानगरपालिका यांनी राबविलेल्या योजना व त्यामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्यासाठी श्री.सुधाकर जोशी (निवृत्त आय.ए.एस.) यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय उच्च अधिकार समिती नेमण्यात आली होती. या अनुषंगाने उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकउे दाखल जनहित याचिकेवर निर्णय देताना खंडपीठाने समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यापूर्वी संबंधीतांचे म्हणणे ऐकून घ्यावे असा निर्णय दिला आहे. तसेच हेमचंद्र काळे यांनी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायायल, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल केली असून हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाच्या निर्णयानंतर अनुरुप कारवाई करण्याचे प्रस्तावीत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हे प्रकरण हायकोर्टामध्ये नाही. हायकोर्टाने, महापालिकेने कारवाई करावी असा निर्णय दिलेला आहे. तत्कालीन महापालिका आयुक्त डॉ. गेडाम यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली होती. त्यासंबंधात कारवाई करण्यास राज्यमंत्र्यांनी स्टे दिला. म्हणून श्री. काळे हे हायकोर्टात गेले. हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. असे असताना हे मॅटर सब्ज्युडिस आहे असे कसे म्हणता येईल ? शासनाने या प्रकरणामध्ये स्टे देऊन भ्रष्टाचार करणा-या लोकांना संरक्षण दिलेले आहे. तेव्हा या उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी दुरुस्ती करावी, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हे मॅटर न्यायालयामध्ये होते. संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी असा न्यायालयाने निर्णय दिला...

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 19837...

श्री. नितीन गडकरी : या प्रकरणी नगरविकास विभागाने स्टे दिलेला आहे. आयुक्त डॉ. गेडाम यांनी संबंधिताविरुध्द कारवाई करण्यासंबंधी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर संबंधिताविरुध्द कारवाई करण्यास स्टे देण्यात आला. म्हणून जे कोणी दोषी आहेत त्यांना अटक करुन त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. तसे केले आहे काय ?

श्री. राजेश टोपे : कारवाईला कोणत्याही राज्यमंत्र्यांनी स्थगिती दिलेली नाही. ज्यामध्ये स्टे दिलेला आहे तो विषय वेगळा आहे. पोलीस स्टेशनच्या कारवाईला नगरविकास विभागाने स्थगिती दिलेली नाही.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MHM/ MAP/ D/ पूर्वी श्री.शिगम 14:00

ता.प्र.क्र.19837.......

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. मंत्रीमहोदयांकडून आम्हाला संरक्षण मिळणार नाही. 2004 साली औरंगाबाद हायकोर्टाने यांच्यावर कारवाई करण्यासंबंधी आदेश दिले. त्याची अंमलबजावणी झाली नाही म्हणून श्री.काळे यांनी या संदर्भात हायकोर्टात पीआयएल दाखल केली. त्यानंतर हायकोर्टाने पुन्हा नोटीस काढल्यानंतर डॉ.गेडाम, आयुक्त,जळगाव महानगरपालिका यांनी जळगाव पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली. 2004चा निर्णय आणि त्यानुसार तक्रार केल्यानंतर राज्य सरकारकडे त्याचे उत्तर नाही. या तक्रारीसंबंधी इतक्या दिवसात शासनाने काय कारवाई केली? केस रजिस्टर्ड केली का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चौकशी अहवाल जो आला होता त्याविरुध्द औरंगाबाद हायकोर्टात रिट याचिका दाखल झाली असता हायकोर्टाच्या खंडपीठाने 2005 साली निर्णय दिला. जोशी समितीचा अहवाल स्वीकारावयाचा असल्यास या अहवालात ठपका ठेवलेल्या संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारची कारवाई करु नये. म्हणून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी शासनाने श्री.सुनील सोनी, आयुक्त व संचालक, नगरपालिका प्रशासन यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी दिनांक 18 जून व 25 जुलै, 2006 या सुनावणीसाठी तारखा निश्चित केल्या आहेत. दि.18 जून,2006 रोजी काही लोकांचे म्हणणे ऐकून घेतले असून उर्वरित लोकांचे म्हणणे दि.25 जुलै,2006 रोजी ऐकून घेऊन नंतर पुढील कार्यवाही होणार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हायकोर्टाने म्हणणे ऐकून घ्यावे असा निर्णय दिलेला नाही. माझ्याजवळ हायकोर्टाचे जज्जमेंट उपलब्ध आहे, ते मी आपल्याकडे द्यावयास तयार आहे. हायकोर्टाने निर्णय दिल्यानुसार श्री.सुधाकर जोशी, निवृत्त आय.ए.एस.अधिकारी यांची एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. समितीने जळगावच्या विमानतळ घोटाळाप्रकरणी हायकोर्टाला अहवाल सादर केला. ज्यांनी हा घोटाळा केला त्यांच्यावर कारवाई करावी असे अहवालात म्हटले आहे. असा निर्णय दिल्यानंतरही कारवाई होत नाही म्हणून श्री.काळे यांनी पीआयएल दाखल केली. अहवालात म्हटल्याप्रमाणे हायकोर्टाने निर्णय दिला की संबंधितांवर कारवाई करण्यात यावी. त्यानंतर डॉ.गेडाम, आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. नगरविकास राज्यमंत्री किंवा नगरविकास विभागाने डॉ.गेडाम यांची एका महिन्यात बदली केली. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल झाल्यानंतर आरोपींचे म्हणणे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

ऐकून घेण्यात येते. हायकोर्टाने त्यांच्या विरोधात निर्णय दिला, हायकोर्टाने नियुक्त केलेल्या समितीने त्यांच्या विरोधात अहवाल दिला. असे असताना पुन्हा त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायचे ही कोणती प्रोसीजर आहे? The High Court has already delivered the judgement and they have no right to listen anybody's say.

**सभापती** : याठिक्राणी जे उत्तर देण्यात आले आहे त्यावरुन असे दिसते की, हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने जो निर्णय दिला त्या अनुषंगाने जे संबंधित आरोपी आहेत त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे याबाबत राज्यमंत्री महोदयांनी याठिकाणी सांगितले की, दि.18 जून,2006 रोजी एक हिअरिंग झालेली आहे. पुढील हिअरिंग दि.25 जुलै,2006 रोजी होणार असून त्यावेळी उर्वरित लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे म्हणणे आहे की, हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने जो निर्णय दिला त्यामध्ये संबंधितांचे म्हणणे ऐकून घ्यावे असे म्हटलेले नाही. हायकोर्टाचे जज्जमेंट मंत्रीमहोदयांकडे उपलब्ध आहे का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय. माझ्याकडे जज्जमेंट उपलब्ध आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला जज्जमेंटची प्रत सादर करतो. श्री.सुधाकर जोशी यांची एक सदस्यीय समिती नियुक्ती केली होती, त्या समितीने दोषारोप असलेला अहवाल हायकोर्टाला सादर केला. हायकोर्टाने यासंबंधी कायदेशीर कारवाई करावी असा निर्णय दिला. त्याप्रमाणे कारवाई होत नाही म्हणून श्री.काळे यांनी पीआयएल हायकोर्टात दाखल केली. असे असताना आपल्याकडून आम्हाला संरक्षण हवे आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.19837 .......**

श्री. नितीन गडकरी ....

सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकणी तुम्ही मला सांगा, एकदा हायकोर्टानी निर्णय दिल्यानंतर आरोपीचे म्हणणे पुन्हा ऐकणे हे योग्य आहे का? आपण माझ्या मोठया भावासारखे आहात त्यामुळे यासंदर्भात आपल्याला काय वाटते ते सांगावे कारण आपण एक वकील आहात, आपण विद्ववान आहात, त्यामुळे यासंदर्भात आपण आपले ओपिनिअन द्यावे ?

**सभापती** : या संदर्भात माझ्याकडे हायकोर्टाचे जजमेंट आहे ते जजमेंट मी आपल्याला वाचून दाखवितो. " ... The Writ Petition is dismissed. So far as the decision of the Government to accept the report of the Committee is concerned, it is set-aside with the rider that before arriving at any decision to accept the report the Government shall hear the concerned persons. The concerned persons shall be those against whom findings are arrived at by the Committee." This is the part of the judgement.

Shri Nitin Gadkari: Mr. Chairman, Sir, if the Committee feels that they are not guilty does it means that they have a right to change the decision of the High Court?

The CHAIRMAN: It is the part of the judgement.

श्री. नितीन गडकरी : हायकोर्टाचे जजमेंट व्हाईड आहे काय? Mr. Chairman, Sir, I will request you to consider the spirit behind the decision of the High Court. The spirit behind the decision is that this authority is not more than the High Court. The High Court has already decided the dispute and delivered the its decision.

**The CHAIRMAN:** I will again read out the part of the judgement delivered by the High Court. It reads as under: चn the circumstances, the Writ Petition partly succeeds. So far as the challenge to the constitution of the Committee and the inquiry conducted by the Committee is concerned,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.19837** .......

**The CHAIRMAN**.......

the Writ Petition is dismissed. So far as the decision of the Government to accept the report of the Committee is concerned, it is set-aside with the rider that before arriving at any decision to accept the report the Government shall hear the concerned persons. The concerned persons shall be those against whom findings are arrived at by the Committee." This is the part of the judgement.

श्री. नितीन गडकरी : आपण म्हणता त्या प्रमाणे यासंदर्भात दोन जजमेंट आहेत. यासंदर्भात कमिटीची दिशा ठरलेली आहे. It is a one man Committee report. Whether it is Constitutional? There are two judgements. आपण म्हणता त्या प्रमाणे वनमॅन कमिटीचे रिपोर्ट घटनात्मक आहेत की, नाहीत? यासंदर्भात दोन जजमेंट आहेत. ज्यानां दोषी धरले त्यांनी कमिटीच्या व्हॅलेडीटीला चॅलेंज केल. कमिटीच्या रिपोर्टवर कोर्टाने असे म्हटले आहे की, तुम्ही एकदा यांचे म्हणणे ऐकून घ्या ? The decision is different and the part of the Committee report is different. खरे म्हणजे त्यांनी कमिटीच्या म्हणण्यालाच आव्हान दिलेले आहे. ठीक आहे त्यांचे म्हणणे आपण ऐकून घेतले आहे काय? ऐकून घेतल्यांनतर किती दिवसात शासन निर्णय करेल त्या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून केली जाणार आहे?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, यासंदर्भात 18 जून आणि 25 जनू रोजी म्हणणे ऐकून घेतले जाणार आहे. 18 जूनला काही लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यात आलेले आहे व राहिलेल्या व्यक्तींचे 25 जून रोजी म्हणणे ऐकून घेतले जाणार आहे. सगळयांचे म्हणणे ऐकून झ ााल्यानंतर कारवाई करावयाची आहे.

श्री. गुरुमुख जगवानी : सभापति महोदय, मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहता हूँ कि डॉ. गेडाम ने पुलिस स्टेशन में कितने लोगों के खिलाफ शिकायत दाखिल की थी और उनकी एक महीने के अन्दर बदली क्यों कर दी गई ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19837........

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकणात एकूण 20 लोकांवर कारवाई करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. आता न्यायालयाच्या निर्णयानुसार त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावयाचे आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

----------------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील महसूल थकबाकीमध्ये होणारी वाढ**

**(7) * 17811 श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्रीमती कांता नलावडे** : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील 2005 सालापर्यंत जमा होणाऱ्या महसूलाची थकबाकी 12500 कोटी रुपयांपर्यंत झाली आहे हे खरे आहे काय,

(2) या थकबाकी पैकी 12000 कोटी रुपयांची थकबाकी फक्त विक्रीकर विभागाची आहे हे खरे आहे काय, असल्यास, या संदर्भातील अपिलांचा निर्णय होण्यासाठी 5 ते 7 वर्षाचा कालावधी लागतो हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या अपिलांचे निर्णय लवकरात लवकर लावण्यासाठी शासनस्तरावर यंत्रणा उभी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ.सुनील देशमख, श्री. जयंत पाटील यांच्याकरिता** : (1) विक्रीकर विभागाशी संबंधीत 31 मार्च, 2005 रोजीची प्रलंबित थकबाकी रु.12380.76 कोटी इतकी आहे.

(2) वरील थकबाकीपैकी फक्त रुपये 1176.46 कोटी वसुलीस उपलब्ध असून बाकीची थकबाकी विविध कारणामुळे वसुलीस उपलब्ध नाही.

अंशत: खरे आहे.

थकबाकी संदर्भातील अपिलांचा निर्णय होण्यासाठी काही प्रकरणांत 5 ते 7 वर्षाचा कालावधी लागतो. विभागीय अधिकाऱ्यांकडील अपिलांचा निपटारा बहुतांशी 5 वर्षापेक्षा कमी कालावधीत होत आहे. न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असणाऱ्या 25 ते 30 टक्के अपिल प्रकरणांत निर्णय होण्यासाठी 5 ते 7 वर्षापेक्षा जास्त कालावधी लागत आहे.

(3) विभागीय अपिल प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासंदर्भात, विक्रीकर सहआयुक्त व विक्रीकर उपआयुक्त या पदांची संख्या वाढवून अपिलांचा निपटारा करण्याचे दृष्टीने पावले उचलण्यात आली आहेत.

विक्रीकर आयुक्तांनी विभागीय अपिल अधिकाऱ्यांना प्राधान्य अपिले व जुन्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचना वेळोवेळी निर्गमित केल्या आहेत.

अभय योजना-2004 मध्ये 4755 अपिल प्रकरणांचा निपटारा होऊन रु.791.24 कोटी इतक्या रक्कमेची प्रलंबित थकबाकी निकाली काढलेली आहे.

विक्रीकर न्यायाधिकरणाच्या स्तरावर अधिक अपिलांच्या लवकर निपटाऱ्यासाठी, न्यायाधिकरणासाठी अधिक दोन खंड पीठे (बॅचेस) मंजूर करण्यात आली असून त्यांची स्थापना लवकरच करण्यात येत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात नमूद केले आहे की, एकूण 12380 कोटी रुपयांची वसुली बाकी आहे. ही सर्व वसुली झाली असती तर याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, प्रा.बी.टी.देशमुख व अन्य सदस्य नेहमी अनुशेषाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17811 ........

श्री.विनोद तावडे............

संदर्भात मुद्दे उपस्थित करतात, ते होणार नाहीत. एकीकडे सरकार डिझेलवरील सेस, पेट्रोलवरील सेस सर्वसामान्यांकडून पटापट वसूल करीत आहेत, तर दुसरीकडे धनदांडग्या लोकांकडून मोठ्या प्रमाणावर विक्रीकर वसूल व्हावयाचा आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की,ज्याप्रमाणे विविध गुन्ह्याचा निकाल लवकर लागण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट अस्तित्वात आहेत, त्याप्रमाणे विक्री करासंबंधीची प्रकरणे लवकर निकाली काढण्यासाठी अशातऱ्हेचे फास्ट ट्रॅक कोर्टची सिस्टीम अंमलात आणणार आहे का ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, जी 12 हजार 380 कोटी रुपयांची वसुली व्हावयाची आहे, त्यामधील 1176 कोटी इतकीच रक्कम वसूल व्हावयाची आहे.उर्वरित जी रक्कम आहे ती विविध घटकांतील आहे. जसे काही प्रकरणे सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहेत, काही प्रकरणे उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. उच्च न्यायालयात किंवा ट्रॅब्युनलकडे जी प्रकरणे प्रलंबित आहेत ती लवकरात लवकर एक्सपिडाईट करण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे फास्ट ट्रॅक कोर्ट सिस्टीमचा अवलंब भविष्यात निश्चितपणे केला जाईल आणि त्यादृष्टीने आम्ही पाऊले उचलण्यास सुरुवात केलेली आहे. केसचा लवकरात लवकर निकाल लागण्यासाठी विक्रीकर आयुक्ताची सात पदे आणि सहाय्यक आयुक्तांची दोन पदे मंजूर करण्यात आली आहेत. एखादी केस ट्रॅब्युनलमध्ये जाते, त्यानंतर पुढे ती उच्च न्यायालय, सुप्रीम न्यायालयात जाते, यामध्ये भरपूर कालावधी जातो. काही राज्याबाहेरचे दावे सुध्दा आहेत. परंतु जे पहिले अपील असते त्याचा निकाल लागण्यासाठी 5-7 वर्षे जातात. तेव्हा हा कालावधी कमी करण्यासाठी आम्ही अपीलेट ऑथॉरिटींची संख्या वाढविणार आहोत, जेणेकरुन हा कालावधी 2-3 वर्षापर्यंत आणता येईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, जी थकित रक्कम आहे ती किती कालावधीतील आहे ? स्टाफ कमी असल्यामुळे वसुली वेळेवर झालेली नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, स्टाफ वाढविणार आहोत. तेव्हा हा स्टाफ किती दिवसांत वाढविणार आहात ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क. 17811 ...............

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही जी थकीत रक्कम आहे ती एका वर्षातील नसून गेल्या कित्येक वर्षापासूनची आहे. सन 2004 ची महसूली जमा 13 हजार कोटी रुपये होती. सन 2005 मध्ये ही रक्कम 22 हजार कोटीच्या वर गेली आहे. म्हणजे जवळपास 10 हजार कोटीं रुपयांनी वाढ झालेली आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ही वसुली एका वर्षातील नसून मागील कित्येक वर्षापासूनची आहे. सन 1956 रोजी हा कायदा लागू झाला. त्यानंतर या कायद्यामध्ये 10-12 बदल करण्यात आले. तेव्हापासूनची काही प्रकरणे प्रलंबित आहेत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित.. 14:15

ता.प्र.क्र.17811...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ट्रॅब्यूनलकडे आपण गेल्यानंतर त्यांना कालमर्यादा आहे. Tribunal is not a high court. अधिका-यांकडे अपील केले म्हणजे, वसुली करण्यास येऊ नये असा त्याचा आपण अर्थ लावता. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 1176 कोटी रुपये वसुलीस उपलब्ध आहेत. परंतु ही लहान रक्कम नाही. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, ही वसुली का केली जात नाही ? तसेच, शेवटी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "विक्रीकर न्यायाधिकरणाच्या स्तरावर अधिक अपिलांच्या लवकर निपटाऱ्यासाठी, न्यायाधिकरणासाठी अधिक दोन खंडपीठे (बॅचेस) मंजूर करण्यात आली असून त्यांची स्थापना लवकरच करण्यात येत आहे." राज्याचा महसूल एवढया मोठया प्रमाणात वसूल करावयाचा असताना आपण ही खंडपीठे लवकर का स्थापन केली नाहीत ? व ती केव्हा स्थापन करण्यात येतील ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, दि.1 एप्रिल,2001 पर्यंत 48 हजार 61 एवढी विभागीय अपिले प्रलंबित होती, त्यापैकी दि.31 मार्च,2006 पर्यंत फक्त 12 हजार अपिलेच प्रलंबित आहेत. ही अपिले पूर्ण करण्याच्या दृष्टीने गेल्या 3-4 वर्षांमध्ये विभागाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. गेल्या कित्येक वर्षापासून प्रलंबित असलेली अपिले विभागाने सातत्याने प्रयत्न करुन निकाली काढण्याचा प्रयत्न केला आहे. याठिकाणी मी सांगितल्या प्रमाणे, विक्रीकर आयुक्तांची 7 पदे, विक्रीकर उपायुक्तांची 2 पदे मंजूर केलेली आहेत. पुन्हा एकदा मोहीम काढून उर्वरित प्रलंबित अपिले लवकरात लवकर आम्ही निकाली काढण्याचा प्रयत्न करु.

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 12 हजार अपिले प्रलंबित आहेत. कर बुडविणाऱ्या अशा प्रवृत्ती निर्माण झालेल्या आहेत. त्या अशा प्रकारे अपिले न्यायप्रविष्ट करतात व वर्षानुवर्षे कर भरत नाहीत. त्यामुळे जे नियमित कर भरतात त्यांची अशी भावना होते की, आपण नियमित कर भरुन चूक तर करीत नाही ना ? परंतु याठिकाणी कर न भरणाऱ्या प्रवृत्ती वाढत आहेत. याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, या संदर्भातील जी अपिले प्रलंबित आहेत, त्याबाबतीत आपण वसुली करताना त्याची वसुली व्याजासह करणार का ? तसेच ही बाब न्यायप्रविष्ट करण्याच्या दृष्टीने आपण अशा प्रकारची सिस्टीम केली आहे का ? व ही वसुली व्याजासह केलेली आहे का ?

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17811...

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, ट्रॅब्यूनलला स्थगिती देण्याचे अधिकार आहेत. त्यांना याबाबतीत टाईम बाऊंड नाही. ज्या रक्कमेला स्टे दिलेला असेल त्याची रिक्व्हरी करण्याचे अधिकार नसल्यामुळे रक्कम प्रलंबित राहते. यासंबंधी व्याज आकारण्यासंबंधी माहिती घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी एका गंभीर प्रश्नांकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. रेकॉर्डवर 1100 ही जी रक्कम दिलेली आहे, ती कमी आहे. प्रत्यक्षात साडे तीन हजार रुपयांच्या कर चुकवेगिरीचे पुरावे मी सरकारकडे दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे यांनी जी माहिती दिली ती खरी आहे. अप्पर आयुक्त, आयुक्तांचा लक्ष्मीदर्शन कार्यक्रम जोरात सुरु आहे. एका-एका सेल्स टॅक्स अधिकाऱ्याचे मार्केटमध्ये 10-10 कोटी रुपये हुंडयात फिरत असून आज ते करोडोपती झालेले आहेत. अशा प्रकारे सरकारचा कर डुबवणे सुरु आहे. याबाबतीत हायकोर्टात पुन्हा अपील होणार आहे. याबाबतीत आपला मार्ग असा आहे की, यातील व्याज आणि पेनल्टी माफ करुन जसे बँकांनी सूत्र काढले, तसे ओ.टी.एस.मध्ये आपण घेतले तर आपल्याला वन टाईममध्ये करोडो रुपये मिळणार आहेत. नाफ्त्याच्या घोटाळयाबाबत कंटाळून मी कोर्टामध्ये पीएलआय टाकलेली आहे. आपण सेल्स टॅक्स देण्यास तयार असणाऱ्यांकडून तो घेण्यास आपण तयार नाहीत. आपला टोटल ॲप्रोच हा निगेटीव्ह आहे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, हे सर्व एकदाच वसूल व्हावे म्हणून व्याज व पेनल्टी कमी करण्याची स्कीम करुन तशा प्रकारचा पैसा निश्चित काळात वसूल करण्याचा सरकार प्रयत्न करेल का ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

-------

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक

**मु.शी.**: सन 2006 चे वि.स.वि.क्र.72 - मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा, विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती

**सभापती** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवितील.

<u>संदेश</u>

सचिव : महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 20 जुलै 2006 रोजी झालेल्या सभेत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम 129 व 198 (2) अन्वये पाठविण्याचा मला निदेश दिला आहे.

<u>प्रस्ताव</u>

"सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 72 - मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 15 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेर पर्यन्त सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, दिनांक 20 जुलै 2006 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

" सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 72 - मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 15 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेर पर्यन्त सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विधानपरिषदेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

1) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स.
2) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
3) श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स.
4) श्रीमती सुधा जोशी, वि.प.स.
5) कर्नल सुधीर सावंत, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ KGS/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची दहावी, अकरावी, बारावी, तेरावी आणि चौदावी यादी मुद्रित स्वरुपात व पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी व विसावी यादी अमुद्रित स्वरुपात सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची दहावी, अकरावी, बारावी, तेरावी आणि चौदावी यादी मुद्रित स्वरुपात व पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी व विसावी यादी अमुद्रित स्वरुपात सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची दहावी, अकरावी, बारावी, तेरावी आणि चौदावी यादी मुद्रित स्वरुपात व पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी व विसावी यादी अमुद्रित स्वरुपात सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

----------------

..4..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, मर्यादितचा सन 2002-2003 चा 37 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल 2005 ते 31 मार्च 2006 या कालावधित शासनाच्या वेगवेगळया विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज व त्यावरील व्याजास तसेच उभारलेल्या कर्जरोख्यास देण्यात आलेल्या हमी विषयीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे सन 2004-2005 चे लेखा विवरण पत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

--------------

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पंचायत राज समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.शिवाजीराव पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायत राज समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : पंचायत राज समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यांबाबत.**

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये विशेष आर्थिक क्षेत्र होत आहे. रायगड जिल्हयातील जे सिंचनाचे क्षेत्र आहे त्या क्षेत्राचा समावेश विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये करण्यात आला आहे. जवळ जवळ 52 गावांसाठी 5,750 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झालेले आहे. या सिंचनासाठी हेटवणे धरण बांधलेले आहे. हेटवणे प्रकल्पासाठी शासनाने 221 कोटी रुपये खर्च केला असून 50 कोटी रुपयांची कामे प्रस्तावित आहेत. कोकणामध्ये सिंचनाचे प्रकल्प कमी आहेत. पेण तालुक्यामध्ये सिंचनासाठी मोठा प्रकल्प आहे. पेण तालुक्यातील 80 टक्के क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यातून 45 गावे वगळण्यात यावीत, अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3/-

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सुपारीवरील कर रद्द करण्यासंबधीचे विधेयक आणले जाईल, असे माननीय मंत्री महोदयांनी दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी सभागृहात सांगितले होते. मागच्या 5 वर्षापासून सुपारी उत्पादक शेतकरी आंदोलने करीत आहेत. सुपारी पिकावर कोळे नावाचा रोग पडतो. त्यामुळे सुपारीचे पीक घेणारे शेतकरी हवालदिल झालेले आहेत. दिनांक 14.12.2005 रोजी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे विधेयक आणावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करतो.

---------

...4/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ....... 14:25

श्री.भास्कर जाधव (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, दिनांक 26.07.2005 रोजी कोकणामध्ये अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली. चिपळूण तालुक्यातील मुंढे पायवाडी येथे डोंगर घसरुन 5 माणसे गाडली गेली. या 5 माणसांना तात्पुरत्या स्वरुपाची शेड बांधून देण्यात आली नाही. कायम स्वरुपी घरे देण्यात आली नाहीत. तलाठयांनी त्या माणसांना 4-5 दिवसापूर्वी नोटीस दिली आहे की, तुमच्या घरांना फार मोठा धोका आहे. म्हणून आपण ही घरे तात्काळ खाली करावीत. सभापती महोदय, ज्यांची घरे पूर्णपणे डोंगराखाली गाडली गेली त्यांना तात्पुरत्या स्वरुपाची शेड बांधून दिली नाही. कायम स्वरुपी घरे दिली नाहीत त्यांना घरे खाली करण्याची नोटीस दिली जाते. शासनाचे याकडे अक्षम्य असे दुर्लक्ष झालेले आहे. ही क्रूर चेष्टा आहे. माननीय महसूल मंत्र्यांशी मी यासंदर्भात पत्र व्यवहार केला आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी याकडे लक्ष दिलेले नाही. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाचे याकडे लक्ष वेधू इच्छितो आणि शासनाने यामध्ये लक्ष द्यावे, अशी विनंती करतो.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...5/-

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी पुढील औचित्याचा मुद्दा मांडते. पशुधन पर्यवेक्षक पदवीधरांची नेमणूक अनेक जिल्हा परिषदांमध्ये करण्यात आलेली आहे. मूलत: ग्राम विकास विभाग आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय यांच्या दिनांक 24 जून, 2006 च्या पत्रानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा अधिनियम, 1967 नुसार पशुसंवर्धन पर्यवेक्षक पदासाठी शैक्षणिक अर्हता ठरविण्यात आली आहे. पदवीधर पात्र ठरत नसतांना कायदा धाब्यावर बसवून बेकायदेशीर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.सुंबरे .........

श्रीमती कांता नलावडे ....

तेव्हा यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत तसेच ज्या बेकायदेशीर नेमणुका केल्या गेल्या आहेत त्या रद्द करून पुन्हा पारदर्शी पद्धतीने करण्यात याव्यात. सभापती महोदय, हे पशूधन पर्यवेक्षक शेतकऱ्यांच्या चुलीपर्यंत जाऊन पोहोचणारे असून शेतकऱ्यांच्या घरच्या जनावरांना दुर्धर आजारांमधून ते बाहेर काढीत असतात. या लोकांना खाजगी प्रॅक्टिस देखील करता येत नाही. आज असे अनेक पशुधन पर्यवेक्षक बेकार आहेत, त्यांना नोकऱ्या नाहीत. तेव्हा ज्यांच्या बेकायदेशीरपणे नेमणुका झालेल्या आहेत त्या नेमणुका रद्द करण्यात येऊन त्या बेकार पशुधन पर्यवेक्षकांना रितसर नेमणुका द्याव्यात अशी मी या औचित्त्याच्या मुद्याच्या निमित्ताने मागणी करते.

***

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एक औचित्त्याचा मुद्दा येथे उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, 5 जुलै 2006 रोजी सकाळी 8.00 वाजता नांदेड जिल्ह्यातील येवती गावी काही सवर्णांनी दलित वस्तीवर प्राणघातक शस्त्रांनिशी हल्ला करून तेथे दिसेल त्याला बेदम मारहाण केली आहे. त्यामध्ये .....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहामध्ये कोणीही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही. तरी आपण कॅबिनेट मंत्री येईपर्यंत सभागृहाची बैठक तहकूब करावी.

**सभापती** : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक 2.32 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

( यानंतर श्री. सरफरे .... 3बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनोद तावडे)**

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

**तालिका सभापती** : सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 43 मिनिटांनी, 3.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**कामकाजासंबंधी**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील जी दोन लहान शासकीय विधेयके आहेत ती अगोदर घेण्यात येतील.

**पृ.शी.** : आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना विधेयक.

**L. A. BILL NO. LXXVIII OF 2006.**

**(A BILL TO MAKE MORE EFFECTIVE PROVISIONS FOR THE FIRE PREVENTION AND LIFE SAFETY MEASURES IN VARIOUS TYPES OF BUILDINGS IN DIFFERENT AREAS IN THE STATE OF MAHARASHTRA.)**

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री): सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 78 - महाराष्ट्र राज्यातील निरनिराळया क्षेत्रांमधील वेगवेगळ्या प्रकारच्या इमारतींमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांसाठी अधिक परिणामक तरतुदी करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 78 -महाराष्ट्र राज्यातील निरनिराळया क्षेत्रांमधील वेगवेगळ्या प्रकारच्या इमारतींमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांसाठी अधिक परिणामक तरतुदी करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील अ,ब,क,ड वर्ग महानगरपालिका, नगरपालिका यांच्या हद्दीमध्ये 15 मिटरपेक्षा उंच इमारती आहेत. त्या इमारतींना या अधिनियमाच्या प्रस्तावाअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले आहे. 15 मिटरपेक्षा उंच इमारतींच्या बाबतीत या नॅशनल बिल्डिंग कोड ऑफ इंडया ॲक्टनुसार त्या इमारतींना फायर सिस्टीम बसविणे आवश्यक आहे. साधरणपणे या सगळया इमारतींवर जी काही अग्निशमन यंत्रणा बसविणार आहोत, त्यामध्ये सुपरव्हीजन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्याची तरतूद केलेली आहे. साधरणपणे आजही बीपीएमसी ॲक्ट, नागपूर म्युनिसिपल कार्पोरेशन, मुंबई महानगरपालिका या कायद्यान्वये आजही 15 मिटरपेक्षा उंच इमारती आहेत त्या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. परंतु या यंत्रणेचे मेन्टेनन्स करण्याच्याबाबतीत कोठेही तरतूद आज नाही. दागिना म्हणून विकासकांनी यंत्रणा बसविली. परंतु जेव्हा प्रसंग येतो, तेव्हा ती यंत्रणा कधीही कामी येत नाही. म्हणून यामध्ये स्पष्ट तरतूद केलेली आहे, त्याप्रमाणे सातत्याने त्याचे सुपरव्हीजन होणार आहे, यंत्रणेची तपासणी केली जाणार आहे, तशी या अधिनियमामध्ये तरतूद आहे. तशी यंत्रणा सापडली नाही तर त्यांना नोटीस देऊन त्या पध्दतीने ती यंत्रणा दुरुस्त करण्याचे काम,यंत्रणा सक्षम करण्याचे काम कारण्यासाठी तरतूद केलेली आहे. आज या ठिकाणी एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन ॲक्ट स्वीकारलेला आहे. या बिलामध्ये "रिस्क क्रिएटर शूड पे",अशाप्रकारची तरतूद या अधिनियमामध्ये करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

सभापती महोदय, या ठिकाणी प्रामुख्याने रिस्क क्रिएटर शूड पे असा कंसेप्ट या बिलामध्ये आहे. या बिलामध्ये महत्वाची गोष्ट अशी आहे की, यामध्ये रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्ट नाही. प्रॉस्पेक्टिव्ह इफेक्ट असलेले हे बिल आहे. यापुढे ज्या इमारती होणार आहेत अशा 15 मीटर उंचीच्या इमारतीला, रहिवासी विभागाला हे लागू होणार आहे. जो विकासक असेल त्याला सुरुवातीला लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून एकरकमी रक्कम भरावी लागेल. नंतरच्या प्रत्येक वर्षी ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझी आपल्याला विनंती आहे. आपणही हे मान्य कराल की, फायर ॲक्ट यावा म्हणून मी दोन अधिवेशनांमध्ये बोललो आहे. फायर ॲक्ट नसल्यामुळे अनेक घटना घडलेल्या आहेत. हे बिल अत्यंत महत्वाचे आहे. मी या बिलाच्या विरोधात नाही पण यामध्ये 50 प्रकारचे बदल येत आहेत. हे बिल स्वागतार्ह आहे. या संदर्भात अनेक बाबतीत चर्चा करणे, आपले विचार मांडणे आवश्यक आहे. मुंबई महानगरपालिकेच्या फायर ब्रिगेडचा विषय मोठा आहे. संभाजीनगरच्या फायर ब्रिगेडचा विषय मोठा आहे. नागपूरच्या फायर ब्रिगेडचा विषय मोठा आहे. फायर ब्रिगेडमध्ये केवळ उंच इमारतींचाच विषय नसून यामध्ये रुग्णालयांपासून शाळेपर्यंतचे विषय आहेत. याबाबतीत मार्गदर्शक चर्चा व्हावी अशी आमची इच्छा आहे. शासनाने याबाबत अध्यादेश काढला असेलच.

श्री. राजेश टोपे : अध्यादेश काढलेला नाही.

श्री. दिवाकर रावते : अध्यादेश काढला नसेल तर काढावा. मी या बिलाच्या विरोधात नाही.

श्री. राजेश टोपे : यासंदर्भात आपले एकच राज्य राहिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : गेली दोन वर्षे मी फायर ॲक्ट आणा असे सांगत आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी मी सांगितले की, फर्स्ट इनिशियल पेमेंट केलेली जी रक्कम असते त्याच्या 1 टक्का एवढा दरवर्षी फायर प्रोटेक्शन फंड गोळा करण्याच्या दृष्टीकोनातून या बिलामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. "क" वर्ग नगरपालिका, "ब" वर्ग नगरपालिका, "अ" वर्ग नगरपालिका या सगळ्या ठिकाणी नगरविकास विभागाच्या माध्यमातून आता आपण फायर ऑफीसरची पदे निर्माण केलेली आहेत. आधी या "क" वर्ग नगरपालिकेमध्ये, "ब" वर्ग नगरपालिकेमध्ये, "अ" वर्ग नगरपालिकेमध्ये अशी पदे नव्हती परंतु या बिलाच्या माध्यमातून आग

RDB/ D/ MHM/

श्री. राजेश टोपे ....

प्रतिबंधक व्यवस्थेचे महत्व लक्षात घेऊन त्या ठिकाणी ही पदे निर्माण केलेली आहेत. राज्यामध्ये जसे पोलीस दल आहे त्या पध्दतीने आग प्रतिबंधक दल अशा एका मोठ्या कॅडरची तरतूद यामध्ये राहणार आहे. यामध्ये स्वयंरोजगाराची एक मोठी संधी या बिलाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देत आहोत. हे लोक डिग्री होल्डर आहेत, जे लोक डिप्लोमा होल्डर आहेत तसेच ॲडव्हान्स डिप्लोमा इन फायर इंजिनिअरींग केलेले विद्यार्थी असतील त्यांना लायसन्स देण्याचा अधिकार हा या बिलाचा महत्वाचा भाग आहे. यामुळे या माध्यमातून मोठ्या संख्येने रोजगार देखील उभा राहू शहणार आहे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे त्या ठिकाणी जो काही फंड गोळा होणार आहे तो कंसॉलिडेटेड फंडामध्ये न जाता यासाठी स्वतंत्र खाते उघडले जाईल आणि फायर प्रोटेक्शन फंड हा फक्त अग्निशमन यंत्रणा बळकट करण्याच्या दृष्टीने वापरला जाणार आहे. अशा पध्दतीचे बंधन या बिलाच्या तरतुदीच्या माध्यमातून करण्यात आले आहे. शेवटी मनुष्यजीवन हे किमती आहे. आज आपण अनेक घटना पाहतो. दिल्लीमध्ये लागलेली आग असेल किंवा मेरठला मंडपाला लागलेली आग असेल त्यामध्ये अनेक निष्पाप लोकांचे बळी गेले. अशा पध्दतीच्या घटना होऊ नयेत. आज आपल्याकडे अग्निशमन दल आहे आणि आग लागल्यानंतर आग विझविण्याची व्यवस्था आहे. परंतु लाग लागूच नये, आगीला प्रतिबंध करावा यादृष्टीने काळजी घ्यावी हा या बिलाच्या प्रिॲम्बलमधील महत्वाचा गाभा आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे...)

माणसाच्या जीवनाची किंमत लक्षात घेऊन या विधेयकामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. हे अत्यंत चांगले असे विधेयक आहे. महाराष्ट्र हे प्रोग्रेसिव्ह स्टेट आहे असे आपण म्हणतो. परंतु मी दुर्दैवाने हे नमूद करुन इच्छितो की, अशा प्रकारचा कायदा देशामध्ये फक्त आपल्या राज्याने केलेला नव्हता. गोव्यासारख्या लहान राज्यानेही आग प्रतिबंधक कायदा केलेला आहे. आपण देखील अशा प्रकारचा कायदा करण्याचा प्रयत्न अनेक वर्षापासून करीत होतो. आता हा कायदा याठिकाणी आणलेला आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदनासंबंधी</u>**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय,मी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झालेला मृत्यू यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यासंदर्भात शासनाने निवेदन करावे असे आपण निदेश दिले होते. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असून शासनाने अद्याप निवेदन केलेले नाही.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आजच निवेदन करण्यात येईल.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना विधेयक

**L. A. BILL NO. LXXVIII OF 2006.**

**(A BILL TO MAKE MORE EFFECTIVE PROVISIONS FOR THE FIRE PREVENTION AND LIFE SAFETY MEASURES IN VARIOUS TYPES OF BUILDINGS IN DIFFERENT AREAS IN THE STATE OF MAHARASHTRA.)**

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना विधेयक, 2006 यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधिमंडळ कायदे-कानून बनवित असते. हे कायदे बनवित असताना ते पूर्ण विचारांती आणि राज्याच्या विविध भागातून आलेल्या लोकप्रतिनिधींचे अनुभव लक्षात घेऊन बनविले जातात. मला हे माहीत आहे की, सभागृहामध्ये एखादे विधेयक मांडल्यानंतर त्यामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीसंबंधी वेळीच सुधारणा सुचविल्या नाहीत तर ते विधेयक तसेच संमत होते. कोणत्याही विधेयकावर सदनामध्ये जेव्हा चर्चा केली जाते त्यावेळी सन्माननीय सदस्य हे त्यांना सामाजिक जीवनामध्ये कार्य करीत असताना आलेल्या अनुभवातून आपले विचार या ठिकाणी मांडत असतात आणि विधेयकातील त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाला सूचना करीत असतात. आता माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी मांडलेले विधेयक हे आमच्यावर लादले जात आहे असा नाराजीचा सूर काढून मी या विधेयकावर बोलत आहे.

सभापती महोदय, फायर ॲक्ट हा अत्यंत महत्वाचा आहे. या विधेयकाचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. हा कायदा करण्यामध्ये सरकार का मागे राहिले याचा विचार शासनानेच करायचा आहे. या मुंबई शहरामध्ये इमारतींच्या उंची वाढायला लागलेल्या आहेत. व्हर्टिकल डेव्हलपमेंट होत आहे. अशा परिस्थितीमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे केवळ 12 मजल्यांच्या पुढे आग विझविणारी शिडी नाही. मग अशा उंच मजल्यांच्या इमारतींना फायर ब्रिगेड कडून कशी काय परवानगी देण्यात येते, असा प्रश्न पडतो. केवळ उंच इमारती नाहीत तर सहा-सात मजल्याच्या इमारतींसाठीही फायर फायटींगची व्यवस्था असावी लागते. रुग्णालये इंडस्ट्रीयल इस्टेट, औद्योगिक वसाहती, धर्मदाय संस्था, व्यापारी संस्था, सामाजिक संस्था ....

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ D/ पूर्वी श्री.शिगम 15:15

श्री.दिवाकर रावते.........

समाज मंदिर, अतिरेक्यांचा हल्ला आता अपेक्षित धरुन सगळी मंदिरे, मॉल्स अशी विविध ठिकाणे, अशी याची व्याप्ती आहे. यादृष्टीने सुसज्ज अशा प्रकारचे अग्निशमन दल उभे करण्याची क्षमता कशी असेल हे शासनाकडून जाणून घेण्यास आम्ही उत्सुक होतो. एखाद्या महानगरपालिकेचे उत्पन्न आणि त्यांच्याकडे अग्निशमन दलाची क्षमता निर्माण करण्याची त्यांची बाजू समजून घेणे आवश्यक होते. अग्निशमन दलाच्या संदर्भात जागतिक पातळीवर मोठया प्रमाणात वेगवेगळया पध्दतीची फायर फायटिंग इक्विपमेंट यावयास लागली आहेत. आम्ही मात्र आगीमधून चालत जाणारा फायरमन दाखवून कौतुक करुन घेतो. या पलिकडे आमची प्रगती नाही. सभापती महोदय, हा विषय खूप व्यापक आहे. मुंबई महानगरपालिकेचे स्वत:चे अग्निशमन दल आहे. या मुंबई शहरामध्ये गेल्या 30 वर्षात ज्या टोलेगंज इमारती उभ्या राहिल्या, 10 मजली, 12 मजली इमारती आहेत त्या ठिकाणी फायर फायटिंग इक्विपमेंट बिल्डरमार्फत बसविण्यात आलेली आहे. ही इक्विपमेंट कोणत्या दर्जाची आहे, हे सर्टिफाय कसे होते, कोणाकडून होते आणि ती यंत्रणा नंतर चालते की नाही हे पहावयास कोणी नाही. मी माझा स्वानुभव लक्षात घेऊन यासंबंधी बोलण्याची गरज का आहे हे सांगतो. मी ज्या इमारतीमध्ये राहतो त्याठिकाणी फायर फायटिंग इक्विपमेंट बसविण्यात आलेली आहे. या यंत्रणेचा पितळी भाग चोरीला गेला आहे. एखादी गृहनिर्माण सोसायटी म्हटल्यानंतर एक सदस्य काही मागतो म्हणून सोसायटीला ते करावे लागते. 30 वर्षापूर्वी आमच्या सोसायटीने 8 लाख रुपये खर्चून ही यंत्रणा बसविली होती. आता नव्याने ही यंत्रणा बसवायची झाल्यास किमान 25 ते 30 लाख रुपये इतका खर्च येईल. आमच्या सोसायटीमध्ये ही यंत्रणा बसविल्यापासून कधीही पंप ट्रायल म्हणून सुध्दा वापरात आलेला नाही. जी पाण्यासाठी लाईन टाकण्यात आली आहे त्या लाईनमध्ये कधीही पाणी गेले नसल्यामुळे त्या लाईनचे काय झाले असेल हे आज सांगता येत नाही. मी स्वत: मुंबई शहराचा माजी महापौर आणि या सदनाचा एक सदस्य म्हणून मुंबई महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.झंडवाल यांच्याशी या अडचणीबाबत चर्चा केली, परंतु ते उद्दाम अधिकारी दाद द्यायला तयार नाही. एवढे होऊनही मी त्यांच्याशी पुन्हा दोन वेळा फोनवर बोललो आणि या प्रश्नाच्या खोलामध्ये गेल्यानंतर मला असे कळले की, संपूर्ण मुंबई शहर आणि पूर्व व पश्चिम उपनगरे याकरीता एक मुख्य अग्निशमन अधिकारी आणि तीन अग्निशमन अधिकारी आहेत. बिल्डरने उभारलेल्या एखाद्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ D/ पूर्वी श्री.शिगम 15:15

श्री.दिवाकर रावते.........

इमारतीला या संदर्भात एनओसी द्यावयाची असेल तर त्या त्या क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी ती दिली पाहिजे. परंतु आज हे सर्व अधिकार मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांनी स्वत:कडे ठेवले आहेत. हे अधिकार डेलिगेट करीत नाही त्यामुळे दुय्यम अधिकाऱ्यांना काही काम नाही. या फायर फायटिंग यंत्रणेचे इन्स्पेक्शन करावे लागते. मुंबई शहरामध्ये फायर फायटिंग बसविणाऱ्या एजन्सी किती आहेत? मी जेव्हा चौकशी केली तेव्हा मला कळले की, 60 मजली, 40 मजली इमारतींना परवानगी देण्यात आली आहे. फायर ब्रिगेडची एनओसी असल्याशिवाय पूर्णत्वाचा दाखला दिला जात नाही. त्यांनी मला असे सांगितले की, आता आधुनिक पध्दतीने विकासक स्वत:च त्यांची फायर फायटिंग यंत्रणा बसविणार आहेत. त्याकरीता फायर ब्रिगेडला ऊंच शिड्यांची गरज नाही. मुंबई शहरामध्ये उभ्या राहणाऱ्या ऊंच इमारती आणि फायर ब्रिगेडचा कारभार पाहून मुंबईचे महापौर म्हणाले, मला आता चिंता वाटायला लागली आहे. 40-42 मजली इमारतींना मंजुरी दिल्यानंतर फायर ब्रिगेड विभागामध्ये आम्हाला एक हेलिकॉप्टर घ्यावे लागेल आणि जेणेकरुन आग लागल्यास त्याद्वारे पाण्याचा शिडकावा करता येईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

फायरफायटींगच्या संदर्भात केवळ बघत बसण्याशिवाय अजून काय करु शकतो अशी माननीय महापौरांनीच व्यथा व्यक्त केलेली आहे. अशा प्रकारची मुंबई महानगरपालिकेच्या फायर फायटींगची परिस्थिती आहे. सभापती महोदय, 12 मजल्यावरील इमारतींना फायर फायटींग परवानगी कशी देते हे मला अजून तरी काही समजत नाही. सभापती महोदय, अग्नीशमन दलाला केवळ आगच विझ ावायचे काम आहे असे नसून या अग्निशमन दलाला एखाद्या घरात कोणी आत्महत्या केली असेल तर त्या ठिकाणी जावे लागते, झाड पडले असेल तर ते उचलावे लागते, झाडाची फांदी खाली आली येत असेल तर ती तोडण्यासाठी जावे लागते, एखादा पक्षी अडकला असेल तर तो काढण्यासाठी जावे लागते, कोणी विहिरीत पडून मरण पावला तर त्याला काढण्यासाठी जावे लागते अशा प्रकारची किती तरी कामे या अग्निशमन दलाला करावी लागत असतात. त्यामुळे या विभागाकडे किती कामे द्यावयाची याचा सुध्दा विचार होण्याची आता वेळ आलेली आहे. सभापती महोदय, फायर फायटींगचा विषय हा फार मोठा आहे. त्यामुळे या बिलाच्या संदर्भात खरे तर आम्हाला अगोदर माहिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती. फायर फायटींगच्या इन्स्पेक्शन करणा-या किती एजन्सीज आहेत? फायर इक्वीपमेंट सप्लाय करणा-या किती एजन्सीज आहेत? याची सुध्दा आम्हाला माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. लिफट्चे इन्सपेक्शन करणारे वर्षातून एकदा येतात, लिफ्ट्ची तपासणी करतात, सही करतात आणि निघून जातात. मग ही लिफ्ट् वर्षभर जरी बंद पडली तरी त्यांना काही देणे घेणे नसते. वर्षभरात लिफट् कशा प्रकारे चालते याची सुध्दा ते माहिती घेत नाही. फक्त वर्षातून एकदा यावयाचे, इन्स्पेक्शनची फी घ्यावयाची आणि निघून जावयाचे असेच इन्स्पेक्शनवाल्यांचे काम दिसते. अशा प्रकारे इन्स्पेक्शनचे काम केले जाते. या सभागृहाला देखील लिफ्ट् आहे आणि या लिफटचे इन्सपेक्शन हे पीडब्ल्यूडी विभागाकडून होत असते. सभापती महोदय, फायर ब्रिगेडचे काम कसे चालते याचा व्यक्तीगत अनुभव मी सोसला आहे म्हणून त्याचे एक उदाहरण मी आपल्याला सांगतो. मी ज्या इमारतीत राहतो ती इमारत 35 वर्षापूर्वीची असून ही इमारत 12 माळयाची आहे. या इमारतीला दोन लिफ्टस् आहेत. खरे म्हणजे फायर फायटींगसाठी एक स्वतंत्र लिफ्ट् असली पाहिजे. ही लिफ्ट महिन्यातून दोनदा तरी बंद पडलेली असते, जर इमारतीत वयोवृध्द लोक राहत असतील

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आणि अशा प्रकारे लिफ्ट् बंद पडत असेल तर त्यांचे काय होत असेल याचा विचारच केलेला बरा. माझ्याही इमारतीचे लिफ्ट्च्या इन्स्पेक्शन काम पीडब्ल्यूडीकडे आहे. यासंदर्भात मी आमदार म्हणून पीडब्ल्यूडीला पत्र लिहिले होते परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. असे असतांना इन्स्पेक्शनवाले येतात, लिफ्टचे इन्सपेक्शन करतात, पैसे घेतात आणि निघून जातात. माझ्या इमारतीच्या संदर्भात त्यांनी खोटया नोटीसेस दिलेल्या आहेत. यामध्ये कॉन्ट्रॅक्टरचे हात मिळालेले असतात. जर माझ्या इमारतीच्या बाबतीत अशी परिस्थिती असेल तर मुंबईतील इतर इमारतींच्या लिफ्ट्च्या संदर्भात काय होत असेल याचा विचारच केलेला बरा. जर अशा प्रकारच्या एजन्सीज, अशा प्रकारचे काम करीत असतील तर हे आपण कशा पध्दतीने प्रमोट करणार आहात. सभापती महोदय, मुंबईमध्ये बीईएसटी. फायर फायटींगसाठी लीडमधून वेगळा सप्लाय देत असते. या सप्लायमधील वीज ही फायर फायटींगसाठीच वापरावयाची असते. ही वीज वापरली नाही तरी सुध्दा महिन्याकाठी 3-4 हजार रुपयाचे बील येत असते. त्यामुळे फायर फायटींगचा विषय हा फार मोठा आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.दिवाकर रावते.........

आपण पाण्याची गरज कशी भागविणार आहात ? आज मुंबई शहरात दोन हजार मिलियन गॅलनचा तुटवडा आहे, असे असताना फायर फायटरसाठी लागणारे हजारो लीटर पाणी आपण कसे उपलब्ध करुन देणार आहात ? या विधेयकात जी 34 कोष्टके देण्यात आलेली आहेत त्याची बेरीज केल्यास किती मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता आहे हे लक्षात येईल.

सभापती महोदय, संभाजीनगर येथील अग्निशमनमध्ये एक वरच्या लेव्हलचा अधिकार आहे. ही पोस्ट ट्रान्सफरेबल नसल्यामुळे त्या पदावरील अधिकारी स्वत:च्या मनमानीप्रमाणे वागत आहे. पैसे घेतल्याशिवाय तो कोणतेही काम करीत नाही. त्या अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई करु शकत नाही. तेव्हा अशाप्रकरणांच्या बाबतीत शासनाचे कोणते धोरण आहे, हे स्पष्ट केले पाहिजे. मध्यंतरी शासनाने मोठ्या महानगरपालिका सोडून अन्य नगरपालिकांमधील कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भात विधेयक आणले होते. तो विषय वेगळा आहे. जे मस्तवाल अधिकारी आहेत, स्वत:च्या मनमानीप्रमाणे वागत आहेत, जे पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाही, कोणतीही एन.ओ.सी.देत नाही. अशा अधिकाऱ्यांना सरकार ठेचून काढणार आहे काय ?

सभापती महोदय, आज मुंबईत मोठ्या इमारतींचा प्रश्न आहे. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर मॉल्स उभारले जात आहेत. एकेका मॉलमध्ये एकाच वेळी किमान 8 ते 10 हजार माणसे असतात. जर त्याठिकाणी एखादी दुर्घटना घडली तर कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार ? मुंबईत जे बॉम्बस्फोट झाले त्यावेळी फायर ब्रिगेडवाले कोणीही दिसले नाहीत. फायर फायटर संबंधी अनेक गोष्टी सांगता येतील. या विधेयकाचा संपूर्ण अभ्यास करण्यासाठी पाहिजे तेवढा वेळ मिळालेला नाही.

सभापती महोदय, महानगरपालिकांतील अधिकारी मुजोरपणे वागत आहेत अशा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? या अधिकाऱ्यांची ट्रान्सफर होत नसल्यामुळे ते फक्त माया जमविण्याचे काम करीत आहेत, हे प्रकार शासन कसे थांबविणार आहेत ? शासन याचा जाब आयुक्तांना विचारणार काय ? पैसे दिल्याशिवाय एन.ओ.सी. मिळत नाही, याचा जाब शासन विचारणार काय ? असे अनेक प्रश्न सविस्तरपणे मांडता येण्यासारखे आहेत. हे विधेयक

..2.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

जरी 88 पानांचे असले तरी त्यातील प्रोव्हीजन्सवर बोलायचे असते. सर्वच प्रोव्हीजन्स टाकाऊ नसतात, परंतु जी टाकाऊ प्रोव्हीजन्स असतात त्यावर सखोल चर्चा करायची असते. मला खूप काही चर्चा करायची आहे. तेव्हा या विधेयकावर सखोल चर्चा होण्यासाठी हे विधेयक आता मांडू नये अशी माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे. मंत्रिमहोदयांनी हे विधेयक नागपूर अधिवेशनात मांडावे. आता गरज असेल तर ऑर्डीनन्स काढावा. या अधिवेशनापूर्वी 10-12 दिवस अगोदर कर विषयक बाबीसंबंधी ऑर्डीनन्स काढण्यात आला होता. नाहीतरी हे सरकार आर्डीनन्सवर चालत आहे. मला खेदाने ज्या भावना मांडावयाच्या होत्या त्या मी मांडलेल्या आहेत. तेव्हा पुन्हा एकदा माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि क्रमांक 78- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

हे एक अतिशय चांगले विधेयक आहे. या विधेयकाला आमचा विरोध नाही. महानगरपालिकेतील बाबी संबंधी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काही अडचणी सांगितल्या. खरे म्हणजे अग्निशमन अधिकाऱ्यांबाबत माझ्याकडे सुध्दा अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. जे अधिकारी बेफामपणे वागत असतील आणि त्यांच्यावर कोणतेही बंधन आणू शकत नसाल तर या विधेयकाचा काहीही उपयोग होणार नाही.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

हे बिल मोठे असल्यामुळे ते आपण पुढील अधिवेशनामध्ये आणले तर त्यावर सविस्तर चर्चा होऊ शकेल. या बिलाला कोणीही विरोध केलेला नाही, त्यामुळे हे बिल पुढील अधिवेशनामध्ये आणावे, अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनामध्ये हल्ली काही आश्चर्यकारक घटना घडत आहेत. खरे म्हणजे एका विधेयकांवर चर्चा सुरु असताना, ते अजून संपले नसताना व कार्यक्रमपत्रिकेवर विधेयक दाखवले असताना या विधेयकावर सदनामध्ये ताबडतोब चर्चा सुरु होणे, हे योग्य नाही. एखाद्या विधेयकावर जर चर्चा करावयाची असेल तर नियमाप्रमाणे 4-5 दिवस अगोदर सन्माननीय सदस्यांना ते वाचण्यासाठी दिले पाहिजे. असे असतानाही सदरचे विधेयक मांडणे योग्य नाही. हा काय प्रकार चालू आहे ? हा लोकशाहीचा खेळ चालू आहे का ? आपल्याला असेच जर करावयाचे असेल तर आपण असा प्रस्ताव आणावा की, कुठलेही विधेयक आले की ते याठिकाणी मांडायचे आणि सगळयांनी हात वर करुन ते पास करुन टाकायचे, अशा प्रकारचा प्रस्ताव आपण आणावा. सभापती महोदय, हा अनुचित प्रकार असून असे घडता कामा नये. आपण हे विधेयक चर्चेसाठी घेऊ नये. जे ऑन लेग बिल चालू आहे, त्यावर आपण चर्चा करावी. हे बिल आता आमच्याकडे आले आहे, ते आम्हाला अजून वाचायचे आहे. ते वाचल्यानंतर त्यावर आम्हाला आमच्या सूचना मांडायच्या आहेत. आपल्याला असेच जर बिल मांडायचे असेल तर आपण आणखी 8 दिवस अधिवेशन वाढवावे. एका बाजूने अधिवेशन वाढवायचे नाही आणि अशाप्रकारे कामकाज ओढून न्यायचे, ही योग्य पध्दत नाही. ही पध्दत लोकशाहीला मारक आहे. त्यामुळे या पध्दतीचा मी निषेध करतो. त्यामुळे याठिकाणी माझी विनंती आहे की, आपण हे बिल चर्चेला घेऊ नये. काल वि.स.वि.क्रमांक 89 वर चर्चा चालू होती, ती आपण पुढे चालू ठेवावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझ्या प्रास्ताविक भाषणामध्ये सांगितले की, या विधेयकाचे प्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट लागलीच लागू होणार आहेत, अशातला भाग नाही. आपल्याकडे हा कायदा आणण्यास अगोदरच उशीर झालेला आहे. त्यामुळे आपण अशा पध्दतीने वेळ घेतला तर अजून वेळ होणार आहे. माननीय रावते साहेबांनीही या बिलाचे स्वागत केले आणि सांगितले की, या गोष्टीची आवश्यकता आहे. अनेक इमारतीमध्ये ॲक्सीडेंट होतात. याबाबत आपण वृत्तपत्रात व टी.व्ही.वर पाहतो. या बिलामुळे सर्वसामान्य माणसांस फटका बसणार आहे, असे

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

काहीही नाही. यामध्ये तशा प्रकारची कुठलीही जाचक तरतूद नाही. मुंबईसारख्या शहरामध्ये जागेची कमतरता असल्यामुळे याठिकाणी हायराईज बिल्डींग होणे हे क्रमप्राप्त असून आजची ती गरज आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या 7 मजली इमारती असतात, त्या ठिकाणी फायर फायटिंगची व्यवस्था करण्यात आली आहे, त्यांना जर अशा पध्दतीने आकारणी झाली तर तेथील रहिवाश्यांचा महिन्याचा मेंटेनन्सचा खर्च 1500 रुपयांपेक्षा जास्त होईल. अशी जी कलमे आहेत ती यामध्ये आहेत. अधिका-यांना भ्रष्टाचार करता यावा म्हणून काही कलमे यामध्ये घुसविण्यात आली आहेत. त्यामुळे अशा कलमांबाबत या सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. जर शासनाला घाई असेल तर त्यांनी अध्यादेश काढावा.

**उपसभापती** : दरवेळी विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते सांगत असतात की, जर महत्वाचे बील शासनाला मंजूर करुन घ्यावयाचे असेल तर ते 4/5 दिवस अगोदर सभागृहात मांडले जावे. यामुळे सभापतीस्थानी बसल्यानंतर पीठासीन अधिका-यांची फार पंचाईत होते. शासनाचे काम रखडते हे जरी खरे असले तरी आम्ही वेठीला धरलो जातो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जे बील या ठिकाणी मंजूर करावे असा मंत्रीमहोदय आग्रह धरीत आहेत ते बील एल.अे.बील आहे. जर हे बील विधानसभेने मंजूर केले असेल तर तसे यामध्ये म्हटले पाहिजे की, "As passed by the assembly."

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या बीलान्वये जी तरतूद करावयाची आहे त्यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक होती. 2/4 दिवसांपूर्वीच केंद्र शासनाने तशी मंजूरी दिलेली आहे त्यामुळे हे बील सभागृहात सादर करण्यास विलंब लागला आहे. परंतु, हे बील अतिशय महत्वाचे आहे, या बीलाची राज्याला गरज आहे. सामान्य माणसाचा जीव जाऊ नये म्हणून या बीलात तरतुदी केलेल्या आहेत. या बीलामध्ये सन्माननीय सदस्यांना काही सुधारणा सुचवावयाच्या असतील तर पुढच्या वेळी त्या आणता येऊ शकतील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी हे बील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहात आणले आहे, या विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याशी मी सहमत आहे. तथापि, या बीलाचे स्वागत सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी केले आहे आणि सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी, या बीलाची प्रोसिजर चुकली आहे परंतु विधेयक वाईट नाही, असे सांगितले आहे. आमच्या सर्वांची विनंती आहे की, यापूर्वी विरोधी

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...........

पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी ज्याप्रमाणे शासनाला सहकार्य केले आहे त्याच पध्दतीने याही बीलाला सहकार्य करावे. तसेच, सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या आहेत त्या भावनाचा शासनाकडून विचार करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.भास्करराव जाधव यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या. सन्माननीय सदस्य मंत्री किंवा पक्षाचे प्रतोद आहेत काय ? या ठिकाणी ज्या घाईघाईने बील आणण्यात आले आहे त्यानुसार "एक धक्का द्या आणि बील पास करुन घ्या," अशा पध्दतीने कामकाज चालले आहे, असे वाटते. जर शासनाला एवढीच घाई असेल तर त्यांनी अध्यादेश काढावा, नाही तरी शासनाने एसईझेडसंबंधी अध्यादेश काढला, यासंदर्भातही अध्यादेश काढा. बीलाचा अभ्यास न करता, ते वाचायला मुदत न मिळता बील मंजूर करणे, अशी या वरिष्ठ सभागृहाची पध्दत नाही. असे केल्याने या वरिष्ठ सभागृहाची बदनामी होईल. सभागृहाची प्रतिष्ठा जपण्यासाठी आता सन्माननीय सभापती महोदयांनीच निर्णय द्यावा, अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : आपण मला यामध्ये का घेत आहात ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदनामध्ये एका विधेयकावर चर्चा सुरु असतांना, सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते हे त्या बीलावर आपल्या भावना व्यक्त करीत असतांना अचानक दुसरे बील चर्चेला कसे घेता येईल ? कार्यक्रमपत्रिकेतील कामकाजाचा क्रम देखील आपण बघावा. मध्येच हे बील घुसडले गेले आहे. आपल्याला नियमाने असे करता येणार नाही. ज्या बीलावर सभागृहात चर्चा सुरु आहे ते बाजूला सारुन दुसरे बील चर्चेला घेणे आणि मंजूर करणे हे नियमाला धरुन होणार नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सभागृहाच्या हे लक्षात आणून देतो की, हे बील मांडण्यासाठी सभागृहाची परवानगी घेण्यात आली आहे.

**उपसभापती** : मला सभागृहाला असे विचारावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांना या बीलावर चर्चा करावयाची आहे काय ?

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. विधेयक पास करण्यासाठी एवढी घाई का ? तातडीच असेल तर अध्यादेश काढावा. सदस्यांना या विधेयकाचा अभ्यास करण्यासाठी देखील वेळ मिळालेला नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विनियोजन विधेयकाच्याबाबतीत आपण नियम शिथील करतो. विनियोजन विधेयक सभागृहामध्ये आल्यानंतर सभागृहापुढील इतर कामकाज बाजूला सारुन आपण त्या विधेयकावर चर्चा करतो.

**उपसभापती** : विधेयक इंट्रोडयुस केले आहे. विधेयक आयत्यावेळी आणावयाचे नाही, अशा सन्माननीय सदस्यांनी भावना मांडलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर चर्चा करावयाची आहे काय ?

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी दोन दिवसापूर्वी विधेयकाचा अभ्यास करण्यासाठी सदस्यांना 4 दिवसांची मुदत दिली होती. नगर विकास राज्यमंत्री या विधेयकाचा अभ्यास करण्यासाठी मुदत का वाढवून देत नाहीत ?

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या विधेयकामध्ये टेनंटकडून पैसे वसूल करण्यासंदर्भात प्रोव्हिजन आहे.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, या विधेयकावर चर्चा सुरु करावयाची काय ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही हे विधेयक वाचलेले नाही. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आता 4.00 वाजलेले आहेत. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी जाणीवपूर्वक विधेयके दाखविली जातात. मागच्या अधिवेशनामध्ये शेवटच्या दिवशी 10 विधेयके मंजूर करुन घेण्यात आली. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधेयके दाखवावयास नकोत. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी जाणीवपूर्वक विधेयके दाखविली जातात. हे विधेयक 85 पानांचे आहे. या विधेयकावर चर्चा न करता आम्ही हे विधेयक मंजूर करुन द्यावयाचे काय ? हे योग्य नाही. सभागृहामध्ये आम्ही किती वेळ बसावयाचे ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये आम्ही सूचना दिली होती की, जी विधेयके आणावयाची आहेत ती अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून आणावीत.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अंधश्रध्दा विधेयक अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आणावे, अशी आम्ही विनंती केली होती. परंतु ते विधेयक सुध्दा शेवटच्या दिवशीच दाखविण्यात आले.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 73 हे सर्वसामान्यांसाठीचे आहे, कन्व्हेअन्स डिड संबंधातील आहे. हे विधेयक सभागृहामध्ये आणावे अशी आम्ही मागील 4 महिन्यांपासून मागणी करीत आहोत. परंतु ते विधेयक आणले जात नाही. खालच्या सभागृहामध्ये ते विधेयक मंजूर झालेले आहे. या विधेयकासंदर्भात लोकांची निवेदने येत आहेत. पण बिल्डरांचा दबाव येत असल्यामुळे जनतेच्या हिताचे ते विधेयक आणले जात नाही. अध्यादेश काढू असे मंत्री महोदय सांगतात. 20-20 वर्षे ही कन्व्हेअन्स डिड झालेली नाहीत.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे बरोबर माझी या विधेयकासंबंधात मी बोललो आहे, तसेच सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांचेशी देखील मी बोललो आहे. त्यावेळी त्यांना मी या विधेयकासंबंधात माहिती दिली होती. तेव्हा त्यांनीही या विधेयकाचे स्वागतच केले आहे. ... सभापती महोदय, या विधेयकावर चर्चा करून नंतरच ते संमत करण्यास माझी काहीही हरकत नाही, मी चर्चा करण्यास तयार आहे. केवळ रेटून नेऊन विधेयक संमत करून घेण्याची माझीही इच्छा नाही. मात्र हे विधेयक आज आणण्यामागील माझी अडचण देखील मी दोन्ही ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांना सांगितली. या संबंधात केंद्र सरकारची परवानगी दोन दिवसापूर्वीच आली आहे आणि राज्याच्या जनतेचे हित लक्षात घेऊन हे विधेयक तातडीने आणले आहे असेही मी त्यांना सांगितले आहे. त्यांनीही ते मान्य केले होते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना मी सागू इच्छितो की, आपण म्हणता ते कन्व्हेअन्ससंबंधातील विधेयक देखील येथे लवकरच आणले जाईल. त्यात काही अडचण नाही. मात्र हे विधेयक जनतेच्या हिताचे आहे हे आपणही मान्य करता आहात तेव्हा हे आज आपण संमत करून द्यावे अशी माझी आपणा सर्वांनाच विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : हे विधेयक जनतेच्या हिताचे आहे हे मान्य पण कन्व्हेअन्स संबंधातील विधेयक देखील तितकेच किंबहुना यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे ते आपण अजूनही आणलेले नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री माझ्याशी या विधेयकासंबंधात बोलले होते ही गोष्ट खरी आहे. परंतु सदनातील सगळ्याच सदस्यांचा आताचा मूड हा जरासा वेगळा आहे. एक तर खालचे सभागृह संस्थगित झालेले आहे. आता 4 वाजून 30 मिनिटे झाली आहेत आणि जवळपास सगळ्याच सदस्यांना येथून घरी जाण्याचे वेध लागले आहेत. अनेकांची गाड्यांची, विमानाची वेळ झालेली आहे. अशा वेळेस माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज संपवून आम्हा सगळ्यांना घरी जाऊ द्यावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांची एक पद्धत आहे, त्यांनी दिलेले प्रॉमिस ते कधीही मोडत नाहीत. त्यांनी मला प्रॉमिस केले आहे की, हे निश्चितपणे चांगले असे विधेयक आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी देखील या विघेयकाबद्दल स्वागत करण्याचीच भूमिका घेतलेली आहे. ते स्वत: या विधेयकाची सातत्याने वाट

...... 3एल 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

पाहत होते. मी त्यांना हे बील आणण्यामागील अडचण देखील सांगितली आहे. तरी आता आपण हे विधेयक मंजूर करावे, वाटल्यास चर्चा करून मंजूर करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे विधेयक मंजूर होऊन सभागृहाचे कामकाज लगेच संपणार आहे काय ? कारण आम्हालाही जायचे आहे ...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी आपल्याला एक नियम वाचून दाखवू इच्छितो. ...

**उपसभापती** : आपण सांगणार असलेला नियम मलाही माहीत आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांचे म्हणणे बरोबर आहे, आपणा सगळ्यांनाच आज जायचे आहे. तेव्हा आपण कामकाज लवकर उरकू या. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेच आहे की, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी तसेच श्री.दिवाकर रावते यांनी खाजगीमध्ये या विधेयकाचे स्वागत केलेले आहे. तेव्हा मग हे विधेयक मंजूर करण्यामध्ये काही अडचण नसावी असे मला वाटते. तरी आपण सहकार्य करावे.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे हे विधेयक आणि जादूटोणा संबंधातील विधेयक संमत होत असतील तर बाकी चर्चा आपण नंतरही घेऊ शकतो. आमच्या कोकणासंबंधातील चर्चा देखील आपण नागपूर अधिवेशनामध्ये घेऊ. परंतु ही दोन्ही विधेयके आता मंजूर केली जाणार असतील तर ती आताच घ्यायला हरकत नसावी.

( यानंतर श्री. सरफरे ....3एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधान परिषद नियम 141 अन्वये...

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहापुढे असलेले कामकाज नियमाप्रमाणे चालू द्यावे. जे नियमाप्रमाणे ठरले आहे, त्याप्रमाणे कामकाज चालू द्यावे. ज्यांना सभागृहामध्ये बसावयाचे असेल ते बसतील आणि ज्यांना जायचे असेल ते जातील...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, काल एक विधेयक ऑन लेग असतांना दुसरे विघेयक मध्येच चर्चेकरिता कसे आणता येईल?

(गोंधळ)

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी काल ते विधेयक मांडले आहे हे आपल्याला माहीत आहे. तेव्हा आपण पुन्हा पुन्हा तोच विषय कां उपस्थित करता?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियमाप्रमाणे विधेयकावर बोलण्याकरिता आम्हाला वेळ न दिल्यामुळे या विधेयकावर चर्चा होणार नाही...

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांनी मांडलेले विधेयक चांगले आहे, असे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले आहेत. त्याचप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा हे विधेयक चांगले असल्याचे मान्य केले आहे. हे रिट्रॅास्पेक्टिव्ह नाहीतर प्रॉस्पेक्टिव्ह विधेयक आहे...

(गोंधळ)

**उपसभापती** : या विधेयकावरील चर्चेमध्ये माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे काय?

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधान परिषद नियम क्र. 141 प्रमाणे विधेयकाचे वाचन व अभ्यास करण्यासाठी सदस्यांना चार दिवसांचा अवधी मिळणे आवश्यक आहे. तो न मिळाल्यामुळे आपल्याला या विधेयकावर चर्चा करता येणार नाही.

(गोंधळ)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्हाला विधेयकावर चर्चा करावयाची आहे. सत्ताधारी पक्षाने बहुमताच्या जोरावर दादागिरी करु नये...

(गोंधळ)

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 50, (दोन्ही सम्मिलित), अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 78 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 78 संमत झाले आहे.

(विरोधी पक्षाकडील सर्व माननीय सदस्य घोषणा देतात.)

(गोंधळ)

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : आम्ही या विधेयकावर बोलू. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे अपूर्ण भाषण आहे, ते त्यांना पुढे सुरु करु द्यावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, दिवसाच्या कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारची सूचना न देता बदल करण्यात आला. माझा औचित्याचा मुद्दा सुरु असताना, कॅबिनेट दर्जाचे मंत्री उपस्थित नसल्यामुळे 10 मिनिटांकरिता, दुपारी 3-00 वाजेपर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या औचित्याच्या मुद्याला परवानगी दिलेली नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : लक्षवेधी सूचना राहिलेल्या आहेत. अपवाद म्हणून लहानसे आग प्रतिबंधक बील घेण्यास अनुमती दिलेली होती. आता कमीतकमी लक्षवेधी सूचना घ्यायला पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, हा मोठा कारस्थानाचा एक भाग आहे,असे मला वाटते. आपण मागे 7100 कोटी रुपयाची कृष्णा खोऱ्याची मागणी गोंधळामध्ये मंजूर झाली होती. पाटबंधारे या विषयाच्या संबंधातील आमची लक्षवेधी सूचना परवा राखून ठेवली होती. ती आजच्या कामकाजाच्या क्रमात आहे. त्यामुळे आपल्याकडून थोडा न्याय मिळाला. मी आपल्याकडे कायद्याची प्रत पाठवितो. प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कायद्यातच तरतूद आहे. मधेच आपण हे बील घेतले त्यामुळे आमच्यावर अन्याय होतो.

**उपसभापती** : सन्मानीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की,एखादे महत्वाचे विधेयक मंजूर करावयाचे असेल तर त्याला आपण प्राधान्य देतो.

प्रा.बी.टी.देशमुख : मी विधेयकाच्या संबंधात बोलत नाही. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी म्हणून मी बोलत आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांचा औचित्याचा मुद्दा मी मान्य केलेला नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : मी कायद्याची प्रत आपल्याकडे पाठवितो. यामध्ये असे म्हटलेले आहे की, "राज्यपालांच्या निदेशानुसार विदर्भ, मराठवाड्यातील अशा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार संबंधित पाटबंधारे विकास मंडळास असतील"



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या संदर्भाने सल्ला घेण्याबाबत ॲडव्होकेट जनरलना आपण बोलाविलेले होते.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण दोन मिनिटे माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आपण जो निर्णय द्याल तो आम्ही मान्य करु. अनुशेषग्रस्त भागाची एकदम गळचेपी करु नका. मी आपल्याला बोलत नाही. आपण त्या दिवशी लक्षवेधी सूचना राखून ठेवली म्हणून थोडा न्याय मिळाला.

**उपसभापती** : माझी गळचेपी होणार नाही,असे पहावे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय...

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की, त्या लक्षवेधीवर त्या दिवशी जवळजवळ 70 मिनिटे चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या संदर्भात ॲडव्होकेट जनरलना बोलाविण्याची विनंती केली. त्याप्रमाणे माझ्या चेंबरमध्ये त्यांना बोलाविले आणि त्या ठिकाणी दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आणि संबंधित मंत्री यांनी आपली भूमिका विशद केली.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ........

ॲडव्होकेट जनरल यांनी याबाबतीत आपले मत दिलेले आहे. He has upheld this particular issue.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण रेकॉर्डवर असे सांगितलेले आहे की, ॲडव्होकेट जनरलबरोबर चर्चा झाली आणि जी लक्षवेधी सूचना राखून ठेवली होती त्याची सभागृहातील चर्चा थांबली....

**सभापती** : या लक्षवेधी सूचनेवर जवळजवळ 70 मिनिटे चर्चा झालेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेबांनी दिलेला निर्णय रेकॉर्डवर आहे.

**सभापती** : माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेबांनी जो निर्णय दिला त्या अनुषंगाने लक्षवेधीच्या बाबतीत जी कागदपत्रे होती किंवा जे रेकॉर्डींग्ग होते ते मी पाहिलेले आहे. त्यातील महत्वाचा निर्णय असा होता की, लगेच दुसऱ्या दिवशी ॲडव्होकट जनरल यांना या ठिकाणी बोलवावयाचे. त्या पध्दतीने ॲडव्होकेट जनरल माझ्या चेंबरमध्ये आले. सन्माननीय सदस्यही त्या ठिकाणी उपस्थित होते.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण दोन मिनिटे माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आपण जो निर्णय द्याल तो आम्ही मान्य करु. आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवली. मी मुद्दाम परवापर्यंत कायद्याचा हा मुद्दा मांडला नाही. कारण माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे कार्यवाही व्हावयास पाहिजे. ते निदेश श्रेष्ठ आहेत. सभापती महोदय, मी सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 18 या कायद्याची प्रत आपल्याकडे पाठविलेली आहे. त्या कायद्यामध्ये हे अधिकार महामंडळाला असतील असे स्पष्टपणे म्हटले आहे. 7100 कोटीच्या बाबतीत जो गोंधळ झाला तसाच तो आजही होत आहे असे मला वाटते. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी निवेदन दिलेले नाही. निवेदन वितरित झालेले नाही. ते या सभागृहामध्ये हजर नाहीत. माझे असे म्हणणे आहे की, आता राज्याने कायदा केलेला आहे. मंत्रिमंडळाने एकमताने कायदा केलेला आहे. दोन्ही सभागृहांनी तो एकमताने मान्य केला. हा कायदा गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला तरी त्या अनुशेषग्रस्त भागाला कायद्याप्रमाणे वागणूक आपण देणार नाही काय ? असे मी त्यांना विचारणार होतो. परंतु

..2...

RDB/ D/ KGS/ MHM/ MAP

प्रा. बी. टी. देशमुख .....

माननीय मंत्रिमहोदय गैरहजर आहेत. त्यांनी नियमाप्रमाणे लेखी निवेदन केलेले नाही. सभापती महोदय, आता माननीय मंत्रिमहोदय सभागृहात आलेले आहेत. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, त्या दिवशी माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेब हे सभापतींच्या आसनात असताना त्यांनी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवताना असे सांगितले की, या विषयाच्या संदर्भात जे मुद्दे सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांवर ॲडव्होकट जनरल यांचे अभिप्राय घेऊ. त्याप्रमाणे ती बैठक झाली. ॲडव्होकट जनरल यांनी दिलेले अभिप्राय माझ्याकडे आहेत. आपली इच्छा असेल तर मी ते वाचून दाखवितो. आता सन्माननीय सदस्य नव्याने काही मुद्दे उपस्थित करीत असतील तर ते मुद्दे कोणत्या कायद्याखाली उपस्थित करीत आहेत ? हे मला माहीत नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : महाराष्ट्राचा कायदा तुम्हाला माहीत नाही हे बरोबर नाही. माननीय मंत्रिमहोदय सभागृहात आले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद दिलेले आहेत. त्यांनी सभागृहात निवेदन दिलेले नाही त्याबद्दल निषेध व्यक्त करतो.

श्री. नितीन गडकरी : आज या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत निवेदन द्यावयाचे नाही काय ?

**सभापती** : त्या दिवशी असे ठरले होते की, या अनुषंगाने ॲडव्होकेट जनरल यांना माझ्या म्हणजे सभापतींच्या दालनामध्ये बोलवावयाचे, या अनुषंगाने आपली बाजू त्या ठिकाणी मांडावयाची आणि यासंदर्भात त्यांचे अभिप्राय घ्यावयाचे. त्या पध्दतीने आपण त्यांचे अभिप्राय घेतलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : आजच्या कामकाज पत्रिकेवर लक्षवेधी सूचना का दाखवली ?

**सभापती** : सभापती म्हणून याबाबतीत माझा जो निर्णय आहे तो देण्याकरिता आजच्या कामकाज पत्रिकेवर लक्षवेधी सूचना दाखवलेली आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : यामध्ये दोन गोष्टी आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन केलेले नाही. महाराष्ट्राचा कायदा लाथेखाली तुडविण्याचा त्यांना अधिकार नाही. अनुशेषग्रस्त भागाच्या बाबतीत असे करणे बिलकूल बरोबर नाही. मी आपल्याकडे कायद्याची प्रत पाठविलेली आहे. आपण न्याय द्याल अशी आम्हाला खात्री आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार या राजपत्रात 4 मे, 2005 रोजी सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 18 प्रसिध्द झालेला आहे. आज माननीय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KGS/ MHM/ MAP

प्रा. बी. टी. देशमुख ....

मंत्रिमहोदयांनी निवेदन केले असते तर आम्ही त्यांच्याशी भांडलो असतो. ॲडव्होकेट जनरल यांनी उलटसुलट काही सांगितले म्हणून हा कायदा लंबा होतो काय ? हे त्यांना विचारणार होतो. माननीय मंत्रिमहोदयांनी मुद्दाम निवेदन केलेले नाही. त्यांनी निवेदन करावयास पाहिजे. काल सुध्दा एक मिनिट अगोदर निवेदन केले.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 16:05

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी चौकशी केल्यानंतर मला असे सांगण्यात आले की, "ॲडव्होकेट जनरल यांनी दिलेला अभिप्राय या सभागृहामध्ये सांगायचा आहे. लक्षवेधीसाठी स्वतंत्र निवेदनाची आवश्यकता नाही." त्यामुळे निवेदन करण्याची मला आवश्यकता वाटली नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी आपल्याकडे "महाराष्ट्र शासन राजपत्र,असा मे 4, 2005" मध्ये प्रसिध्द झालेल्या कायद्याची प्रत पाठविलेली आहे. या सदनामध्ये उपस्थित झालेल्या लक्षवेधीच्या संदर्भात ॲडव्होकेट जनरल यांनी मत दिले. मी कायद्याची प्रत मुद्दाम आपल्याकडे पाठविलेली आहे. मला मनापासून अशी भीती वाटत आहे की, आजच्या शेवटच्या दिवशीच्या कामकाजाच्या या गर्दीत अनुशेषग्रस्त भागाला चेंगरुन टाकले जाईल. सभापती महोदय, 7100 कोटीच्या वेळीही असेच झाले. मी जी कायद्याची प्रत आपणाकडे पाठविलेली आहे त्यामधील खंड 11(च)मध्ये असे म्हटलेले आहे की, "राज्यपालांचे निदेशानुसार विदर्भ व मराठवाड्यातील अशा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळास असतील." हा कायदा मंत्रिमंडळाने, दोन्ही सभागृहाने पास केलेला आहे. असे असतानाही, कायद्यात नमूद असूनसुध्दा, हे अधिकार आपण त्या महामंडळाला देत नाही. उलट वित्त विभागाच्या अधिका-यांच्या तंगडयामध्ये मराठवाडा आणि विदर्भाच्या तंगड्या अडकवून ठेवल्या आहेत.

**सभापती** : या लक्षवेधीच्या संदर्भात आपण जेव्हा ॲडव्होकेट जनरल बरोबर चर्चा केली त्यावेळी जी रिलेव्हण्ट प्रोव्हिजन होती किंवा जी रिलेव्हण्ट चर्चा झालेली होती त्यातील सर्व मुद्दे ॲडव्होकेट जनरल यांच्या समोर मांडले....

श्री. नितीन गडकरी : हा मुद्दा मांडलेला नव्हता...

**सभापती** : एखादा मुद्दा मांडला गेला नाही म्हणून त्यासंबंधी आपण आग्रह धरणे बरोबर नाही असे मला वाटते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेला कायदा आहे. हा कायदा बदलायचा असेल तर त्याबाबतीत कॅबिनेट श्रेष्ठ आहे, विधिमंडळ श्रेष्ठ आहे की, ऑर्डर काढणारी फायनान्स मिनिस्ट्री श्रेष्ठ आहे ?..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 16:05

प्रा. बी.टी.देशमुख : कायदा स्पष्ट आहे. आंधळयाने वाचला तरी त्याला समजेल इतका हा कायदा स्पष्ट आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की , आम्हाला हे कारस्थान वाटते. मागच्या वेळी 7100 कोटी 2 मिनिटामध्ये मंजूर करुन घेतले.

**सभापती** : या लक्षवेधीच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य जो इश्यू या सदनामध्ये मांडू इच्छित आहेत तो इश्यू या सदनामध्ये यावा असे मला वाटत नाही. फक्त या लक्षवेधीच्या अनुषंगाने शासनाने जे निवेदन केले होते...

प्रा. बी.टी.देशमुख : या लक्षवेधीवर शासनाने निवेदनच केलेले नाही....

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांनी नवीन मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे.

(सन्माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील व सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख एकाच वेळी जोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी लक्षवेधी विचारली त्या लक्षवेधीमध्ये, आता सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख जो संदर्भ देत आहेत त्याचा उल्लेख केलेला नव्हता. जेव्हा आपण लक्षेवधीवर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतले त्यावेळी वित्त विभागाने केलेली कारवाई योग्य आहे असे ॲडव्होकेट जनरल यांनी सांगितले.सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख हे याठिकाणी नवीन मुद्दा उपस्थित करीत आहेत. सदरहू नवीन मुद्याबाबत त्यांनी स्वतंत्र लक्षवेधी सूचना विचारावी.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स. यांच्या लक्षवेधी सूचनेवर 45 ते 50 मिनिटे चर्चा झाली. माननीय उपसभापतींनी महाअधिवक्ता यांचे मत घेण्याचा निर्णय दिला. त्याप्रमाणे दिनांक 19 जुलै, 2006 रोजी माननीय सभापतींच्या दालनात बैठक झाली. महाअधिवक्ता यांनी नोव्हेंबर, 2005 चा शासन निर्णय (वित्त विभाग) हा माननीय राज्यपालांच्या निदेशाचा भंग करीत नाही, असे मत दिले आहे. The GR of Nov., 2005 could not be in violation of the directions or Breach of the directions. पुढे त्यांनी असे मत व्यक्त केले की, They can consider The advice of They Think it fit it is not breach or Violation of direction to The extent so far as Para 7.13 is concerned. अत: या लक्षवेधी सूचनेवर आता चर्चा होणार नाही.

या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय मी याठिकाणी वाचून दाखविले. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा आता संपली आहे. मी पुढील लक्षवेधी सूचना विचारात घेत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : याची अंमलबजावणी शासनाने केली नाही ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. याचा निषेध करुन मी सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी बहिर्गमन केले)

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नवीन उद्योगधंद्याचे प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसापासून प्रलंबित असणे.

**मु.शी.**: नवीन उद्योगधंद्याचे प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसापासून प्रलंबित असणे यासंबंधी सर्वश्री रमेश निकोसे, संजय दत्त, चंद्रकांत रघुवंशी, जगन्नाथ शेवाळे, जितेंद्र आव्हाड, डॉ.एम.ए.अझीज, डॉ.दिपक सावंत, श्री.दिवाकर रावते, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

मुंबई हे उद्योगधंद्याच्या दृष्टीने अग्रेसर असून या महानगरात उद्योगधंद्यासाठी जमीन शिल्लक राहिलेली नसल्याची वस्तुस्थिती, मुंबई शहरात देशाच्या कानाकोपऱ्यातून रोज हजारो लोक उद्योगधंद्यासाठी येणे, मात्र या शहरातील कारखाने व मिलच्या जमिनी विकल्यामुळे दिवसेंदिवस उद्योगधंदे बंद होत असल्याचे आढळून येणे, यामुळे सुशिक्षित बेरोजगार यांचेवर कोसळलेली बेकारीची कुऱ्हाड, ठाणे जिल्हा, वसई- बिरे-बापने , मौजे कन्हेर, जिल्हा ठाणे -येथील श्री.प्रताप शहा यांच्या नवीन स.न. ६३,६४,हि.न.१ ते ५ सन ६५ हिन.९. सन ६६, हि.नं ४,५, स. नं ६६ न ६ पै सन ६६,६५ व ७ स.नं. ८१ भाग यांच्या जवळून हायवे रस्ता आहे व स्वत: शेतमालक रस्ता, विद्युत व इतर सर्व व्यवस्था करण्यास तयार आहे व ७० हेक्टर पहाडी, पडीक व पठारी जमिनीवर कोणतेही पिक होणार नसल्याचे दिसून येणे, या जमिनीवर नविन उद्योगधंदे सुरु करण्याकरिता स्थानिक जमिन मालकांनी संचालक, नगररचना, पुणे यांचेकडे पाठविणे, मात्र सदर अर्जावर शिफारस करुन सदर प्रस्ताव मुख्यमंत्री यांचेकडे पाठविणे, मात्र सदर प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसापासून प्रलंबित असल्याचे आढळून येणे, सदर जमिनीवर नविन उद्योगधंदे सुरु करण्यास परवानगी दिल्यास राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊन बेकारी कमी होण्यास मदत होईल, याबाबत शासनाने ठाणे जिल्हा वसई-बिलेबापने व विरार येथील ७० हेक्टर पडिक, पहाडी व पठारी जमिनीवर नविन उद्योगधंदे सुरु करण्याची परवानगी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन कृपया छापावे)

...४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, गेल्या १८ वर्षापूर्वी वसई व विरार या विभागात औद्योगिक क्षेत्र जाहीर करण्याचा निर्णय घेतला. यासाठी तीन लोकांची समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे. महाराष्ट्राचा जर विकास करावयाचा असेल तर आम्ही विदर्भाची मागणी सोडून दिली आहे. मुंबईमध्ये हजारो उद्योग बंद पडले. त्यामुळे रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. आमदार निवासामध्ये नागपूरचे १०-१५ तरुण नोकरी करीत आहेत. माझा प्रश्न असा आहे की, वसई व विरार भागात उद्योगधंदे काढण्यासाठी ज्यांनी मंजुरी मागितली आहे ती केव्हा दिली जाणार आहे,शासन याचा निर्णय केव्हा घेणार आहे?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, वसई-विरारचा डी.पी.प्लॅन शासन स्तरावर मंजुरी स्टेजला आलेला आहे. गुणेवत्तेवर निश्चित विचार करण्यात येईल.

----------

..५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना वाढीव मानधन देणे.

**मु.शी.:** घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना वाढीव मानधन देणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

घडयाळी तासांवर काम करणाऱ्या शिक्षकांना प्रती घडयाळी तासासाठी २० रुपयाऐवजी ५० रुपये मानधन देण्याबाबत कार्यवाही न होणे, घडयाळी तासावर काम करणाऱ्यांना प्रती घडयाळी तासासाठी ७२ रुपये देण्याचे आश्वासन देऊन शिक्षकांची दिशाभूल करणे, विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबत जी.आर.काढण्यास टाळाटाळ, करणे, मुल्यांकनानुसार अनुदानास पात्र असणाऱ्या शाळांना व तुकडयांना ३० एप्रिल पर्यन्त अनुदान देण्याचे मान्य होऊनही कार्यवाही न होणे, सन २००३-२००४ मधील २३१ शिक्षकांना व सन २००४-२००५ मधील ३३८ शिक्षकांना पायाभूत पेक्षा अतिरिक्त पदे समजून प्रशासकीय मान्यता व वेतन देणे इत्यादी विषयासंदर्भात शासनाने केलेली अक्षम्य दिरंगाई व टाळाटाळ याबाबत शिक्षण क्षेत्रातील काम करणाऱ्या शिक्षकांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका.

श्री.वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन कृपया छापावे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून दोन-तीन विषय मी उपस्थित केले आहेत. खरे म्हणजे मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. भविष्यामध्ये हा विषय उपस्थित होणार नाही यादृष्टीने निर्णय होणे आवश्यक आहे. घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना २० रुपयांऐवजी ५० रुपये देण्यासंदर्भात १६ जुलै, २००६ रोजी या सभागृहात चर्चा झ ालेली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

सभापती महोदय, घडयाळी तासावंर काम करणा-या शिक्षकांना प्रती घडयाळी तासासाठी 20 रुपयांऐवजी 50 रुपये मानधन देण्यात येईल असे मान्य करण्यात आले होते. तसेच यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सुध्दा यांसदर्भात मान्यता दिलेली आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने 2 कोटी रुपयांचा खर्चही मंजूर केलेला होता परंतु अद्यापही यासंदर्भात काहीही निर्णय झालेला नाही. दुसरी विनंती अशी आहे की, विनाअनुदानीत सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राहय धरण्याच्या संदर्भात सन 2005 च्या हिवाळी अधिवेशनात माननीय सभापती महोदयांनी आदेश दिलेला होता. मागच्या बजेट अधिवेशनात माननीय उपसभापती महोदयांनी सुध्दा यासंदर्भात आदेश दिले होते. माननीय सभापती महोदय आणि माननीय उपसभापती महोदयांनी या संदर्भात आदेश देऊन सुध्दा त्या आदेशाचे अद्यापपर्यंत पालन झालेले नाही. माननीय सभापती महोदयांनी हिवाळी अधिवेशनात दिलेले आदेश आणि बजेट सेशनमध्ये माननीय उपसभापती महोदयांनी यासंदर्भात जे आदेश दिले होते त्या आदेशांचे अद्यापपर्यंत पालन का झाले नाही ? आदेशाचे पालन करण्यामध्ये कोणत्या अडचणी येत आहेत? व या आदेशाचे पालन किती दिवसात केले जाणार आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जे शिक्षक तासिका तत्वावर नियुक्त केलेले आहेत त्यांना घडयाळी तासाप्रमाणे आपण तासाला 20 रुपये देत आहोत त्यांना 50 रुपये तास या प्रमाणे मानधन देण्यात यावे यासंदर्भात शासनाने आश्वासन दिले होते. हा प्रस्ताव आम्ही मंत्रीमंडळापुढे घेऊन गेलो होतो, त्यावेळेस मंत्रीमंडळात असा निर्णय झाला की, उच्च शिक्षण, आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग या विभागाच्या ज्या ज्या शाळा आहेत त्यामध्ये तासिका तत्वावर एकूण किती शिक्षक काम करतात यासंदर्भात एकत्रित प्रस्ताव आणावा. त्यामुळे यासंदर्भात सर्व विभागांचा प्रस्ताव अर्थ विभागाकडून मंत्रिमंडळाच्या बैठकी पुढे येतो आहे. मी निश्चितपणे आश्वासन देतो की, येत्या नागपूर अधिवेशनात यासंदर्भात पुरक मागणी करण्यात येणार आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, घडयाळी तासावर काम करणा-या शिक्षकांना प्रती घडयाळी तासासाठी 20 रुपयांऐवजी 50 रुपये मानधन देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यामुळे या निर्देशाच्या संदर्भात आपल्या दालनात एक बैठक घेऊन यासंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे काय?

**सभापती** : 15 दिवसाच्या आत यासंदर्भात बैठक घेण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्यामुळे यांसदर्भातील निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने तयारी करावी, प्रयत्न करावेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी**. : लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**सचिव** : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्रमांक पाच (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 201 या लक्षवेधी सूचनेसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( **प्रेस** : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 201 ही निवेदने कृपया छापावी. )

----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**सभापती** : सदनापुढे आजचे जे कामकाज आहे त्यामध्ये सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 89 - महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ऑन लेग आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना पुढच्या अधिवेशनापर्यंत ऑन लेग ठेवले तरी चालेल काय यासंदर्भात मी दोन्ही बाजूला विचारतो आहे.

काही सन्माननीय सदस्य : होय.

**सभापती** : दुसरे असे की, सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 19 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन ( दुसरी सुधारणा) विधेयक, 2006 हे छोटे बील आहे. आपण सर्वांनी त्यांना मान्यता दिली तर हे बील घेण्याची मी व्यवस्था करतो.

श्री. विलासराव देशमुख : सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 19 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन ( दुसरी सुधारणा ) विधेयक, 2006 हे बील पुढील अधिवेशनात घेण्यात यावे.

**सभापती** : ठीक आहे.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, "महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या, तत्कालीन मा. गृह राज्यमंत्री ( ग्रामीण ), यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी म.वि.प. नियम 178(1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावा.

सभापती महोदय, ज्यावेळेस माननीय फरांदे साहेब हे या सभागृहाचे माननीय सभापती होते त्योवळी विशेष हक्कभंग दोन प्रकारे घेण्यात येत होते. एक तर सभागृहाच्या 10 सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात मागणी केली तर सभागृहाच्या मान्यतेने प्रकरण विशेष हक्क समितीकडे पाठविले जात होते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.........

दुसरे म्हणजे एखाद्या सदस्याने आपल्या परवानगीने विशेष हक्कभंगासंबंधी त्यांचे म्हणणे मांडल्यास आपणास सु-मोटो त्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्याचा अधिकार आहे. सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री (ग्रामीण ) श्री.कृपाशंकर सिंह यांचेविरुध्द सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेषाधिकार भंगाची सूचना दिली होती. यवतमाळ प्रकरणामध्ये दोन आरोपींना पकडण्यात आले होते, त्या आरोपींचा पोलीस कस्टडीत मृत्यू झाला होता. त्यावेळी उपस्थित झालेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, त्या आरोपींनी आत्महत्या केलेली आहे. पण जेव्हा पोस्टमार्टेमचा रिपोर्ट आला त्यामध्ये ओरापींनी आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले नाही. तेव्हा मंत्रिमहोदयांनी सभागृहाची दिशाभूल केली, म्हणून सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हक्कभंगाची सूचना दिली होती. मी याठिकाणी नमूद करु इच्छितो की, आता तत्कालीन मंत्री श्री.कृपाशंकर सिंह या सदनाचे सदस्य नाहीत, तसेच ते मंत्रीदेखील नाहीत. म्हणून माझी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विनंती आहे की, त्यांनी त्याचा विशेषाधिकारभंगाचा प्रस्ताव मागे घ्यावा, तशा आशयाचे पत्र मी आपणाकडे दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली त्यांचेवर कारवाई होणार असेल तर मी माझा प्रस्ताव मागे घेतो.

( प्रस्ताव मतास टाकून संमत झाला. )

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील, कर्नल सुधीर सावंत, प्रा.फौजिया खान यांनी नियम 260 अन्वये कोकणाला 720 किलोमीटर समुद्रकिनारा लाभलेला असून व पर्यटनाची मोठी संधी उपलब्ध असताना सुध्दा हा भाग दुर्लक्षित असणे" या आशयाचा प्रस्ताव दिलेला आहे. हा प्रस्ताव दोन वेळा पुढे ढकलण्यात आलेला आहे. मागच्यावेळी मी सांगितले होते की, संबंधित सन्माननीय सदस्य, नियोजन मंत्री व वित्त मंत्री यांची माझ्या दालनात मिटींग घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा करावी. आता हा प्रस्ताव नागपूर अधिवेशनात प्रथम घेण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण मागील अधिवेशनात सूचना केली होती त्याप्रमाणे माननीय वित्तमंत्र्यांनी अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आपण नागपूर अधिवेशनात या विषयावर चर्चा घेत असताना सुध्दा........

**सभापती** :मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात माझ्या दालनात बैठक होईल. त्या बैठकीस माननीय अर्थमंत्री, माननीय नियोजन मंत्री व पाटबंधारे मंत्री यांना बोलावून सविस्तर चर्चा करु. मी सदनाला पुनश्च एकदा सांगत आहे की, कोकणावरील प्रस्ताव नागपूर अधिवेशनात प्रथम चर्चेला घेण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या बैठकीस माननीय मुख्यमंत्र्यांना देखील बोलवावे.

श्री.विलासराव देशमुख (बसून) : या बैठकीस मी उपस्थित राहीन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या दालनात माननीय अर्थमंत्री आणि नियोजन मंत्री यांची बैठक होईल त्या बैठकीला आम्हाला सुध्दा बोलवावे अशी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री.मुझफ्फर हुसेन ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

" माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावा. "

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित...

16:25

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, उर्वरित लक्षवेधी सूचना व 93 ची निवेदने पुढील अधिवेशनामध्ये घ्यावीत.

**सभापती** : कामकाजपत्रिकेवरील उर्वरित लक्षवेधी सूचना व 93 ची निवेदने पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात येतील.

महाराष्ट्र विधान परिषदेचे हे दुसरे अधिवेशन आहे. सोमवार, दिनांक 3 जुलै ते शुक्रवार, दिनांक 21 जुलै, 2006 रोजीपर्यंतच्या सत्रकाळातील कामकाजाचा त्रोटक अहवाल आता मी सभागृहासमोर ठेवतो. एकूण बैठकीची संख्या **14** आहे. एकूण काम आपण **91** तास आणि **30** मिनिटे इतके केले आहे. यामध्ये वाया गेलेला वेळ **2** तास आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज **89** तास **30** मिनिटे झालेले आहे. रोजचे सरासरी कामकाज **6 तास 25** मिनिटे झालेले आहे.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, " महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक , 04 डिसेंबर, 2006 रोजी विधान भवन, नागपूर येथे घेण्यात यावे."

---------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे :-

" मी, एस. एम. कृष्णा, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे शुक्रवार, दिनांक 21 जुलै, 2006 रोजी होणाऱ्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( 04 वाजून 28 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही